# सावटांतलं रोप

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय व्या०वा०
दा. क्र. ५६०६

ना. धों. ताम्हनकर

IRBK-0105606
IRBK-0105606

किंमत दीड रुपया

कॉन्टिनेन्टल् प्रकाशन, पुणें

५६०६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# सावटांतलं गोप

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम १९५७५
विभाग ७१८१५
क्रमांक १७३८
नों. दि. २१।२२।९१
वाचनालय

ना. धों. ताम्हनकर

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ५६०६ नों. दि
वि. बा. वा. क्र.

IRBK-0105606
IRBK-0105606

कॉन्टिनेन्टल् प्रकाशन, पुणें

प्रकाशक :

अ. अं. कुलकर्णी,
कॉंटिनेंटल् प्रकाशन
टिळकरोड, पुणें २

सर्व हक्क लेखकाकडे
प्रथमावृत्ति १९४८.
द्वितीयावृत्ति १९५६
किंमत दीड रुपया

मुद्रक :

दामोदर त्र्यंबक जोशी,
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

चि. उत्तम यास

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

गतवर्षी 'खडकावरला अंकुर' मीं माझ्या बालमित्रांना दाखविला. कडेकपारींतून आणि उन्हाच्या झळांतून मिळतील तेवढीं जीवनसत्त्वं घेऊन आणि तीं पचवून तो अंकुर फोफावत गेला. त्याचं तें वैभव बालमित्रांना आल्हाददायक वाटलं. तें पाहून प्रसन्नचित्त झालेल्या बालमित्रांना हें 'सावटांतलं रोप' दाखवणं मला माझं कर्तव्य वाटलं. प्रतिकूलतेची मिजास चालूं न देतां पराक्रमी माणूस प्रगति कशी करूं शकतो हें दाखवितांना अनुकूलतेच्या अजीर्णानं प्रगति तर राहोच, पण अवनतिहि कशी वांट्याला येते हें दाखवणं मला इष्ट वाटलं. खेळगडीचे संपादक काका पालवणकर यांनींहि माझे हे विचार उचलून धरले व त्यांच्या माझ्या सहकार्यानं खेळगड्यांना हें 'सावटांतलं रोप' प्रथम पाहायला मिळालं.

बहुसंख्य खेळगड्यांना खडकावरल्या अंकुराप्रमाणं हें सावटांतलं रोपहि मनोवेधक वाटलं, हें काका पालवणकरांना आलेल्या पत्रांवरून मला कळलं. एका खेळगड्याच्या पालकांनीं मात्र यावर आक्षेप घेतला. मुलांच्या आयुष्यास लागलेल्या घाणेरड्या वळणाचं चित्र त्यांच्यापुढं ठेवल्यास त्यांना अनिष्ट वळण लागण्याचा धोका आहे अशी शंका त्यांनीं प्रदर्शित केली; तथापि मला ती पटली नाहीं. सावटांतलं रोप—राजाबाळ—कसा बिघडत गेला हें दाखवितांना मीं त्याचं कौतुक केलेलं नाहीं. उलट त्याच्या वांट्यास आलेल्या हानीचं चित्रच त्यांच्यापुढं रंगाविण्याचा मीं प्रयत्न केला आहे. फुलबाग तयार करतांना कांटेरी झाडंझुडपं कशीं उगवतात व तीं वेळींच खुडून उपटून काढून टाकलीं नाहींत तर तीं सुंदर फुलबागेची नासाडी कशी करूं शकतील हें मला खेळगड्यांना सांगायचं होतं. खेळगड्यांच्या सारासार विचार-शक्तीवर माझा विश्वास आहे. चांगलं आणि वाईट त्यांच्या नजरेपुढं आल्यास ते

चांगल्याचाच स्वीकार करतील आणि वाइटाला झिडकारतील याबद्दल मला शंका वाटत नाहीं. रस्ता दाखविण्यासाठीं स्वच्छ कंदील दाखविणं हें जसं अवश्य तसंच धोक्याच्या जागेवर लाल दिवा ठेवणंहि अवश्य. 'सावटांतलं रोप' हें धोक्याचा लाल दिवा म्हणून मी खेळगड्यांपुढं ठेवीत आहें.

दुसरी एक गोष्ट सांगायची ती ही कीं, मुलांप्रमाणं पालकांनाहि हा लाल दिवा मला दाखवावासा वाटतो. आपल्या मुलाचं जीवन सुखपूर्ण व सुरक्षित असावं ही तळमळ मातापित्यांच्या अंतःकरणांत असायचीच. पण ही तळमळहि आंधळी असतां कामा नये. मायेची पांखर मुलांवर घालतांनासुद्धां मातेनं त्याला अवश्य तेवढं उन्हांत तापवलं पाहिजे, तरच त्याची वाढ योग्य प्रकारें आणि जोमदार होऊं शकते. ही गोष्ट न ओळखल्यामुळं भाग्यानं प्राप्त झालेलं पुत्ररत्न हातचं कसं गमवावं लागतं आणि त्याला आलेली दगडाची अवकळा पाहण्याचं नष्टचर्य कसं ओढवतं हें माईच्या रूपानं मीं पालकवर्गापुढं प्रकट केलं आहे.

हें 'सावटांतलं रोप' सजविण्याचा आणि पुस्तकरूपानं बालमित्रांना सादर करण्याचा भार माझे मित्र 'कॉन्टिनेन्टल' प्रकाशनचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांनीं उचलला आहे. याबद्दल बालमित्रांप्रमाणें मीहि त्यांचा आभारी झालों आहें. माझे चित्रकार मित्र श्री. मुळगांवकर व श्री. दलाल यांनीं दिलेलं सहकार्य मी कृतज्ञतापूर्वक मान्य करतों.

वर्षप्रतिपदा,
शके १८७० (सन १९४८)

**ना. धों. ताम्हनकर**

अनुक्रम २९५५६
विभाग
क्रमांक
नों. दि.

# १

" राजाबाळ, ए राजाबाळ ! "

माईंच्या या हांकेला उत्तर आलं नाहीं. त्या लगबगीनं बाहेर आल्या. राजा दिवाणखान्यांतहि नव्हता. " शेजारच्या सुमाबरोबर सोंगट्या खेळत बैस " असं त्यांनीं त्याला सांगितलं होतं. दिवाळीचा दिवस होता. वासाचं तेल लावून त्यांनीं त्याला न्हाऊं घातलं होतं. परीटघडीचे स्वच्छ कपडे त्याच्या अंगावर चढविले होते आणि गळ्यांत सोन्याची साखळी व बोटांत डाळिंबी खड्याची अंगठी चढवून त्याला सजवलंहि होतं.

आठ वाजायला आले तेव्हां त्यांनीं फराळाचीं पानं तयार केलीं. त्यांनीं परोपरीचे जिन्नस तयार केले होते आणि बाकीच्या सगळ्या पानांवर सगळे जिन्नस वाढले असले, तरी राजाबाळाच्या चांदीच्या ताटलींत लिंबाएवढा शिरा, एक चिरोटा आणि वाटीभर मसाल्याचं दूध यापेक्षां कांहीं दिसत नव्हतं. तेलकट, तळकट आणि बिनसात्त्विक पदार्थ मुलाला खाऊं घालायचे नाहींत, या सावधगिरीनं माईंनीं वाढप केलं होतं आणि त्या त्याला हांक मारीत होत्या. पण त्यांची हांक ऐकायला राजाबाळ जाग्यावर कुठं होता ?

बाळ गेला तरी कुठं ? वाडींतल्या मैदानांत फटाक्यांचे बार आणि मुलांचा गोंगाट ऐकूं येत होता. त्या खट्याळ पोरांत तर नसेल गेला तो ? तिथं जाऊन जळत्या फटाक्यानं अंग भाजून घेईल, धांवाधांवींत

पडेल, विटी किंवा चेंडूनं त्याला खोकबिक पडेल, अशीं शेंकडों भीतिप्रद चित्रं माईच्या मनांतून एका क्षणांत सरकून गेलीं. त्या घाबऱ्या-घाबऱ्याच दारांत आल्या व राजाबाळाला न्याहाळूं लागल्या.

त्या मुलांच्या घोळक्यांतहि राजाबाळ दिसला नाहीं!

"पोरटं गेलं तरी कुठं!" त्या स्वतःशींच उद्गारल्या. चंदू, वसंत, गोट्या, चिंगी वगैरे मुलांना त्यांनीं 'आमचा राजाबाळ कुठाय्' म्हणून विचारलं. मुलं खेळाच्या नादांत दंग असल्यामुळं कुणीं त्यांचा प्रश्न ऐकलाच नाहीं, तर कुणीं 'आमाला नाइ माहीत' म्हणून धूम ठोकली. मुलांच्या या बेपर्वाईचा माईना मनस्वी राग आला, पण उपयोग काय होता रागावून? मुलाचा शोध लागला पाहिजे होता कांहीं झालं तरी. शेवटीं डब्बल बाराचा फटाका पेटवण्यासाठीं उदबत्ती घेऊन निघालेल्या एका मुलाच्या दंडाला धरून माईनीं विचारलं—

"अरे आमचा राजाबाळ कुठाय्!"

"राजाबाळ!" तो मुलगा विस्मयानं उद्गारला व वात्रटपणें म्हणाला, "राजाबाळ म्हणतां होय? तो गेला असेल राणीबाळाकडं." आणि माईच्या हातून तो निसटून आपल्या कामाला पळून गेला. बाकीचीं मुलं त्याच्या उत्तरानं खिदळूं लागलीं.

माई खट्टू झाल्या आणि चिडल्याहि. पण या वेळीं खट्टू व्हायला आणि चिडायला त्यांच्या मनाला सवड नव्हती. राजाबाळ कुठं गेला आणि तो सुखरूपपणें घरीं कधीं येतो, याहून दुसऱ्या कोणत्याच विषयाला त्या वेळीं माईच्या मनांत वाव मिळणं अशक्य होतं.

मुलगा जरासा नजरेआड झाला तर इतकं घाबरण्याचं माईना वास्तविक कांहीं कारण नव्हतं. बाकी नव्हतं कसं? होतंच. राजाबाळ हा त्यांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्याआधीं झालेलीं दोन मुलं माईना वर्ष सहा महिन्यांहून अधिक काळ लाभलीं नव्हतीं आणि राजाच्या जन्मानंतर त्यांना फिरून अपत्यप्राप्ति होण्याची शक्यताहि

उरली नव्हती. कारण राजाचं आगमन जगांत होण्यापूर्वी दोन महिने त्यांचे पति आकस्मिकपणें जगाबाहेर निघून गेले होते. माईंना राजा हा एकच एक आशातंतु उरला होता.

पतिनिधनानंतर आपल्या पोटीं जन्मणारं मूल मुलगा असावं आणि आपल्या भावंडांप्रमाणं अल्पजीवि न होतां त्यानं दीर्घायुषी व्हावं ही माईंची इच्छा. ती फलद्रूप होण्यासाठीं त्यांनीं अनुष्ठानं करविलीं होतीं, नवसहि केले होते. त्यांचं फळ म्हणूनच आपणास मुलगा झाला अशी त्यांची श्रद्धा होती. मुलगा झाला एवढंच नव्हे, तर पहिल्या दोन मुलांसारखा निःसत्त्व न होतां पूर्ण वाढीचा आणि तरतरीचा झाला त्यामुळंहि माईंची ही श्रद्धा दुणावली होती. त्यांनीं पतिनिधनाच्या दुःखानं मन तगमगत असूनसुद्धां मुलाचं बारसं समारंभानं केलं होतं. त्यांनीं भोळ्या समजुतीखातर त्याचं नांव धोंडू ठेवलं आणि कानांबरोबर नाक टोंचून त्यांत सोन्याची मुदीहि घातली ! पापग्रहांच्या फसवणुकीसाठीं त्यांनीं हे तोडगे केले असले, तरी स्वतःची हौस पुरवून घेण्यासाठीं मुलाचं व्यावहारिक नांव 'राजा' हेंच रूढ केलं होतं.

आपल्या जीवितांतल्या आनंदाचा हा एकमेव ठेवा जतन करतांना माईंनीं थोडेथोडके कष्ट सहन केले नाहींत. देवी, गोवर, डांग्या खोकला इत्यादि हरएक प्रकारचीं दुखणीं राजाला झालीं आणि त्या प्रत्येक वेळीं माईंच्या हृदयाचं पाणीपाणी होऊन गेलं. दुखणं आलं कीं तें सौम्य स्वरूपाचं नसायचं हा जणूं नियमच ठरून गेला होता. प्रत्येक वेळीं राजाबाळ मरणाच्या दारीं जाऊन बसायचे आणि त्यांना तिथून परत आणतांना माईंच्या नाकीं नऊ यायचे ! डॉक्टर-वैद्यांचीं औषधं राजाच्या पोटांत आतांपर्यंत किती गेलीं याची गणती नव्हती. औषधाबरोबर अंगारे-धुपारे आणि ताईत-दोरेहि त्याच्या अंगावर चढत होते. कुणीं कांहीं सांगितलं आणि माईंनीं तें केलं नाहीं, असं व्हायचंच नाहीं कधीं. माई स्वभावाच्या दुष्ट नव्हत्या. अडल्या-

नडल्याची कींव येऊन त्यांनीं मदत केल्याचीं कितीतरी उदाहरणं शेजाऱ्यांना माहीत आहेत. पण अशा कनवाळू माईनींहि दुसऱ्याच्या एका मुलावर कसलं तरी प्राणघातक चेटुक केलं, असा प्रवाद त्यांच्यावर आहे! आपल्या मुलावरलं गंडांतर टाळण्यासाठीं त्यांनीं भोळेपणानं तसं कांहीं केलं नसेलच असं तरी कसं म्हणायचं?

पण कांहीं असलं तरी आजची राजाबाळाची गोंडस मूर्ति ही माईच्या जपणुकीमुळंच निर्माण झाली ही गोष्ट सर्वस्वीं खरी होती. इतक्या कष्टासायासांनीं लहानाचा मोठा केलेला आपला लेक सदैव सुखरूप असावा असं माईना वाटल्यावांचून कसं राहील? तो शिंकला, खोकला, रोजच्यासारखं जेवला नाहीं, तर त्यांचा जीव खालींवर होईच, पण थोडासा नजरेआड झाला, तरी त्यांच्या उरांत धडधड सुरू होई. आतां तो शाळेंत जाऊं लागला होता. पण तो घरीं येईपर्यंत माईच्या जिवांत जीव नसे! त्यांच्या या हळवेपणाची त्यांच्या शेजारणी टिंगल करीत, पण माईचं तिकडं लक्ष नसे.

राजाचे वडील अकालीं गेले असले आणि त्यांची पित्याची माया त्याला अनुभवायला मिळत नसली, तरी जगांत लागणारी माया त्यांनीं भरपूर मागं ठेवली होती. राजाबाळाच्या सुखाची कोणतीहि गोष्ट करतांना मागंपुढं पाहण्याची माईना आवश्यकता नव्हती. राजाबाळाचे कपडे, त्याचे खेळ, त्याचे दागिने पाहून तो कोणा जहागिरदाराचा लेक असावा असाच अनोळखी माणसाचा ग्रह होई! दुसऱ्या मुलाच्या अंगावर नवं आणि नखरेबाज कांहीं दिसलं आणि तें आपल्या राजाबाळाला माईनीं केलं नाहीं, असं व्हायचंच नाहीं कधीं!

नुसता एकुलता एक म्हणून तर माईना राजाबाळची अपुरवाई वाटेच, पण त्याचं कौतुक करावं असे गुणहि त्याच्या अंगीं होते. राजाबाळ रूपानं सुंदर होता. गोरापान नि बाळसेदार. वाडींतील रहिवासी सार्वजनिक गणेशोत्सव करीत. त्यांत थोरांप्रमाणं लहान

मुलांचेहि विविध करमणुकीचे कार्यक्रम होत. त्या कार्यक्रमांतल्या मुलींच्या नृत्यांत मुरलीधराची भूमिका राजाबाळाला इनाम मिळाल्यासारखी होती! पीतांबर नेसून, शेला, पुष्पमाला, किरीट अशा वस्त्रालंकारांनीं नटलेला राजाबाळ त्या बालगोपींच्या मधोमध पावा तोंडाशीं धरून उभा राहिला म्हणजे खऱ्याखुऱ्या मुरलीधरासारखा शोभून दिसे. त्या कार्यक्रमाला हजर असलेल्या एक आजीबाई माईंना म्हणाल्या होत्या, 'लेकाची दृष्ट काढा हं माई घरीं गेल्याबरोबर.' त्या वेळीं माईंचे डोळे धन्यतेच्या अश्रूंनीं डबडबले होते आणि त्यांनीं घरीं जाऊन राजाबाळावरून मीठमोहऱ्या उतरून शेगडींत टाकल्याहि होत्या. मुरलीधराच्या त्या वेषांतल्या राजाबाळाचा फोटो काढून घेण्यास माई विसरल्या नव्हत्या आणि त्याची मोठी प्रत तयार करवून त्यांनीं दिवाणखान्यांत ठळक जागीं लावून ठेवली होती. पाहुण्यामंडळींनीं खरा मुरलीधर म्हणून त्या तसबिरीपुढं हात जोडलेले पाहिले म्हणजे माईंच्या मनांत कृतार्थता तुडुंब भरल्यासारखी होई!

थोडक्यांत सांगावयाचं म्हणजे राजाबाळ म्हणजे माईंचा बाहेरचा प्राणच बनला होता आणि त्या प्राणाची जपणूक त्या डोळ्यांत तेल घालून करीत होत्या. या आईच्या जपणुकीनं राजाबाळाचं शरीर बाळसेदार बनलं तरी त्याचं मन भित्रं आणि मिजासखोर होऊन गेलं होतं, ही गोष्ट माईंच्या लक्षांत आली नव्हती आणि राजाबाळाच्या पोरबुद्धीला तर तें उमगणं शक्यच नव्हतं. बरोबरीच्या मुलांमुलींचा खेळ रंगांत आलेला बघितला कीं आपण त्यांत मिसळावं आणि त्यांतला आनंद लुटावा असं त्याला वाटे आणि त्या ऊर्मीसरशीं तो खेळायला जाई सुद्धां. पण त्या धकाधकींत जरासं खरचटलं, विटी कपाळावर लागली किंवा चेंडूनं बोट दुखावलं कीं तेवढं दुखणं त्याला महिनाभर पुरे. खेळांतले सगळे डाव आपलेच झाले पाहिजेत अशी त्याची इच्छा, पण ती सफल कशी व्हावी? एखादा—एखादाच कां, बिनसरावामुळं

बहुतेक डाव त्याच्यावरच उलटत आणि तसं झालं म्हणजे राजाबाळ गळा काढून माईच्याकडं धांव घेई !

अशा वेळीं वडील माणसांनीं जन्मभर पुरणारं व्यावहारिक शिक्षण मुलाला द्यायचं असतं. जगाच्या झगड्यांत माणसाची नेहमींच जीत होत नाहीं. कधीं जीत तर कधीं हार व्हायची हें ठरलेलंच असतं. जय झाला म्हणून शेफारूं नये, तसं पराजय झाला म्हणून रडत बसूं नये, ही गोष्ट वडील माणसांनीं मुलांना शिकवली पाहिजे. पण माईंना आपली ही जबाबदारी कळली नाहीं. डाव अंगावर आल्याबद्दल राजाबाळ रडत आला कीं, 'आला तर आला तुझ्यावर डाव, दुसरा डाव तूं कर म्हणजे झालं' असं म्हणण्याऐवजीं 'व्रात्य पोरांत तूं जातोसच कशाला खेळायला? तूं आपला घरींच खेळत जा. मास्तरांच्या मधूबरोबर आणि सुमाबरोबर खेळत जा' अशी त्याची समजूत त्या घालीत. मुलानं घरच्या घरीं आपल्याहून लहान मुलांत खेळण्यांत सुरक्षितता आहे हाहि माईंच्या मनांतला हिशेब असे. त्यासाठींच त्यांनीं राजाबाळाला सोंगट्या, कवड्या, पत्ते असे खेळ आणून दिले होते. राजाबाळ खेळांत मधूसुमावर नेहमीं डाव देई. सुमावर सागरगोट्यांचीहि तो हंडी करी आणि माईंना मोठ्या अभिमानानं आपली बढाई सांगे !

राजाबाळ आतां दहा वर्षांचा झाला आणि वयाच्या मानानं त्याची शिकण्यांत प्रगतीहि चांगली असे. त्यांची बुद्धि तल्लख होती. चारदोनदां वाचल्यावर त्याचे धडे पाठ होत. दहावे वर्षीं चौथी पास होऊन तो इंग्रजी पहिलींत गेला, तेव्हां माईंनीं थाटानं सत्यनारायण केला. शेजारच्या बारा वर्षांच्या केशवनं अद्यापि चवथींत रखडावं आणि आपल्या दहा वर्षांच्या राजानं एबीसी काढायला सुरवात करावी याचं माईंना कौतुक वाटणं साहाजिक होतं. पण या कौतुकाचं सतत प्रदर्शन करण्यांत आपण मुलाचं अकल्याण करीत आहों हें त्यांना कळत नव्हतं. 'काय तो केशव ! नाहींतर आमचा राजाबाळ ! केशव दुसरी तिसरी गांठीपर्यंत आमचा राजाबाळ म्याट्रिकसुद्धां होऊन जाईल.' हे आईचे

उद्‌गार दिवसांतून चारदोनदां राजाबाळाच्या कानांवर पडत आणि त्यामुळं आपण अगदीं बृहस्पति आहों असं त्याला वाटूं लागे.

राजाबाळची वाढ अशा वातावरणांत होत होती. सुबत्ता आणि ममता यांचं वरदान त्याला मिळालं होतं. पण हें वरदानच त्याला बाधक ठरेल याचा उमज त्या वेळीं कुणाला पडला नाहीं.

राजाबाळ कुठं गेला, कसा गेला म्हणून माई अधीर झाल्या, घाबरल्या. ज्या सुमीबरोबर त्याला खेळत बसायला सांगितलं होतं त्या सुमीचाहि पत्ता नाहीं. फराळाची वेळ टळते आणि केलेला थाटमाट वायां जातो याचा विरस वाटण्यापेक्षां 'बाळाला कांहीं झालंबिलं तर नाहीं' ही धास्ती माईच्या मनाला कासावीस करूं लागली.

खेळांत दंग झालेलीं मुलें दाद देईनात, म्हणून राजाबाळ जिथं जिथं जाण्याचा संभव होता तिथं तिथं शोध करून येण्यासाठीं त्यांनीं मोलकरणीला धाडलं. घटकाभरांत तीहि 'बाळ कुटंबी न्हैत' म्हणून सांगत परत आली!

माईचा धीर सुटूं लागला. तो सत्वर आणि सुखरूप परत येऊं दे, म्हणून घटके-घटकेला नवा नवस त्या मनांत करूं लागल्या.

सुमा-मधूच्या आयाहि शोधायला आल्या. तीं दोघेंहि बेपत्ताच होतीं. एकाबरोबर तिघांची काळजी! पण तीहि एकट्या माईनाच. मधूची आई म्हणाली—

"येतील मेलीं परत भूक लागली म्हणजे. कोण गिळायला घालायला बसलंय?"

सुमीच्या आईलाहि फारशी फिकीर वाटल्याचं दिसलं नाहीं. ती म्हणाली—"या कार्टीला मागची शुद्ध म्हणून असायची नाहीं. आली म्हणजे झोडपून काढतें चांगली."

"कांहीं काळजी करूं नका, माई," म्हणून दोघी शेजारणी निघून गेल्या. पण काळजी कमी होण्याऐवजीं माईची काळजी क्षणाक्षणानं वाढतच चालली!

दहा वाजून गेले, अकरावरून काटा पुढं सरकूं लागला. माईंचे डोळे पाझरूं लागले.

स्वस्थ बसून टिपं गाळण्यानं गळबटलेला बाळ थोडाच सांपडणार? माई स्वतः शोध करायला बाहेर पडल्या.

वाडीच्या तोंडाशीं त्या जातात तोंच ओक्साबोक्शीं रडत असलेला राजाबाळ आणि चोरट्या चेहऱ्याचीं सुमामधू येत असलेलीं त्यांना दिसलीं! 'आई गऽ' असा हेल काढून राजाबाळानं माईच्या पायाला मिठी मारली.

एकीकडं मुलाला त्रास झाल्याचा कळवळा आणि एकीकडं तो सांपडल्याचं समाधान अशा दुहेरी विकारांत माई बावरून गेल्या!

* * *

# २

राजाबाळ रडत कां आला? तो कुठं पडला होता, त्याला कुठं लागलं होतं कीं त्याला कुणीं मारलं होतं?

यांपैकीं कांहींहि झालं नव्हतं.

मग झालं होतं तरी काय?

सोंगट्या खेळण्यासाठीं सुमाला बोलवायला तो गेला. न्हाऊन आणि नवा परकर नेसून सुमा देवाला निघाली होती. तिच्या आईनं तिला देवाला जायला सांगितलं होतं. नुसतं सांगितलंच नव्हतं, तर देवदर्शन घेऊन आल्यावांचून खेळायचं किंवा खायचं नाहीं अशी ताकीद दिली होती. त्यामुळं तिचा निरुपाय झाला होता. तिनं राजाबाळला तसं सांगितलं आणि म्हटलं—"तूंहि चल ना? जवळच्या भुवनेश्वरला जाऊन येऊं या म्हणजे झालं. देवळांत दिवाळीची खूपखूप जंमत असती तिथं. कित्ती माणसं येतात बघायला! येतोस?"



वाडीच्या तोंडाशीं त्या जातात तोंच ओक्साबोक्शीं रडत असलेला बाळ व
चोरट्या चेहऱ्याचीं सुमामधू त्यांना दिसलीं.

राजाबाळ तिच्याबरोबर भुवनेश्वराच्या देवळांत गेला तो नाखुषीनंच. देवाला जाऊन आल्यावांचून सुमा खेळायला येतच नाहीं, तेव्हां एकटं घरीं जाऊन करायचं तरी काय, अशा समजुतीनं तो गेला. जातांना त्यानं तिला बजावलं होतं—“ सुमा, देवळांत फार वेळ घालवायचा नाहीं हं. अगदीं धांवत जाऊन पळत यायचं. ”

जातांना दोघं खरोखरच धांवत गेलीं. पण परत येतांना पळत यायचं भान त्यांना राहिलं नाहीं. कारण भुवनेश्वर मंदिरांतली आजची शोभा अवर्णनीय होती. ती पाहून कुणाचंहि मन दंग झालं असतं. भुवनेश्वराला भरजरी पोशाख घातला होता. त्याच्यावर हिऱ्यामाणकांचे अलंकार चमचमत होते. फुलांचा, उदबत्त्यांचा सुगंध दरवळून राहिला होता. गाभाऱ्यांत आणि सभामंडपांत दिव्यांची लयलूट केली होती. इतर वेळीं भरदुपारींहि अंधार असायचा, त्या ठिकाणीं या वेळीं लखलखाट झाला होता आणि जिथं दिवसांतून एखादाच भाविक भक्त आला तर यायचा, तिथं त्या वेळीं शेंकडों माणसांची रीघ लागली होती. भुवनेश्वराची प्रातःपूजा होऊन आरती सुरू झाली होती आणि शेंकडों माणसं टाळ्यांचा ताल धरून ‘ओवाळूं आरती’ला साथ देत होती.

आरती झाली, मंत्रपुष्प झालं. पुजाऱ्यानं शंखतीर्थ भाविकांच्या अंगावर शिंपडलं, आणि ‘जय जगन्नाथ’ ‘जय भुवनेश्वर’ असा जयजयकार करीत, इतका वेळ जागेला खिळून राहिलेला भक्तगणं प्रदक्षिणेला निघाला.

राजाबाळ आणि सुमा पांच प्रदक्षिणा घालून परत जाणार होतीं. पण गर्दीतून त्यांना येऊन मिळालेल्या मधूनं त्यांचा तो विचार बदलायला लावला. त्यानं एक नवीन बातमी आणली होती. चंदन-वाडींतल्या महिलामंडळांत आज रांगोळ्यांचं प्रदर्शन होतं आणि त्यांत सुरेख चित्रं होतीं. त्याच्या वर्गातल्या वासूनं स्वतः पाहून येऊनच

त्याला ती वर्दी दिली होती. एवढंच नव्हे, तर 'मध्या, तूं वाटेल तें झालं तरी तें प्रदर्शन येच पाहून' असा आग्रहहि केला होता. आणि अगदीं आपणालाच कळलेली गुप्त माहिती सांगितली होती, ती ही कीं, त्या पांचपन्नास चित्रांतलं रुक्मिणीहरणाचं चित्र आपल्या शाळेतल्या नवरेबाईंनीं काढलं असून त्याला पहिलं बक्षीस मिळायचं आहे!

"काय बघायचं त्या रांगोळीच्या चित्रांत? त्यापेक्षां माझ्याजवळ गमतीदार रंगीत चित्रांचे आल्बम आहेत ते तुम्हांला दाखवतों" असं राजाबाळनं म्हटलं, पण आपल्या नवरेबाईंच्या रुक्मिणीहरणापुढं सुमाला त्याची मातब्बरी वाटेना. ती मधूबरोबर महिलामंडळांत जायला निघाली आणि पुन्हा निरुपाय होऊन राजाबाळला सुमामधूंबरोबर रांगोळ्या पाहायला जावं लागलं.

महिलामंडळांतलं प्रदर्शन पाहून बाहेर पडेपर्यंत दहा वाजायला आले. पण निरनिराळ्या मौजांत दंग झालेल्या मुलांना वेळेचं भान थोडंच रहातंय? तसं राहिलं असतं तर आतां तरी तें त्रिकूट घरीं परत आलं असतं. पण तसं झालं नाही.

चंदनवाडीच्या कोपऱ्यावर तीं मुलं येतात, तों त्यांचा खेळगडी बाळ हर्षे धांवत धांवत त्यांच्यासमोर आला आणि म्हणाला—"ए चला रे, पलीकडच्या चौकांत गारुड्याचा खेळ चाललाय! म्हाद्या जोशानं सांगितलंय. चंद्या शेलार गेलासुद्धां बघायला आणि मियाभाईंची रोशन-सुद्धां गेली म्हणे. फार गमतीदार खेळ असतो गारुड्याचा!"

गारुड्याचा खेळ! जादू! मजाच मजा! तिनं मुलांच्या मनाला खेचलं.

गारुडी हातांत खडा घेई आणि चल चल म्हणतांच त्याचा रुपया करून दाखवी. मुठींत धरलेल्या रुपयास 'फुक मारतो, मट्टी लगातो' म्हणून नाहींसा करी! एका टोपणाखालीं झांकलेली गोटी नाहींशी करून

दुसऱ्याच टोपणांतून काढून दाखवी! मधूच्या नाकांतून त्यानं रुपया ओढून काढला, तेव्हां मुलंच काय पण मोठीं माणसंहि खो खो हसूं लागलीं! तास दीड तास केव्हां गेला हें कुणाच्या लक्षांतहि आलं नाहीं.

जादूचे प्रयोग पुरे करून गारुड्यानं सापाच्या टोपल्या पुढं घेतल्या. त्याची पुंगी वाजूं लागली. टोपली अर्धवट उघडून त्यानं आंत हात घातला आणि झटकन् काढून घेऊन पटकन् टोपली मिटली, त्या वेळीं मुलं दचकलीं. पुंगी जोरानं वाजूं लागली. झांकण उचललं. आंतला नाग झोंपलेलाच. गारुड्यानं त्याला बोटानं डिवचलं. त्यानं फुस्स करून गारुड्याच्या हातावर फणा मारली; आणि नंतर हातभर उंच होऊन पुंगी फिरेल तसतशी तो मान डोलवूं लागला. नागोबाचा डौलदार फणा मोहक होता, पण भित्र्या लोकांच्या मनांत धडकीहि भरवीत होता.

पांच-चार मिनिटं त्या नागाला डोलविल्यावर गारुड्यानं दुसरी एक टोपली पुढं घेतली. तिचीहि पहिल्यासारखीच उघडझाप करून त्यानं प्रेक्षकांना दचकवलं. एक काळा निळा नागोबा वळवळत टोपलीबाहेर पडला. दोन नाग दोन दिशांना सरसरत चालले तसतसे बसलेले प्रेक्षक उभे राहिले आणि त्यांचं कोंडाळं आपोआप पैस होऊं लागलं. 'पीछे हटो, पीछे हटो' म्हणून गारुडी इतका वेळ दबवीत होता तरीहि बालप्रेक्षक पुढंपुढंच घुसत होते. होतां होतां पोरं त्याच्या पोतडीपासून हात दोन हातांवर आलीं होतीं. त्यांचा हा वेढा ढिला करण्यासाठींच गारुड्यानं नागोबाचं हें अस्त्र बाहेर काढलं होतं.

वळवळत चाललेला एक नाग गारुड्यानं आणि दुसरा त्याच्या साथीदारानं उचलला. आणि गुरं वळविण्यासाठीं चाबूक खेळवावा त्याप्रमाणं त्यानं नागोबांना हेलकावे देण्यास सुरुवात केली. मुलंच काय, पण दांडगेदुंडगे प्रेक्षकहि नागोबा डसेल या भयानं मागं मागं सरकूं लागले.

गारुडयानं टोपली उघडल्यापासूनच राजाबाळ ‘चल रे मधू, चल ग सुमा,’ करायला लागला होता. पण तीं दोघं खेळ अर्धवट सोडून जायला तयार नव्हतीं. राजाबाळची चुळबुळ पाहून मधू म्हणाला— ‘एहेरे भागुबाई! सापाला इतकं भ्यायला काय झालं? हे साप कांहीं चावत नाहींत. दांत काढून टाकलेत त्यांचे.’

सुमानंहि त्याचीच री ओढली. ती म्हणाली, ‘होयच, नाहींतरी. आमचा अण्णा म्हणतो ‘गारुड्याचा नाग अन् पडवळ सारखंच.’ पडवळ चावतं का कधीं? झालं तर मग. भारीच बाई भितोस तूं राजाबाळ!’ एवढं म्हणूनच ती थांबली नाहीं, तर गारुड्याच्या हातावर लोंबत असलेल्या सापाच्या शेपटीला तिनं हातहि लावला!

“ए सुमे!” राजाबाळ किंचाळला. त्याची बोबडी वळायला लागली. सुमाचा तो धीटपणा पाहून तो चाचरत म्हणाला—“काकींना सा- सांगतों, सुमी सापाला शिवली म्हणून. साप चावला नाहीं तरी त्याच्या नुसत्या फुसकाऱ्यानंसुद्धां मरायला होतं बरं का.”

“पण शेपटीनं का फुसफुसतो साप? मीं शेपटीला हात लावला सापाच्या.”

सुमानं खुलासा केला, पण राजाबाळच्या छातींतली धडधड कमी होईना. सुमाचं मनगट धरून तिला ‘आतां घरीं चल’ असा तगादा त्यानं सुरू केला. पण सुमा-मधूनं त्यालाच दाबून ठेवलं.

राजाबाळ मुसमुसून रडायला लागला.

मधूनं धिटाईचं अवसान आणलं असलं तरी राजाबाळप्रमाणं तोहि मनांतून भ्याला होता. सापाचा चाबूक आपल्या अंगाला लागेल या भयानं इतरांबरोबर तोहि मागं मागं सरकूं लागला आणि कांहीं वेळानं तर आपल्या सोबत्यांची आठवणहि त्याला उरली नाहीं! रेटारेटींत राजाबाळ आणि सुमा त्याची बरोबरी करूं शकेनात. त्या धांदलींत

राजाबाळच्या पायावर कुणाचा तरी पाय पडला. त्या वेदनेनं तो कळवळला. त्यानं किंकाळी ठोकली.

त्याच्या त्या ओरड्यानं बघ्यांपैकीं कांहीं लोक खिदळूं लागले. पण एका कनवाळू माणसाला बाळचा तो घबराट हसण्यासारखा वाटला नाहीं. त्यानं हात देऊन त्याला गर्दीबाहेर काढलं, धीर दिला. पण राजाबाळच्या रडयाला अधिकच जोर चढला.

राजाबाळचा तो आक्रोश पाहून सुमा-मधूंनाहि घाबरल्यासारखं झालं. ज्याला आपण हौसेनं मौज बघायला आणलं त्याच्याबरोबर हसत-खेळत घरीं जाण्याऐवजीं अशी वाजंत्री वाजायला लागल्यावर त्या मुलांना घाबरायला न होईल तर काय होईल ?

“ इश्श ! असं रे काय करतोस राजाबाळ ? उगीचच्या उगीच रडूं नकोस बाबा. ” सुमा त्याला विनवूं लागली.

मधूनंहि आपल्याकडून त्यानं तोंड मिटावं म्हणून विनवणी केली, पण उपयोग होत नाहींसं पाहून तो चिडला आणि म्हणाला—“ सुमे, बसूं दे हा रडत हवा तेवढा. आपण जाऊं या आपले दुसऱ्याच रस्त्यानं पळत घराकडं. ”

पण राजबाळाला सोडून एकटं घरीं गेल्यास माई रागावतील एवढंच नव्हे, तर आपली आईहि रागं भरील—फार काय, पण मारील सुद्धां, हें भय सुमाच्या पोटांत होतं. मधूलाहि तें पटलं आणि रडतराव राजाबाळाची मिरवणूक घरापर्यंत संभाळून नेण्यावांचून त्यांना गत्यंतर उरलं नाहीं !

राजाबाळ घरीं आला हें पाहून माईंना हायसं वाटलं. त्यांच्या मनावरलं मोठं दडपण हलकं झालं आणि तो असा गळा काढून कां रडतो आहे हा नंतरचा प्रश्न.

“ काय झालं माझ्या राजाला ? ” माईंनीं राजाला पोटाशीं धरीत विचारलं.

आईच्या या सहानुभूतीनं त्याच्या रड्याला अधिकच जोर चढला.

"आम्हीं कांहीं केलं नाहीं, माई." सुमा रडकुंडीच्या स्वरांत म्हणाली.

"सापाला भिऊन रडतोय तो." मधूनं थोडासा खुलासा केला.

"सापाला?" माई भीतियुक्त स्वरांत उद्गारल्या—

"कुठं होता साप? नाहीं तिथं गेलां होतां कशाला?"

"गारुड्याचा खेळ बघायला गेलों होतों आम्ही." मधूनं आणि सुमानं सगळी हकीकत सांगितल्यावर माईचा जीव भांड्यांत पडला. गारुड्याचा साप घातकी नव्हे आणि राजाबाळ भ्याला असला तरी त्याला कसलाहि अपाय झालेला नाहीं अशी माईंची खात्री झाली.

त्या घरीं गेल्या. मधू-सुमा आपापल्या घरीं गेलीं. बाबापुता करून राजाबाळाला उगी करण्यांत माईचा अर्धा तरी तास गेला. मुलाचा भेदरटपणा काढून टाकणं हें आपलं कर्तव्य माईंच्या लक्षांत आलं नाहीं. गारुड्याचा साप दोरीसारखाच, तो चावत नाहीं नि चावला तरी त्याची कसली बाधा होत नाहीं असं सांगून राजाबाळच्या मनांतली धास्ती दूर करण्याऐवजीं मधूसुमासारख्या खट्याळ पोरट्यांच्या नादानं कुठं जाऊंच नये, आपणासारख्या थोरामोठ्यांच्या मुलानं भिकारड्या पोरांबरोबर इतकी गट्टी करूंच नये, असं भलतंच वेड त्याच्या मनांत माई भरीत राहिल्या.

त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. राजाबाळ भेदरट राहिला तो राहिला आणि आपल्या रोजच्या खेळगड्यांपेक्षां आपण कोणीतरी बडे आहोंत असा अहंकार त्याच्या डोक्यांत भिनला.

मुलं झाल्या गेल्या गोष्टी तेव्हांच विसरून जातात. काल राजाबाळला रडवायला आपण कारण झालों या समजुतीनं सुमा कांहीं वेळ दूर दूर राहात होती, पण आज ती त्याच्याकडं आलीच. काल राजाबाळ म्हणाला होता तो रंगीत चित्रांचा अल्बम पाहायचा होता तिला. तिनं तो मागितला तेव्हां राजाबाळ बेपर्वाईनं म्हणाला—

"आल्बम ठेवलाय तुझ्या बापानं. चालती हो इथून." सुमा खट्टू झाली. त्यापेक्षां त्या उर्मट उत्तरानं तिचा अपमान झाला; तो तिच्या मनाला झोंबला.

थोड्या वेळानं मधू आला. आपण केलेला एक विक्रम राजाबाळला दाखवायसाठीं तो हौसेनं आला होता. सुईसारख्या बारीक नि उंच पायाचा एक हिरवागार टोळ त्यानं परसांतल्या गवतांत पकडला होता आणि एका रिकाम्या कागदी डबींत घालून ती शिकार राजाबाळला दाखवायला आणली होती. मधू दिसतांच त्याचीहि सुमाप्रमाणंच बोळवण करावी असं त्याला क्षणभर वाटलं. पण मधूनं 'बघितलीस का काय जंमत आणलीय ती' म्हणून डबी पुढं करतांच तो ती जंमत बघायला धांवून आला.

"काय आहे रे?" राजाबाळानं विचारलं.

"ओळख." मधू म्हणाला.

"पेणसली."

"अं हं."

"खडू—रंगीत खडू—"

"अं हं—"

"गोळ्या!"

"अं हं—बघ वाजताहेत का?" मधूनं त्याच्या कानापाशीं डबी हलवली.

"मग तूंच सांग नि दाखव काय आहे तें." राजाबाळ घाईला आला.

"घोडा आणलाय पकडून."

"घोडा? एहेरे खुळचट! घोडा एवढ्याशा डबींत घालायला येईल होय?"

"तीच तर मजा आहे!"

" मग दाखीव कीं लवकर. "

" बघ तूंच डबी उघडून. "

राजाबाळनं डबी उघडली; पण मधूच्या घोडयाची मज्जा दिसण्याऐवजीं त्यानं टुण्कन् उडी मारली त्याच्या डोक्यावर! ई ऽऽ —अशी किंकाळी फोडून राजाबाळ डोकं झाडूं लागला. डबींत आणखी असलंच कांहींतरी असेल या भयानं त्यानं ती भिरकावली ती खिडकीबाहेर रस्त्यावर जाऊन पडली!

राजाबाळच्या किंकाळीनं माई धांवून आल्या.

" काय झालं ? " त्यांनीं विचारलं.

" मा—माई ग, या म–मध्यानं म–माझ्या अंगावर विंचू टाकला ग. "

" विंचू ? होय का रे मधू ? "

" नाहीं हो माई. "

" खोटं नको बोलूं मध्या. किनई, माई, यानं विंचू आणला होता डबींत घालून. डबी उघडतांच त्यानं उडी मारली माझ्या डोक्यावर."

" कां छळतां रे या गरीब पोराला असं ? असले कसले हे घातकी खेळ! काल साप झाला, आज विंचू आणला. मधू, असा त्रास द्यायला तूं येत जाऊं नको राजाबाळकडं. सांगून ठेवतें तुला. " माईंनीं हुकूम सोडला.

" पण माई, " मधू म्हणाला, " मी तरी विंचू कसा हो आणीन ? चावला नसता का तो मला ? आणि विंचू उडी मारील होय ह्याच्या डोक्यावर ? "

आपण पुरता विचार न करतां मधूवर रागावलों हें माईंना उमगलं. त्या वरमल्या. पण तसं न दाखवतां त्या म्हणाल्या—

" विंचू नसला तरी गांजणी नाहींतर गांधिलमाशी आणली असशील. कांऽऽहीं नेम नाइ तुझा. मी रोजचं बघतें आहें, कांहीं ना कांहीं



" मधू , असा त्रास द्यायला तूं येत जाऊं नको
राजाबाळाकडे, सांगून ठेवतें तुला. " माईनीं हुकूम सोडला.

करून आमच्या बाळाला छळण्यांत तुम्हां सगळ्या पोरांना आनंद. असले छळवादी खेळगडी असून करायचे काय ? त्यापरीस नसलेलेच बरे. जा बघूं तूं आपल्या वाटेनं. अन् फिरून इकडं आलास तर बघ. ” एवढं बोलूनच माई राहिल्या नाहींत, तर दंडाला धरून त्यांनीं मधूला बाहेर काढलं !

आपण मधूवर मोठा विजय मिळवला अशा दिमाखानं राजाबाळ त्याच्याकडं पाहात होता !

कारण नसतांना माईनीं आपला पाणउतारा केला ही गोष्ट मधूच्या मनाला झोंबली. आपण मिळवलेली शिकार राजाच्या बावळटपणामुळें निसटली, एवढंच नव्हे, तर डॉक्टरांची मनधरणी करून मिळवलेली रोठाची डबीहि राजानं फेंकून दिली, हें नुकसान त्याच्या मनांत डांचत होतं. याचं उट्टं कांहींहि करून काढलंच पाहिजे, अशी सूडबुद्धि त्याच्या डोक्यांत उचल खाऊं लागली होती.

सुमाची आणि मधूची भेट होऊन जेव्हां एकमेकांचे अनुभव एकमेकांला कळले, तेव्हां राजाबाळची गट्टी कायमची फू करायचा आणि त्याची केव्हां ना केव्हां चांगली फजिती करायचा त्यांचा निश्चय झाला. वाडींतल्या दुसऱ्या खेळगड्यांना आपल्या कटांत घ्यायलाहि त्यांना वेळ लागला नाहीं.

सुमामधूंची हकालपट्टी करण्यांत राजाबाळला क्षणभर आनंद वाटला, तरी त्यांच्यामुळं ओढवलेला एकलकोंडेपणा त्याला सुखावह होईना. कुणीतरी खेळायला पाहिजेच असं त्याला वाटायला लागलं. आपणच जाऊन त्यांना बोलावून आणावं असं एकदां त्याला वाटलं, पण तसं करायची त्याला लाजहि वाटूं लागली. ‘आपले खेळगडी आपण होऊन आले तर काय बहार होईल, पण तें शक्य नाहीं’ या विचारानं तो कष्टी झाला. पण शेवटीं त्याला एक युक्ति सुचली.

वाडीच्या पटांगणावर मुलांमुलींचा घोळका जमला होता. निरनिराळे खेळ चालले होते. मुलं त्यांत दंग होऊन गेलीं होतीं. राजाबाळ

चाकोलेटच्या पुडा घेऊन तिथं गेला. पण त्याचा हा बेतहि साधण्याचं चिन्ह दिसेना.

दिवाळी असल्यामुळं घरोघरीं यथेच्छ खायला मिळत होतं म्हणून असो, खेळापुढं खाऊची मातब्बरी वाटली नाहीं म्हणून असो, किंवा राजाबाळाविरुद्ध सुमामधूंनीं मनं कलुषित केल्यामुळं असो, मुलांपैकीं कोणीच त्याच्याकडं येईना. उलट ते खेळगडी आपणाकडे पाहूनहि न पाहिल्यासारखं करतात असं राजाबाळला दिसलं आणि त्यानं तो खजील झाला. तरीपण त्यांना आपणाकडं खेचण्याचा त्यानं आणखी एक प्रयत्न केलाच. रिंगणलंगडीच्या खेळापाशीं जाऊन तो म्हणाला—

" ए सोन्या, या मन्याला तूं पकडलंस, तर तुला दोन चाकोलेट वड्या देतों."

" बाजूला व्हा भागूबाई ! मोठ्या आल्या आहेत चाकोलेट द्यायला." सोन्या म्हणाला.

" राजा, आमच्या खेळांत यायचं कारण नाहीं तुला. हें लेकाचं लुब्रेपणानं खेळायला येतं आणि रडत जातं. लंगडं तें लंगडं—चल हो दूर." मन्या कडाडला.

राजाबाळ मनांतून ओशाळला, पण हट्टालाहि पेटला. तो म्हणाला—

" तूं कोण मला चालता हो म्हणणार ? मी कांहीं तुझ्या घरांत नाहीं. हा मी हित्तं बसणार. काय करणार तुम्ही माझं ?"

आणि खरोखरच तो रिंगणाच्या मधें जाऊन मांडी घालून बसला.

" राजा, मुकाट्यानं बाजूला हो." मन्या.

" लाथा खायच्या आहेत वाटतं ?" सोन्या.

" अरे, हें मरतुकडं सरळ सांगून ऐकायचं नाहीं. तंगडी धरून फरफटत ओढीत नेऊं या लेकाला." पुंड्या.

" ए, याच्या अंगाला बोटसुद्धां नका लावूं. यानं एकदां भोकाड पसरलं कीं कुणाला ऐकायचं नाहीं. आणि वरतीं माईच्या शिव्या मिळतील. " मधू.

" काय म्हणून शिव्या देणार ? यानं अगोदर नांव काढलंय आमचं. आणि तरी माई शिव्या द्यायला लागली तर मीहि दुप्पट शिव्या देईन. लाडका लेक असला तर तिच्या घरीं. राजा, मुकाट्यानं उठतोस कीं देऊं —? " असं तावातावानं बोलून पुंड्यानं बुक्की मारण्यासाठीं मूठ वळलेली पाहतांच राजाबाळची घाबरगुंडी उडाली. " ओय् ओय् मेलों मेलों " असं ओरडत तो घराकडं धांवला. गडबडींत चाकोलेटचा पुडा हातांतून निसटला आणि अंगणभर वड्या उधळल्या. एवढ्यावरच थांबलं असतं तर नशीब, पण ठेंच लागून राजाबाळनं साष्टांग नमस्कार घातला.

त्याच्या आक्रोशानं घाबरलेल्या माई धांवत आल्या, तों पटांगण मोकळं ! हें प्रकरण आपल्या अंगलट येणार हें ओळखून मुलांनीं आधीं धूम ठोकली होती !

* * *

## ३

सगळ्या पोरांनीं गट्टी करून आपणांला कसं झोडपलं हें तिखटमीठ लावून राजाबाळनं माईंना सांगितलं. खरोखर त्याच्या अंगाला कुणीं बोटहि लावलं नव्हतं. पण अशा बाबतींत खोटं सांगण्याची खोड त्याला चांगलीच जडली होती. आपण कांहीं सांगितलं तरी माईला खरं वाटतं, एवढंच नव्हे, तर आपलं दुःख जितकं फुलवून सांगावं तितका अधिक कळवळा येतो, ही गोष्ट राजाबाळनं ओळखली होती; आणि या तिच्या लवचिकपणाचा घेतां येईल तितका फायदा घेण्याची

संधि तो दवडीत नसे. मुलं लहान, त्यांना कळत नाहीं, असं वडील माणसं म्हणत असतात, पण मोठ्या माणसांना चकवण्याची कला त्यांच्या अंगांत भरपूर असते.

मुलांच्या पुंडाव्यापासून आपला बाळ सुखरूप कसा राहील ही चिंता माईंना चैन पडूं देईना. वास्तविक माईंनीं दुसऱ्या दृष्टीनं विचार करायला हवा होता. मुलं म्हटलीं म्हणजे तीं खेळायचींच, दंगाहि करायचीं, भांडायचीं, दोन तडाखे द्यायचे, दोन घ्यायचे. आज भांडण झालं, गट्टी फू केली, तरी उद्यां एक व्हायचं, खेळ खेळायचे हा मुलांचा जीवनक्रम माईंना माहीत नव्हता असं नव्हे. मुलांच्या जातीचे हे नित्याचे प्रकार त्यांच्या राजाबाळनं केले असते तर त्याच्या अंगीं इतरांसारखा टणकपणा आला असता; पण माई राजाबाळला मूल बनवण्याऐवजीं फूल म्हणून जतन करीत होत्या. नाजूकपणानं त्याची जोपासना करण्यांत आपण त्याचं अकल्याण करीत आहों ही गोष्ट त्यांच्या लक्षांतहि येत नव्हती. त्याच्याबरोबरीचीं मुलंच काय, पण मुलीसुद्धां पोहायला शिकल्या, तरी तळ्याविहिरींतल्या अपघाताच्या भयानं माईंनीं राजाबाळला पोहायचं नांवहि काढूं दिलं नाहीं! वाडीच्या पटांगणावर मुलं मधें पाय घालून मोठी सायकल पळवीत. पुष्कळदां पडत, हातपाय खरचटत. पण चार-आठ दिवसांत तीं सराईत सायकलस्वार होत, तें माईंना दिसत नसे. त्यांचं खरचटणं तेवढं त्या लक्षांत ठेवीत आणि त्या भयानं त्या राजाबाळला सायकलकडे फिरकूंहि देत नसत.

राजाबाळनं फारच हट्ट धरला तर मुद्दाम टांगा नाहीं तर मोटार करून त्या त्याला कुठंतरी फिरवून आणीत.

याच जपणुकीच्या बुद्धीनं माईंनीं बिऱ्हाड बदललं. 'बाळ आतां हायस्कुलांत जाणार, त्याला शाळा लांब पडेल' हें बिऱ्हाड बदलायला सांगायपुरतं कारण होतं. पण खट्याळ पोरांपासून आपल्या लेकाला दूर

नेण्याचाच त्यांचा उद्देश होता. ज्या नव्या वाड्यांत त्या राहायला गेल्या, तिथं बिऱ्हाडाच्या दृष्टीनं सोय होती, अशांतला प्रकार मुळींच नव्हता. पण त्यांना हवी असलेली मुख्य सोय तिथं होती. त्या वाड्यांत जीं दुसरीं दोनचार बिऱ्हाडं होतीं, त्यांना राजाबाळाच्या बरोबरीचीं मुलं नव्हतीं. घाणेकर पतिपत्नींना मुलीं मूलच नव्हतं, चांदेकरांना दोघी मुली होत्या आणि त्यांतलीं एक राजाबाळाएवढी असली तरी मुलाप्रमाणं ती व्रात्यपणा करून त्याला रडवील अशी भीति माईंना वाटली नाहीं. देसायांचीं हेमा आणि जयंत तर कॉलेजांत जाणारीं. राहतां राहिले डॉ. कर्णिक. त्यांच्या घरीं आत्तां कुठं पहिला पाळणा हलूं लागला होता.

या नव्या जागीं आपण राहायला आलों याचा माईंना आनंद वाटायला आणखी एक कारण झालं होतं. तिथल्या बिऱ्हाडांत त्यांच्या राजाबाळचं सर्वांकडून कौतुक व्हायला लागलं. घाणेकर काकाकाकूं-सारख्या अपत्यसुखाला पारख्या झालेल्या नवराबायकोंना राजाबाळसारखा गोजिरवाणा आणि हुशार छोकरा पाहून आनंद वाटला व त्यांच्याकडून त्याचं कौतुक होऊं लागलं. चांदेकर भगिनी भावाची हौस त्याच्याशीं हसून खेळून पुरवून घेऊं लागल्या. हेमाजयंतांचीहि राजाबाळशीं गट्टी जमली आणि त्यांना आपल्या शाळेंतल्या जंमती सांगण्यांत आणि त्यांच्या कॉलेजच्या गमती ऐकण्यांत राजाबाळचा वेळ आनंदांत जाऊं लागला. डॉ. कर्णिकांचं नवं बाळ तर वाडयांतल्या लहानथोरांच्या करमणुकीचं साधन. त्याला न्हाऊं घातल्यावर गाणं म्हणून निजवण्याची कामगिरी चांदेकरांच्या कुंदामंदांनीं स्वखुषीनं पत्करली होती. त्यांना त्या कामीं राजाबाळहि साथ देऊं लागला.

खटयाळ पोरटयांच्या तावडींतून बाळ सुटला, एवढंच नव्हे तर नव्या परिवारांत तो रमला, त्याचं माईंना मोठं समाधान वाटूं लागलं.

पण माईंचं हें समाधान फसवं होतं. त्याच्या आसपास मुलं नसलीं,

तरी गांवांतलीं मुलं कांहीं नाहींशीं झालीं नव्हतीं. शेजारघरीं मुलं होतीं, गल्लींत मुलं होतीं आणि शाळा तर मुलांनींच भरलेली. माईंचा राजाबाळ हा स्वतः मूलच नव्हता काय? आणि मुलाच्या जातीची समवयस्क खेळगड्यांविषयीं वाटणारी ओढ त्याच्या मनाला कशी नसेल? पहिल्या खेळकर सोबत्यांशीं त्याचं जमलं नाहीं, तरी शाळेंत दुसरे सोबती त्याच्याभोंवतीं गोळा होऊं लागले, त्याचं मन जिंकूं लागले.

ज्यानं राजाबाळच्या मनावर पुरती छाप पाडली तो शाळामित्र छब्या भिंगारे तोहि राजाबाळसारखाच संपन्न आईबापांचा मुलगा होता. त्याचे वडील आबासाहेब भिंगारे हे नामांकित वकील होते. ढिगानं पैसा मिळवीत होते. त्याची आई वैनीसाहेब गांवच्या महिलावर्गांत पुढारीण मानली जात होती. महिलामंडळाचं अध्यक्षपद वैनीसाहेबांकडं होतं. आणि आबासाहेबांना पक्षकार आणि त्यांचे कज्जे याबाहेर दुसरीकडं लक्ष द्यायला जशी फुरसत नसे, तशीच वैनीसाहेबांनाहि महिलामंडळाचे वाढदिवस, हळदीकुंकू, हलव्याचीं, रांगोळ्यांचीं प्रदर्शनं, खेळांच्या चढाओढी, प्रतिष्ठित स्त्रियांचे सत्कारसमारंभ इत्यादि उसाभरींत तिळाची उसंत नसे. बायको मागेल तेवढा पैसा पुरविण्यापलीकडं प्रापंचिक कर्तव्य नाहीं, या कल्पनेंत वकीलसाहेब होते, आणि वैनीसाहेब मोलाचीं माणसं घरांत भरून बाहेरची मानमान्यता संभाळीत होत्या. भरपूर आणि किंमती कापड शिवून दिलें व जेवण-फराळाची व्यवस्था केली कीं मुलांविषयींचं आपलं कर्तव्य संपलं, असं वैनीसाहेबांना वाटत होतं. अन्नवस्त्राव्यतिरिक्त मुलाच्या आचारविचाराला वळण लावायचं कामहि आईबापांनींच करायचं असतं याची जाणीव आबासाहेबांना नव्हती तशी वैनीसाहेबांनाहि नव्हती! संपन्नतेच्या सावटांत छब्याचं आणि वेड्या मायेच्या सावटांत राजाबाळाचं रोप खुरटत होतं हें वैनीसाहेबांना आणि माईंना उमगत नव्हतं.

छब्याची आणि राजबाळची गट्टी जमायला वेळ लागला नाहीं. खेळकरपणा आणि त्याबरोबरं सहजगत्या येणारा हूडपणा छब्याच्या अंगीं नव्हता. त्यामुळं इतर मुलांची ओढ त्याच्याकडं फारशी नव्हती. छब्या बसल्या जागीं थोडयाशा टिवल्याबावल्या करून कधीं कधीं हशा पिकवी आणि मास्तरांनीं विचारलेल्या प्रश्नाला विक्षिप्त उत्तरं देऊन आपलीहि टिंगल करून घेई. त्यामुळं तो मुलगा विनोदी किंवा गमत्या वाटे आणि तेवढ्याच दृष्टीनं मुलं त्याच्याकडं पाहात. पण आपला जानी दोस्त म्हणून कुणीहि त्याच्याशीं सलगी करीत नव्हतं.

छब्याचा घरांतला बहुतेक वेळ गडीमाणसांत जाई आणि त्यांच्या तोंडची गांवढळ नि वात्रट भाषा साहजिकच त्याच्या तोंडीं बसली होती. शिवाय त्याच्या बुद्धीचा असा एक चमत्कारिक गुण होता कीं, इतरांना सहसा जें सुचायचं नाहीं तें नेमकं त्याला सुचायचं! एके दिवशीं ‘ सण ’ या शब्दाचा अर्थ समजावून देतांना मास्तरांनीं ‘सणा-दिवशीं घरीं लाडू-पोळ्या करतात’ असं सांगितलं आणि ‘ अशा सणांचीं नांवं सांग ’ असं छब्याला म्हटलं. यत्किंचित्‌हि वेळ न घालवतां ‘श्राद्ध, पक्ष’ असं छब्यानं उत्तर दिलं होतं! आणि मास्तरांची रागीट मुद्रा पाहतांच “ त्या दिवशींहि गोड जेवण करतात ” असं पुटपुटत म्हटलं होतं.

छब्याचा सिनेमा हा एक आकर्षणाचा दुसरा विजय होता. राजाबाळला सिनेमा सहसा पाहायला मिळत नसे. माई नाटक-सिनेमाला फार करून जात नसत आणि राजाबाळला एकट्यानं जाऊं द्यायला त्यांचं मन धजत नसे. शेजाऱ्यांपैकीं मुलंमाणसं जायला निघालीं, दिवसाचा कार्यक्रम असला आणि तोहि तुकाराम-ज्ञानेश्वरासारखा, तरच राजबाळला तो पाहायला मिळे. सिनेमांत चावटपणा असतो तो आपल्या मुलानं पाहूं नये असं तर माईना वाटेच, पण त्यांना खरं भय वाटे तें जागरणामुळं त्याची प्रकृति बिघडेल या गोष्टीचं.

२९५५६
क्रमांक
नों. दि.

ऐकून राजाबाळनं नाटक-सिनेमाची गोष्ट काढलीच, तर कांहींतरी सांगून त्या ती नाकारीत. आणि त्यानं फारच हट्ट धरला तर खाऊचं किंवा खेळाचं आमिष दाखवून त्या त्याला तो हट्ट सोडायला लावीत. असं करतांना एका बऱ्या गोष्टीसाठीं दुसरी वाईट गोष्ट आपण पतकरत आहों हेंहि माईंच्या ध्यानांत येत नसे! राजाबाळनं इष्काचा प्याला चित्रपट पाहायचा हट्ट सोडावा म्हणून माईंनीं त्याला वाटेल तो खाऊ घेण्यासाठीं दोन आणे दिले होते व त्या पैशाची हॉटेलांतली मिसळ खाल्लयामुळं राजाबाळचं पोट दुखूं लागल्यामुळं माईंना औषधपाण्याच्या खस्ता आणि काळजीच्या झळा सोसाव्या लागल्या होत्या!

नाटक-सिनेमासारख्या अनोळखी विषयांत छब्याची माहिती ऐकण्यांत राजाबाळ तल्लीन होई. एकदोन दिवसांआड छब्या नव्या चित्रपटाच्या गोष्टी सांगे, त्यांतल्या गाण्यांचे तुकडे गाऊन दाखवी, त्यांतल्या विनोदाच्या गमती सांगून हशा पिकवी! राजाबाळला त्यांत अवीट आनंद वाटे. बाकीचीं मुलं क्रिकेट, हुतुतूत रमलीं असलीं तरी राजाबाळ छब्याबरोबर सिनेमाच्या गप्पागोष्टींत दंग होऊन जाई, आणि त्या वेळीं त्याच्या मनांत येई, 'छब्या किती नशीबवान्! त्याला असे छान छान सिनेमे आणि नाटकं बघायला मिळतात! छब्याची आई त्याला या गमती दाखवते, अन् आपली माई मात्र आपणाला सिनेमाचं नांव काढूं देत नाहीं. नाटकं तर आपण आत्तांपर्यंत दोन-तीनसुद्धां पाहिलीं नाहींत. चांगली नाहीं आपली माई. पण तें कांहीं चालायचं नाहीं. आपण आतां सगळे चित्रपट पाहायचेच काय वाटेल तें करून.'

त्याच्या या विचारांना दुसरे दिवशींच उठावणी मिळाली. त्या दिवशीं मधल्या सुटींतून छब्या शाळेंत आला तो खुषींत. त्यानं राजाबाळला हांक मारून म्हटलं—

"ए राजा, ओळख मीं काय गंमत आणलीय ती?"

" चाकोलेट. "

" छट्. "

" मग टॉफी नाहींतर लेमनड्रॉप असतील ? "

" छट्. असल्या खाण्याच्या गोष्टीला कोण म्हणतंय गंमत ? "

" मग पतंग नाहींतर भोवरा असेल ? "

" पतंग खिशांत ठेवायला येतो होय लेका ? आणि भोंवरासुद्धां खिशांतून दिसला नसता का ? "

" मग नाहीं बुवा ओळखत. दाखव ना तुझी काय गंमत आहे ती ? "

" हें बघ. "

छब्यानं तांबड्या कागदाचा एक छोटासा कपटा खिशांतून काढून राजाबाळपुढं धरला.

सिनेमाचं तिकीट होतं तें ! चित्रा टॉकींत आजच सुरू होणाऱ्या ' चंद्रिकाविहार ' बोलपटाचं तें तिकीट होतं !

तिकिटासाठीं किती गर्दी लोटली, शेवटीं सगळीं तिकिटं कशीं संपून गेलीं, पण थेटरांतल्या एका माणसाच्या वशिल्यानं आपण तिकीट कसं मिळवलं याची बढाई मारून छब्या म्हणाला,

" लेका, पहिला शो पाहण्यांतच खरी मज्जा, आणि हा चंद्रिका-विहार म्हणजे कसलातरी फडतूस बोलपट नव्हे. या पिक्चरमध्यें मंजुबालेनं नि राजीवनं कामं केलींत. मुंबई-पुण्याला तब्बल दीडशें आठवडे हें पिक्चर चाललंय् ! कड्यावरून नदींत उडी, नदींत मगरीशीं झुंज, अशा वेफाट स्टंटनीं खच्चून भरलंय म्हणे पिक्चर ! आमच्या आबांच्याकडं मुंबईचा एक माणूस आला होता कोर्टांतल्या कामासाठीं, त्यानं सांगितलं हें. तेव्हांच मीं ठरवून टाकलं होतं कीं इथं पिक्चर लागलं कीं अगदीं पहिला शो बघायचा. "

राजाबाळ चकित होऊन गेला छब्याचं तें वर्णन ऐकून ! मंजुबाला, राजीव, स्टंट, कड्यावरून उडी, मगरीशीं झुंज यांची नवलाई त्याला थरारून सोडीत होती. तो म्हणाला—



“ हें बघ. ” छब्यानं तांबड्या कागदाचा एक छोटासा कपटा खिशांतून काढून राजाबाळपुढं धरला.

" छब्या, मीसुद्धां पाहणार चंद्रिकाविहार. "

" पाहशील कीं, पण शिळा झाल्यावर पाहशील. पाहिल्या प्रथम पाहिलं तर तें पिक्चर—चल आज साडेचारच्या पहिल्या शोला येत असलास तर. मी देतों तुला तिकीट मिळवून. नऊ आणे घेऊन ये माईकडून. "

" पण शाळा पांचला सुटणार. मग साडेचारच्या खेळाला कसं रे जायचं ? "

" रड्याच आहेस लेका. द्यायची कांहींतरी थाप मास्तरांना आणि मारायची बुट्टी शेवटच्या दोन तासांना. नाहींतरी ड्रॉइंगच्या नि गणिताच्या तासाला करायचं काय बसून ? "

आणि छब्यानं म्हटल्याप्रमाणं खरोखर त्यानं केलंहि. ड्रॉइंगचा तास सुरू होतांच तो एकाएकीं कासावीस झाल्यासारखं करायला लागला. ड्रॉइंगमास्तरांनीं " काय झालं " म्हणून विचारलं. कांहीं उत्तर न देतां छब्या मुसमुसून रडायला लागला, आणि मास्तरांनीं फिरून थोडीं आर्जवं केल्यावर पोट फार दुखत असल्याचं त्यानं सांगितलं. मास्तरांनीं त्याला घरीं जाण्याची मोकळीक दिली. छब्या वर्गाबाहेर पडेपर्यंत तरी रडतच होता.

छब्याचं पोट दुखायला लागल्याबद्दल राजाबाळला वाईट वाटलंच, पण हें नसतं विघ्न उत्पन्न झाल्यामुळं त्याचा सिनेमा बुडणार याची त्याला अधिक हळहळ वाटली. पण थोड्या वेळानं झालं हें एकपरी बरंच झालं असं त्याला वाटूं लागलं. आज छब्याचा सिनेमा बुडाला असला तरी पोट दुखायचं थांबल्यावर उद्यां-परवां तो खेळ पाहिल्या-शिवाय राहणार नाहीं, आणि तो जाईल त्या वेळीं माईची परवानगी काढून व तिच्याकडून पैसे घेऊन आपण त्याच्याबरोबर जाऊं. छब्याच्या सोबतीनं सिनेमा पाहतांना किती पण मज्जा येईल या

विचारांत दंग असतांना शाळेची सुटीची घंटा झाल्याचंहि राजाबाळला कळलं नाहीं !

दुसरे दिवशीं शाळेंत येतांच छब्या चंद्रिकाविहारच्या आणि त्यांतल्या अद्‌भुत-रम्य देखाव्याच्या गोष्टी सांगायला लागला तेव्हां राजाबाळनं विस्मयानं विचारलं, " म्हणजे ! तूं काल सिनेमाला गेला होतास ? आणि पोट दुखत असतांना ? "

छब्या खो खो हंसायला लागला आणि राजाबाळ अधिकच गोंधळून त्याच्याकडं पाहायला लागल्यावर " खुळचटा, पोट दुखायचं नाटक होतं नुसतं. असं कांहींतरी केलं म्हणजे शाळेंतून निसटायला येतं. काल पोटांत दुखवून घेतलं नसतं तर मला शोला जातां आलं असतं का ? "

छब्यानं लबाडी केल्याबद्दल त्याच्या युक्तिबाजपणाचं कौतुकच वाटलं राजाबाळला. त्यानं थोडसं खट्टू होऊन म्हटलं—

" तूं शो बघून आलास, पण माझा बेत फसला. काल सिनेमाला तूं गेला नसतास तर मी नि तूं मिळून जायचं मनांत होतं माझ्या. "

" मग त्याला कसली हरकत ? मी पुन्हां येईन तुझ्याबरोबर, " छब्या म्हणाला.

" फिरून पैसे देईल तुला तुझी आई ? "

" त्याची पंचाईत तुला नको. केव्हां जायचं तें सांग. त्या वेळीं तयारी आहे माझी. "

छब्याच्या या आश्वासनानं राजाबाळला आनंद वाटला. आणि माईकडून पैसे आणि परवानगी कशी काढायची याचं विचारचक्र त्याच्या डोक्यांत फिरायला लागलं.

शाळा सुटून घरीं गेल्यावर खाण्याकडंहि त्याचं लक्ष गेलं नाहीं. तो माईना म्हणाला—

" ए माई ग ! नवा सिनेमा आलाय ना, त्यांत म्हणे एका माणसानं उंच उंच डोंगरावरनं खालीं नदींत उडी मारलीय् ! "

" खरं ? असतात बाबा एकेक माणसं अचाट. "

" आणिक किनई माई, नदींतल्या सुसरीनं त्याच्यावर हल्ला केला, तर तोच तिच्या पाठीवर बसला म्हणे आणि तिच्या नाकांत बोटं घालून घोडा पळवतात तशी त्यानं तिला नदीभर पळवली ! "

" अरे, खरं नसतं कांहीं तें. यंत्रानं खोटं कांहींतरी करून दाखवतात ते सिनेमावाले. "

" खोटं कसं दाखवतील ग माई ! त्यांतलीं माणसं काय खोटीं असतात ? आपल्या त्या वाडींतल्या गणपति उत्सवांत गाणं झालं होतं ती मंजरी काय खोटी ? ती सिनेमांत असते. इथें आलेल्या नव्या सिनेमांतलीं माणसंसुद्धां खरींखुरीं आहेत. आणि ती सुसरसुद्धां खरोखरीची आहे. बघून आलेलीं पुष्कळजणं सांगतात. "

" असेल बाबा. काय करायचं आपणाला तीं खरीं आहेत का खोटीं आहेत तें घेऊन ? "

" आपण एकदां जाऊं या कीं माई बघायला ? "

" तुझी परीक्षा आलीय् ना आठ दिवसांवर ? आणि या वेळीं कसला जातोस सिनेमाला ? परीक्षा होऊं दे, तूं पास हो अगोदर. मागल्या परीक्षेंत तुझा पांचवा नंबर आला होता. या परीक्षेंत पहिला, निदान दुसरा नंबर आणून दाखव. तसा दाखवलास तर तुला रेशमी शर्ट शिवणार आहें. सिनेमांत अभ्यासाचा वेळ मोडायचा, शिवाय जाग्रण व्हायचं, नि हें बघ, सिनेमा बघून डोळे बिघडतात. परवांच तुझे डोळे येऊन गेलेत. या वेळीं नांवसुद्धां काढूं नको सिनेमाचं. "

राजाबाळचा विरस झाला माईच्या ह्या नकारानं. त्यानं आणखी थोडीं आर्जवं केलीं, एक खेळ पाहण्यांत दोन तास मोडले, तरी दुसरे दिवशीं चार तास अभ्यास करून आपण त्याचा वचपा काढूं आणि परीक्षेंत हमखास वरचा नंबर मिळवूं, अशीं आश्वासनं दिलीं, पण

प्रत्येक वेळीं कांहीं ना कांहीं युक्तिवाद करून माईनीं आपला नकार कायम ठेवला.

राजाबाळ रुसला, थोडासा रडलासुद्धां. पण माईनीं त्या बाबतींत फारसं लक्षच घातलं नाहीं.

छब्याप्रमाणं आपल्या आईनं आपली एवढीशी हौसाहि पुरवूं नये याचं राजाबाळच्या मनाला फार वाईट वाटलं. उद्यां शाळेंत छब्यानं सिनेमाला कधीं जायचं म्हणून विचारलं तर त्याला काय सांगायचं हें कोडं त्याला सुटतां सुटेना. आई जाऊं देत नाहीं असं सांगण्यांत आपला अपमान आहे ही शंका त्याचं मन घेत होतं आणि तो अगदीं बेचैन होऊन गेला होता.

आपण उद्यां छब्याकडं जायचंच नाहीं असा त्यानं बेत ठरविला.

पण तो छब्याकडं गेला नाहीं, तरी छब्याला त्याच्याकडं यायला कोणाची हरकत होती? तो राजाबाळकडं आला आणि ज्या प्रश्नाला राजाबाळ भीत होता तोच नेमका प्रश्न त्यानं त्याला विचारला!

"माई सोडीत नाहीं" असं उत्तर राजाबाळला द्यावंच लागलं. तें देतांना त्याचे डोळे भरून आले होते.

"काय लेका तुझी माई!" असं छब्यानं त्याला हिणवलं तेव्हां त्याच्या मनाला डागणी दिल्यासारख्या वेदना झाल्या. तो मुसमुसून रडायला लागला.

"रडून काय होणार लेका? असा भागुबाईसारखा रडत बसलास तर तुला जल्मांत कधीं मिळायचं नाहीं मनासारखं. थोडी युक्ति करायला लागती त्याला. मी सांगतों तसं करशील? केलंस तर नक्की सिनेमा बघायला मिळेल."

"सांग, मी काय करूं? मला सिनेमा बघायची फार फार हौस आहे बघ. काय केलं म्हणजे माई माझं ऐकेल?"

"हें बघ किनई राजाबाळ—"

त्याचं वाक्य पुरं व्हायच्या आंत शाळा सुरू व्हायची घंटा झाली आणि प्रार्थनेसाठीं सगळीं मुलं मधल्या पटांगणावर धांवलीं. मास्तरहि आले. छब्याला आणि राजाबाळला प्रार्थनेला उभं राहावं लागलं.

राजाबाळ 'वन्दे मातरम्' म्हणत होता, पण त्याच्या मनांत छब्या कोणती युक्ति सांगणार हाच विचार घोळत होता.

* * *

# ४

छब्यानं मधल्या सुटींत सांगितलेली युक्ति ऐकून राजाबाळ दचकला. माईला फसवायचं? मास्तरांना खोटं सांगायचं? आपली ही लबाडी उघडकीला आली तर माई रागावेल. मास्तर नुसतं रागावूनच थांबणार नाहींत, तर मार देतील. साऱ्या शाळेंत आपली फजिती करतील. राजाबाळच्या मनांत अशा कितीतरी शंकाकुशंका येऊन गेल्या आणि त्यांनीं तो भ्याला. तो छब्याला म्हणाला, "नको बुवा."

"नको तर बैस रडत. जन्माला येऊन एकदां तरी बघावाच असा हा बोलपट आहे. हा आठवडाभर हें पिक्चर इथं चालायचंय, तेवढ्यांत चारदां, निदान तीनदां तरी बघणारच मी. इतकी गर्दी लोटलीय ती काय उगीचच होय? आणि किती मोठीं मोठीं माणसं येतात पाहायला तीं काय खुळीं आहेत? तूं पहिल्यांदा राहात होतास त्या वाडींतला मध्या, म्हाद्या जोशी, ती सुमी अशीं कितीतरी पोरं आलीं होतीं काल! तूं बैस मुळुमुळू रडत."

असं हिणवूनच न थांबतां छब्यानं 'चंद्रिकाविहारां'तल्या नव्यानव्या गमती खुलवून सांगितल्या. त्यांतल्या नायकनायिकेच्या द्वंद्वगीतांतले एकदोन तुकडेहि हावभावासह म्हणून दाखवले!

याचा परिणाम राजाबाळाच्या मनावर व्हावयाचा तोच झाला. 'चंद्रिकाविहार' पाहिला पाहिजे आणि आपण तो पाहायचाच असा त्याच्या मनाचा निश्चय झाला. कागदपेन्सिलीसाठीं माईकडून घेतलेला रुपया त्यानं छब्याच्या स्वाधीन केला. 'पाहुणे आलेत म्हणून घरीं लवकर बोलावलंय' अशी मास्तरांना थाप देऊन दोघे मिळून साडेचारला चित्रा टॉकीजमध्यें जाऊन बसले.

आपणांला ओळखीचं कुणी भेटेल ही धाकधूक राजाबाळाच्या मनांत होती. पण थेटरांत आऊन बसेपर्यंत तरी त्याला कुणीं हटकलं नाहीं. दिवे मालवले आणि पडद्यावर चित्रं हलूं-बोलूं लागल्यावर तर आपला बेत सिद्धीला गेल्याचं समाधान त्याला वाटलं आणि निश्चित मनानं तीं तो पाहूं लागला. छब्यानं सांगितलं त्याप्रमाणं—त्याहूनहि जास्त गंमत प्रत्यक्ष पाहतांना त्याला वाटूं लागली. तो अगदीं दंग होऊन गेला.

पण मध्यन्तराच्या सुटीचे दिवे लागतांच समोरचं दृश्य पाहून तो दचकला! त्याच्या वाड्यांतल्या—त्याच्या चांगल्या ओळखीच्या देसायांची हेमा आणि जयंत त्याच्या पुढच्याच रांगेंत होतीं! त्यांनीं आपणांला पाहिलं तर नसेल? पाहिलं असेल तर? माईला कळेल, आणि मग? त्याला विचारच करवेना. चंद्रिकाविहारचा उत्तरार्ध तो पाहात होता, पण त्याला खरी दिसत होती रागावलेली माई!

साडेसहा वाजतां चित्रपट संपला. हेमा-जयंत जात होते त्याच्या उलट बाजूच्या दरवाजांतल्या गर्दींत तो घुसला आणि त्यानं घराकडं धूम ठोकली. हेमा-जयंतच्या अगोदर कितीतरी वेळ तो घरीं जाऊन पोंचला होता.

तरीपण त्याला रोजच्यापेक्षां बराच उशीर झाला होता. माई त्याची काळजी करीत होत्या. राजाबाळ दिसतांच त्यांनीं प्रश्न केला—

"इतका उशीर रे कां? आणि तुझी पुस्तकांची पिशवी कुठाय?"

कांहीं उत्तर देण्याऐवजीं राजाबाळ कष्टी चर्या करून माईकडं पाहूं लागला. माई घाबरल्या. त्यांनीं विचारलं—"कां रे ? काय झालं ?"

तरीहि राजाबाळ स्तब्ध ! माईनीं अधीरपणानें विचारलं—

"सांग ना काय झालं तें ? पोरांनीं काढून का घेतली तुझी पिशवी ? कुणीं घेतली ? कशासाठीं घेतली ?"

"पिशवी—पिशवी नाहीं घेतली कुणीं. पण—"

"पण काय झालं ? लवकर सांग बाबा काय झालं तें."

"तूं मला एक्झरसाइज आणि पेन्सिली घ्यायला रुपया दिलास तो हरवला. कित्ती हुडकला, पण सांपडला नाहीं."

"कांहींतरी करून बसतोस बघ. पैशासारखी गोष्ट काळजीपूर्वक सांभाळायला नको का ? पुढं नको असा वेंधळेपणा करूं. आतां जाऊं दे गेला तो. पण बॅगी कुठाय् तुझी ?"

"छव्र्याकडे ठेवलीय्, ग्राउंडवर रुपया शोधायला जातांना. येतांना आणायचं लक्षांतच राहिलं नाहीं. आत्तां जाऊन घेऊन येतों."

"अंधार व्हायला लागलाय् आतां आत्तां. नको जाऊं. सकाळीं जा."

आपली थाप पचली या समाधानानं राजाबाळ आपल्या उद्योगाला लागला. मुलगा दुसऱ्या कसल्या संकटांत सांपडला नाहीं, रुपया गेला तरी फिकीर नाहीं, असं मनाचं समाधान करीत माईहि सांजवात करायला गेल्या.

आपल्या सोज्वळपणाची चांगली छाप माईवर पाडायची दक्षता राजाबाळ आज घेत होता. माईनीं न सांगतां आज तो हातपाय धुऊन देवापुढं बसला आणि 'शुभं करोति' पासून रामरक्षेपर्यंतचीं शिकवलेलीं सगळीं स्तोत्रं त्यानं म्हटलीं.

पण हा स्तोत्रपाठ चालू असतांना त्याचं लक्ष हेमा-जयंतकडे होतं. आपणाला त्यांनीं पाहिलं तर नाहीं, ही धाकधूक त्याला चैन पडूं देत नव्हती.

जेवण झाल्यावर तो पुस्तकं घेऊन आपण होऊन जयन्तकडं गेला. भाषान्तर समजावून घेण्याचं निमित्त सांगायपुरतं, पण तो सिनेमांतलं काढतो कीं काय याचा सुगावा घेण्याचाच त्याचा खरा उद्देश होता. भाषान्तर विचारून झाल्यावर ते आपणास सिनेमाबद्दल विचारतील अशी शंका त्याला आली होती, पण तीहि खोटी ठरली. त्यानं सिनेमाचा विषय काढला तेव्हां हेमा म्हणाली—

" तूं आला होतास वाटतं आज ? थेटरांत तुला पाहिल्यागत वाटलं एकदां. "

राजाबाळ चपापला, पण शहाजोगपणानं म्हणाला, " मी कसा येईन सिनेमाला ? परीक्षा जवळ आलीय माझी. परीक्षा झाल्यावर नेणार आहे मला माई. "

" मग फसलेंच म्हणायची मी. काय एकासारखीं माणसं असतात ! "

हेमाच्या या उद्‌गारांनीं राजाबाळची धास्ती दूर झाली. आपली चोरी पचली या समाधानांत तो परत आला.

एक चोरी पचली कीं दुसरी करायला माणसाला धीर येतो, आणि एकदां केलेली चैन फिरून करण्याचा मोहहि त्याला आवरतां येत नाहीं. राजाबाळचं तसंच झालं. निरनिराळीं निमित्तं सांगून तो माईकडून पैसे मागून घेई. चार आणे घेतले तर दोन आणेच खर्च करून दोन आणे दडवून ठेवी आणि चारदोनदां अशी बचत केल्यावर छब्याबरोबर सिनेमा पाही. आज सरनीं एक्स्ट्रॉ पीरियड घेतला, आज सकाळीं मुलं माळावर मॅच पाहायला गेलीं होतीं म्हणून मींहि गेलों होतों, अशा नव्या नव्या थापा देऊन घरीं यायला झालेल्या उशीराचा तो समर्थन करी आणि माईंना तें खरं वाटत असे.

दामूअण्णा मालवणकरांची नाटक मंडळी आली आणि त्यांचे खेळ सुरू झाले. त्यांचं ' उसना नवरा ' नाटक चांगलंच लोकप्रिय झालं ! छब्यानं तें एकदां नव्हे, दोनदां नव्हे, तीनदां पाहिलं. प्रत्येक वेळीं

तो त्यांतल्या नव्या नव्या गमती राजाबाळला ऐकवूं लागला. वसंत पवार शिदूचं काम किती झकास करतो, गाणं म्हणतांना तो डोक्यावरली पगडी कशी खुबीदारपणानं नाचवितो, दामूअण्णा कसा हंशा पिकवतात इत्यादि गोष्टी छब्यानं इतक्या खुलवून सांगितल्या कीं तें नाटक आपण पाहिलंच पाहिजे, असं राजाबाळाला वाटूं लागलं. एवढंच नव्हे, तर तें आपण आज नाहींतर उद्यां पाह्यचंच असा त्यानं निश्चय केला.

निश्चय झाला, पण तो तडीस नेणं सोपं नव्हतं. अगदीं शेवटचं तिकीट काढायचं म्हटलं तरी आठ आणे पाहिजे होते, आणि छब्याला बरोबर घ्यायलाच पाहिजे असल्यानं एक रुपयातरी पैदा करण्यावांचून गत्यंतर नव्हतं. आणि या वेळीं हीच गोष्ट बिकट होती. कारण कागदपेन्सिलीसाठीं या महिन्यांत त्यानं आधींच दोन रुपये उचलले होते आणि फी चार दिवसांपूर्वींच भरली होती. माईकडून पैसे मिळवण्याचे हे दोन्ही मार्ग बंद झालेले होते. काय करावं हें त्याला सुचेनासं झालं होतं.

पण असल्या अडचणींतून बाहेर काढणारा छब्यासारखा इरसाल गुरुजी त्याला लाभला होता. राजाबाळाला पडलेला पेंच ऐकतांच त्यानं युक्ति सुचवली—

" अरे, त्यांत काय मोठंसं ? हें बघ किनई, तुझ्यापाशीं डिक्शनरी नाहीं. ती घ्यायला पांच रुपये घे मागून. एकदां सोडून दोनदां जाऊं आपण नाटकाला. "

" पण माईला डिक्शनरी दाखवायला नको का पैसे घेतल्यावर ? "

" बावळटच आहेस लेका, तेवढ्यापुरती कुणीहि देईल तुला आपली. माझ्यापाशीं आहे नवी कोरी डिक्शनरी. ती दाखव माईला. मी आईकडून बॅटीसाठीं पैसे घेऊन आठ दिवस आईस्क्रीम खाल्लं, नि चारदां सिनेमा बघितला. शाळेंतली बॅट नेऊन दाखविली तिला दोन दिवस पुढं ती विसरून गेली बॅटीचं. असं करावं लागतं लेका. "

गुरुजींच्या उपदेशाप्रमाणं राजाबाळनं माईकडं डिक्शनरीची गोष्ट काढली. माई इंग्रजी शिकल्या नसल्या तरी डिक्शनरी म्हणजे काय हें त्यांना माहीत होतं व असलं मोठं पुस्तक तिसरींतल्या राजाबाळला कशाला, असं त्यांना वाटलं. गरजेपेक्षां हौसेखातर तो हें पुस्तक मागत असेल असं त्यांना वाटलं. पण पुस्तकाची हौस ही वावगी हौस नव्हे. चांगल्या गोष्टींत मुलाला नाराज करायचं नाहीं, त्याची हौस शक्य तितकी पुरवायची, असं माईचं धोरण असल्यानं राजाबाळची पुस्तकाची मागणी मान्य करण्याकडं त्यांचा कल झुकूं लागला.

पण मध्यंतरीं दुसरंच विघ्न उपस्थित झालं. हेमा कसल्यातरी कामासाठीं माईकडं आली, तेव्हां त्यांनीं विचारलं—

"डिक्शनरी का कायसं म्हणतात, त्याला काय पडतं ग हेमाताई?"

"घ्यावी तशी किंमत पडते डिक्शनरीला. पण माई, तुम्हांला हो कशाला डिक्शनरी?"

"अग, मला काय करायची आहे ती घेऊन? पण आमचा राजाबाळ घ्यायची म्हणतोय. पांच रुपये मागतोय, म्हणून विचारलं."

"पण त्याला तरी कशाला हवीय ती! तिसरी-चवथींत कांहीं डिक्शनरी लागत नाहीं."

ही हेमट्ली ऐन वेळीं कशाला कोसळली असं वाटलं राजबाळाला. तिनं असा मोडता घातल्यावर माईकडून पैसे मिळण्याची आशा नाहीं, या भयानं राजाबाळ म्हणाला—

"पण आम्हांला घ्यायला सांगितलीय मास्तरांनीं. रीडरांतले शब्द आपले आपण काढायला शिकवणार आहेत ते."

"मोठे हेच दिसताहेत तुमचे मास्तर! दोन वर्षांत मॅट्रिकचा अभ्यास करून घेणार आहेत वाटतं! पण तुला पांच रुपये रे कशाला हवेत? दीडदोन रुपयांला तर मिळते ती."

"पण मास्तर म्हणालेत, नेहमीं लागणारं पुस्तक घ्यायचं तर घेऊन छोटं कशाला घेतां? मोठी डिक्शनरी घ्या, म्हणजे नेहमीं उपयोगी पडेल."

लबाडी करूं लागल्यावर ती पचवायच्या युक्त्याहि सुचतात त्या अशा! राजाबाळच्या या खुलाशावर हेमाला कांहीं बोलतां येईना. तरीपण तिनं दुसरा एक मार्ग सुचवलाच. ती म्हणाली, "तरीदेखील तुम्हांला एवढ्यासाठीं खर्च करायला नको माई. आमच्याइथं एक सोडून तीन डिक्शनऱ्या आहेत. इंग्रजी-मराठी आहे, चेंबरची इंग्लिश इंटु इंग्लिश आहे आणि गतवर्षीं दादाला बक्षीस मिळालेली वेब्स्टरची मोठी डिक्शनरी आहे. त्यांपैकीं वाटेल ती घेऊन शब्द काढतां येतील राजाबाळाला."

आतां मात्र हेमाला कडकडून चावावं, नाहींतर ओचकरावं असं झालं राजाबाळला. तो रागानं म्हणाला— "आम्ही नाहीं जाणार लोकाचितं रोजरोज. माझ्यापाशीं पुस्तक असायला पाहिजे ग माई."

"मग असूं दे कीं." हेमा म्हणाली "आत्तां चल माझ्यावरोबर. मी देतें तुला हवी ती डिक्शनरी. राहूं दे ती तुझ्यापाशीं नेहमीं."

निरुपाय होऊन राजाबाळ पुटपटला—"आम्ही नाहीं येणार भीक मागायला."

"काय पण ऐटी!" असें म्हणून हेमा हंसली आणि निघून गेली. राजाबाळाला वाटलं गेली पीडा एकदांची. आतां आपण फिरून लाडीगोडी लावून माईकडून पैसे काढूं.

पण झाला प्रकार वेगळाच! माई हेमाकडं गेल्या आणि चेंबरची डिक्शनरी घेऊन आल्या. पुस्तक धड होतं, खराबहि दिसत नव्हतं. चांगलं पुस्तक बक्षीस मिळाल्यावद्दल आनंद वाटण्याऐवजीं आपला डाव हुकल्यावद्दल राजाबाळला दुःखच अधिक झालं.

पण आतां त्याला कांहींच करतां येण्यासारखं नव्हतं. दुसरी युक्ति काय करावी याबद्दल त्याच्या डोक्यांत चक्रं फिरायला लागलीं. पण

राजाबाळ अद्यापि पट्टीचा लबाड झालेला नव्हता. त्याला युक्ति सुचे, पण तिचा फसवेपणा त्याच्याच लक्षांत येऊन ती त्याला टाकून द्यावी लागे. माईचा विश्वास बसेल असं पैसे मिळवण्याचं कोणतं निमित्त काढावं, हें कोडं त्याला कांहीं केल्या कळेना.

त्यानं छब्याला झालेला प्रकार सांगितला. आपण काढलेली युक्ति हेमाच्या लुडबुडीमुळं अशी फसल्याबद्दल त्यालाहि तिचा राग आला. तिला तर त्यानं शिव्या दिल्याच, पण तिच्याकडून पुस्तकाची भिक्षा घेतल्याबद्दल माईनाहि नांवं ठेवायला त्यानं कमी केलं नाहीं. आपल्या आईला दोष दिलेला राजाबाळाला रुचला नाहीं, पण छब्याला उलट बोलायची हिंमतहि त्याला झाली नाहीं. तो म्हणाला—

“आमची माई कांहीं चिक्कु नाहीं, तूं म्हणतोस तशी. मी नाटकासाठीं तिच्याकडून पैसे आणीन—”

“मोठा आणणारा लागून गेलास! मग सिनेमाबद्दल कां फसवलंस तूं आपल्या माईला? सिनेमाला पैसे देत नाहीं, ती नाटकाला द्यायला बसलीय? वाट बघ.”

राजाबाळचं तोंड बंद झालेलं पाहून छब्यानं आपला मारा पुढं चालू केला—“राजा, माईनं पैसे दिल्यावर तूं नाटकाला जाणार म्हणजे दुसरा जन्म घेतला पाहिजे तुला. तोंपर्यंत नाटक कंपनी थांबतीय होय तुझ्यासाठीं? मघांशींच मी हॉटेलांत गेलों होतों, तिथं नाटकवाल्यांतलीं माणसं आलीं होतीं. आणखी चार दिवसांनीं ते परत पुण्याला जाणार असं म्हणत होते; आणि हें बघ राजा, आजचा प्रयोग हरिजन फंडाच्या मदतीसाठीं व्हायचाय. आमच्या आबांनीं चार तिकिटं खुर्चीचीं घेतलींत. आम्ही सगळींजणं जाणार आहों आज नाटकाला.”

राजाबाळ मनस्वी खट्टू झाला. आपणाला एकदां नाटक पहायलाहि मिळत नसतांना छब्यानं दोनदां नाटक बघावं आणि तेंसुद्धां खुर्चीवर

बसून ऐटींत पाहावं, या त्याच्या नशिबाचा त्याला हेवा वाटला, आणि आपल्या कमनशिबाची चीडहि आली त्याला. बस्, तें कांहीं नाहीं, आज लवाडी-विवाडी कांहीं करायची नाही, माईकडून सरळ पैसे घ्यायचे काय वाटेल तें करून आणि नाटकाला जायचं—हो, जायचंच. छब्या दोनदोनदां नाटक बघतो आणि आपण एकदांहि बघायचं नाहीं म्हणजे काय ? तें नाहीं चालायचं.

राजाबाळला शाळा कधीं सुटते असं झालं होतं. वर्ग चालू होते तरी राजाबाळ मनानं थेटरांतले देखावे पाहात होता. छब्याच्या बरोबरीनं आपणहि खुर्चीवर बसून नाटक पाहातों आहों, दामूअण्णांच्या डोळ्यांच्या कसरतीनं प्रेक्षकांबरोबर आपणहि हंसतों आहों, वसंत पोवारच्या पगडीच्या नाचाला लोकांबरोबर आपणहि टाळी देत आहों— राजाबाळ नाटकमय होऊन गेला होता. मास्तर काय सांगताहेत आणि काय विचारताहेत हें त्याच्या गांवींहि नव्हतं !

" सिंहगड कुठं आहे ? " इतिहासाच्या मास्तरांनीं विचारलं.

" पुण्यापासून पश्चिमेस दहाबारा मैलांवर. " वरच्या मुलानं उत्तर दिलं.

" सिंहगडावर मोंगलांचा कोणता सरदार होता ? "

राजाबाळ उत्तर देण्याऐवजीं बसूनच राहिला !

" मी तुला विचारतोंय राजा ? "

राजाबाळ चमकून उभा राहिला. पण त्याला प्रश्नच उमगला नव्हता.

" सिंहगडावर किल्लेदार कोण होता ? "

" दामुअण्णा........ " नाटकांत गुंगलेल्या राजाबाळच्या तोंडून उत्तर आलं. सर्व वर्गबंधूंच्या हंशाचा स्फोट झाला. राजाबाळच्या ध्यानांत चूक आली, तो लाजला.

" किल्लेदार दामुअण्णा होय ! यू फूल ! रात्रीं नाटकाला गेली होती वाटतं स्वारी ! अभ्यासाकडं चांगलं लक्ष देतां ! "

वर्गांत अशी फजिती झाली, तरी नाटकाची त्याच्या मनाची लागलेली ओढ कमी झाली नाहीं. कांहीं झालं तरी आज नाटकाला जायचं आणि छब्याची ऐट उतरायची, ह्या एकच एक विचारानं त्याचं मन भारून गेलं होतं.

शाळा सुटतांच राजाबाळ आज घरीं आला. तो आज खेळायला—खेळ बघायला थांबला नाहीं.

"कां रे, आज लवकर आलास?"

"आज किनई एक काम आहे."

"कसलं?"

"आज किनई माई, हरिजन फंडाच्या मदतीकरितां नाटक आहे."

"मग?"

"आमच्या शाळेंतल्या पुष्कळजणांनीं तिकिटं घेतलींत. मला पैसे दे माई तिकिट काढायला."

"हें वेड शिरलंय का आज डोक्यांत! तरी म्हटलं आज लवकर कां घरीं आली स्वारी!"

"हें वेड आहे वाटतं ग माई! मोठ्या मोठ्या माणसांनींसुद्धां तिकिटं काढलीं आहेत. त्या आबासाहेब वकिलांनीं, पानशे डॉक्टरांनीं, मोहिते फोटोग्राफरनीं—"

"या मंडळींची नि तुझी कुठं भेट झाली बाबा! आणि त्यांनीं बरं सांगितलं तुला आपण नाटकाचीं तिकिटं काढलीं हें?"

"त्यांनीं कशाला हवं सांगायला? पण त्यांचे मुलगे—तो छब्या, पांड्या, शिव्या आहेत ना आमच्या वर्गांत! ते म्हणत होते. त्यांच्या घरचीं सगळीं माणसं जाणार आहेत आज नाटकाला. चांगल्या कामासाठीं आपल्या गांवानं खूप मदत केली पाहिजे म्हणून सगळ्यांनीं तिकिटं काढलीं आहेत. माई, आपणसुद्धां दोघंहि जाऊं या ग? दोन तिकिटांचे चार रुपये—तेवढी मदत केल्यासारखं होईल."

माईंना हंसूं आलं मुलाचा हा युक्तिवाद ऐकून. हरिजनफंडाला मदत करण्याच्या तळमळीपेक्षां नाटक पाहण्याची हौसच त्याच्या मनांत अधिक प्रबळ आहे, हें त्यांनीं ओळखलं होतं आणि आहे पोराच्या मनांत तर जाईना का, असंहि एकदां त्यांना वाटलं. पण रात्रीची वेळ, काळोख, त्याला कसं जाऊं द्यायचं अशा भीतीनं त्यांना घेरलं. काल रात्रींच आपल्या दूधवालीला दूध घालायला जातांना विंचू चावला होता, या आठवणीनं त्यांच्या भीतींत भरच पडली. सकाळीं राजाबाळला आलेल्या शिंका आणि त्याचं दुखत असलेलं डोकंहि त्यांना आठवलं. जाग्रणानं त्याचं पडसं वाढेल, डोकं दुखेल आणि मग तापहि येईल, अशा शंका त्यांना भेडसावूं लागल्या. माया भित्री असते म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. शेजारघरच्या किशाचा प्रथम पडशाचा वाटणारा ताप पुढं विषम ठरला, तसा आपल्या राजाबाळचा — या नुसत्या कल्पनेनंच माईंचं अंग शहारलं. आणि त्या एकदम उद्गारल्या, — "नको ग बाई तें नाटक नि बिटक."

"हें ग काय माई तुझं! माझ्या मनासारखं कध्धीं कांहीं करीत नाहींस तूं पैशासाठीं—"

"पैशासाठीं?" माई उद्‌गारल्या. "पैशासाठीं मी नको म्हणतें होय? तुझ्यासाठीं मी थोडे का पैसे खर्च करतें? तुझ्या बरोबरीच्या मुलांत तुझ्याइतका खर्च किती जणांचा होत असेल तें तूंच सांग. परवां तूं रुपया हरवलास तर एका अक्षरानं तरी विचारलं असा कसा हरवलास म्हणून? दुसरी एखादी बाई असती तर ती मुलाला ढीगभर बोलली असती आणि पैसे हरवण्याऐवजीं मुलानं मिठाई घेऊन खाल्ली, नाहींतर दुसरं कांहींतरी केलं अशी अदावत घेतली असती तिनं. मी तुझ्यावर—"

"माझा रुपाया खरोखर हरवलाय हं माई. मीं दुसरं कांहीं केलं नाहीं ग. विद्येची शप्पत—"

" अरे, पण असा घाबरतोस कां ? आणि शप्पत कशाला हवी घ्यायला ? हरवला रुपाया तर हरवूं दे. मी इतकं हें करतें, तरी तुझं आपलं आहेच, कीं मी पैशापुढं तुझ्या सुखाकडं लक्ष देत नाहीं म्हणून ! नशीब माझं, दुसरं काय ? "

आपल्याबद्दल माईच्या मनांत कसला किन्तु नाहीं हें पाहून राजाबाळला एकीकडून समाधान वाटलं, तरी आपल्या बोलण्यानं माईला दुःख झालं हें पाहून तो ओशाळला. तो म्हणाला—

" माई, तूं माझ्यासाठीं खूप खर्च करतेस, तसा या वेळीं कां करीत नाहींस ? नाटकाबद्दल नको असला तरी फंडासाठीं ? शाळेंतलीं मुलं हंसतील मला आणि चिडवतील सुद्धां. "

हात्तिच्या ! एवढंच ना ? मी उद्यां दोन रुपये देतें, ते नेऊन दे हरिजनफंडाला अन् पावती नेऊन दाखव तुला हंसणाऱ्या नि चिडवणाऱ्या सोबत्यांना. मग तर झालं ? "

आतां मात्र राजाबाळाचा निरुपाय झाला. आपण केलेली कोणतीहि युक्ति सफल झाली नाहीं यानं तो उद्विग्न झाला. तो मुकाट्यानं उठला आणि घराबाहेर पडला.

" लवकर यायचं हं, दिवेलागणीच्या आंत. " माईंनीं त्याला बजावलं.

राजाबाळानं कांहींच उत्तर दिलं नाहीं. त्यानं मागं वळून पाहिलंहि नाहीं !

घटकाभरांतच राजाबाळ परत आला आणि जातांना काळवंडलेली त्याची चर्या खुललेली आहे हें पाहून माईंना विस्मय वाटला, समाधानहि वाटलं.

" लवकरसा आलास ? " माईंनीं विचारलं.

" एक्झरसाइज लिहायचाय ह्याची आठवण झाली. किनई माई, माझ्या मागल्या एक्झरसाईजला एक्सलंट म्हणजे उत्तम असा शेरा दिलाय सरनीं. "

" होय का ? आहेच तसा हुषार माझा राजाबाळ ! "

राजाबाळ आपल्या खोलींत अभ्यासांत दंग होऊन बसला होता. मुलाच्या समजूतदारपणावर आणि हुषारीवर खूष झालेल्या माई रात्रीं त्याच्या आवडीचा कोणता पदार्थ करावा याचा विचार करीत होत्या. इतक्यांत— " राजाबाळ ! राजाबाळ ! " अशी हांक दारांतून आली. माईनीं पुढं जाऊन विचारलं— " कोण आहे ? "

" मी छब्या. राजाबाळ कुठाय ? "

" अभ्यास करतोय. कशाला हवाय् ? "

" मी बोलवायला आलोंय त्याला. "

" आत्तां ! अशा तिन्हीसांजा ! "

" होय, आमच्याइथं जेवायला लावून द्या त्याला. सत्यनारायण आहे. वैनीनं बोलावून आणायला सांगितलंय. "

" पण रात्रीं तो एकटाच घरीं यायचा—"

" तो रात्रीं यायचाच नाहीं आज. आमच्या इथंच झोपेल आणि सकाळीं येईल घरीं परत. "

" अरे, पण तुम्ही नाटकालानं जाणार आहांत आज ? घरचीं सगळीं जाणार आहां असं म्हणत होता राजाबाळ. "

" तें राहिलं सत्यनारायणाचं ठरल्यामुळं. "

छब्याचं आमंत्रण स्वीकारावं कीं नाकारावं हें माईना सुचेना.

* * *



"आतां अशा तिन्ही सांजा ?"
माईनीं छब्याला विचारलें.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

# ५

छब्यानं कट सुरेख रचला होता व त्याचा पहिला टप्पाहि सुरळीतपणें ओलांडला होता. राजाबाळनं आपला डिक्शनरीप्रयोग कसा फसला तो सगळा वृत्तान्त त्याला सांगितला. पण असल्या अडथळ्यांना दाद द्यायला छब्या लेचापेचा थोडाच होता? लबाड्या करण्यांत तो चांगला निढावलेला असल्यानं त्यानं राजाबाळच्या अडचणी ऐकून हातपाय गाळले नाहींत, उलट या अडचणींतून पार पडायची एक और शक्कल त्यानं काढली!

छब्यानं कसलीतरी थाप मारून आज घरांतून पैसे मिळविले होते. त्यांचा उपयोग करून दोघांनीं नाटकाला जायचं, एवढंच नव्हे तर 'आराम' उपहारगृहांत पंजाबी हलव्याचा आणि मद्रासी वड्यांचा समाचार घ्यायचा, त्यासाठीं सत्यनारायणाचं निमित्त सांगून राजाबाळला घराबाहेर काढायचं, अशी युक्ति छब्यानं काढली होती. पण हा सारा खटाटोप तो फुकट करणार नव्हता, राजाबाळनं नवी घेतलेली तीन रुपयांची कंपास-पेटी उद्यां दोन-अडीच रुपयांना विकून टाकायची आणि त्या पैशांतून छब्यानं आपलं ऋण वसूल करून घ्यायचं. पेटी हरवली असं सांगून माईला चकवायचं असा सर्व बाजूंनीं बंदोबस्त त्या दोघां खेळगड्यांनीं आपल्याकडून केला होता.

त्यांचा हा कट सुरवातीस साधला. राजाबाळला आलेलं सत्यनारायणाचं आमंत्रण माईंना खरं वाटलं. त्यांतूनहि मुलाला रात्रीं अपरात्रीं बाहेर सोडण्याच्या भयानं त्यांनीं थोडा वेळ अळंटळं केलं. पण सत्यनारायणाचा पुढं आलेला प्रसाद झिडकारल्यास त्या देवाचा कोप होऊन भयंकर अनर्थ ओढवतात, या पोथींतल्या कथा त्यांना आठवल्या आणि त्यामुळं मन घट्ट करून माईंनीं राजाबाळला छब्याबरोबर पाठवलं.

आपला डाव साधल्याच्या समाधानांत छब्या म्हणाला—

" बघ लेका, केलं कीं नाहीं तुझ्या मनासारखं? या मोठ्या माणसांना मुलांची हौस पुरवायला कधींच नको असतं. उलट आम्हांला नको तें नेमकं तीं आमच्या बोकांडीं बसवतात. म्हणून त्यांना असं चकवलं पाहिजे. लेका, माई म्हणते तें तूं मुकाट्यानं ऐकून घेतोस नि मुळुमुळू रडतोस. अशा रडवेपणानं तुला जन्मांत कधीं मजा करायला मिळायची नाहीं. मजा करायला पाहिजे असेल, तर थोडातरी युक्तिबाजपणा शिकला पाहिजे तुला."

छब्याचा हा युक्तिबाजपणा राजाबाळला त्या वेळीं आनंददायक वाटला. छब्याबरोबर 'आराम' उपहारगृहांत त्यानं चमचमीत फराळ केला आणि तिथून ते नाटकगृहाकडं जायला निघाले. वाटेंतल्या धर्मशाळेपाशीं येतांच छब्या म्हणाला, "ए, थांब जरा आणि इकडं ये."

" तें रे कशाला?" राजाबाळानं विचारलं.

" ये म्हणजे दिसेल."

छब्या आणि राजाबाळ धर्मशाळेच्या मागं गेले. अंधारांत छब्यानं खिशांतून सिगारेट आणि आगपेटी काढली. काडी पेटवतांच राजाबाळला तो काय करतो आहे तें उमगलं. तो आश्चर्यानं आणि भीतीनं उद्गारला—

" छब्या! तूं सिगारेट ओढतोस?"

" ए आचरटा, ओरडतोस केवढ्या मोठ्यानं? लेका, चमचमीत फराळ झाल्यावर सिगारेट पाहिजेच. आबांच्या डब्यांतले चार सिगारेट मीं दुपारींच घेतलेत. तूंहि मारून बघ एक झुरका. कशी मजा वाटते!" राजाबाळच्या तोंडाशीं जळती सिगारेट धरून छब्या म्हणाला.

" मला नको बुवा तें. बिडी-सिगारेट ओढली म्हणजे ठसका लागतो, खोकला येतो, ओकारी येते, घेरी येते—"

" अरे, कांहीं होत नाहीं. आपण ओढली तरी दुसऱ्यानं ओढूं नये म्हणून मोठीं माणसं भय दाखवतात मुलांना. बघ, मला कुठं खोकला येतोय् अन् ओकायला होतंय्?" छब्यानं जोरकस झुरका मारला. त्याच्या नाकातोंडांतून बाहेर पडणारा धुराचा लोट त्या अंधारांतूनहि राजाबाळला दिसला.

" तूं रोज ओढतोस छब्या!"

" हो. आमच्या लखू गड्यानं पहिल्यांदा मला शिकवलं. आतां मी तुला शिकवतों." छब्यानं राजाबाळच्या तोंडांत सिगारेट कोंबली. राजाबाळनं भीतभीत हलकासा झुरका मारला. त्याची छाती धडधडत होती. त्याच्या झुरक्याचा धूर दिसलासुद्धां नाहीं.

" अरे खच्चून ओढ कीं. असं काय करतोस शेळपटा?"

" नको रे. बघेल कोणतरी."

" लेका, इथं कोण येतंय बघायला? हं, खेच जोरानं."

राजाबाळनं दुसरा झुरका अधिक जोरानं मारला. धूर सोडला. त्याला थोडंसं गरगरल्यासारखं झालं. पण ठसका, खोकला, ओकारी असं कांहीं झालं नाहीं. छब्यानं दिलेली धूम्रपानाची दीक्षा त्यानं पचविली.

दोघे दोस्त नाटकाला गेले. ओळखीचीं माणसं भेटतील ही राजाबाळची भीति दूर सारण्यासाठीं छब्यानं गॅलरीचीं तिकिटं काढलीं आणि जागा धरली तीहि अगदीं मागील बाजूची, थोडासा अंधार असलेली. त्यांतूनहि कुणीं पाहिलंच तर त्याला थापा देऊन कसं गप्प बसवायचं हें छब्यानं राजाबाळला पढवून ठेवलं.

नाटकाची हौस निर्विघ्नपणें पुरी झाली. कंपास-पेटी विकून छब्यानं आपलं ऋण वसूल करून घेतलं. छब्यावरलं राजाबाळचं प्रेम वाढत चाललं, तशी माईशीं लबाडी करण्याची त्याला दिक्कत वाटेनाशी झाली. आपली कंपास-पेटी चोरीला गेल्याची थाप देऊन त्यानं माईला गप्प

बसवलं. माईनीं त्याच्या वेंधळेपणाबद्दल त्याला बोलून घेतलं थोडंसं, पण शेवटीं नवी पेटी घ्यायला पैसेहि दिले. चैन करायला मिळाल्यावर थोडंसं बोलून घ्यावं लागलं तरी बिघडलं काय, बोलणं कांहीं अंगाला चिकटत नाहीं, अशी छब्यानं त्याची आधींच समजूत घातली होती. या समजुतीमुळं माईच्या बोलण्याची शरम वाटण्याऐवजीं डाव जिंकल्याचा हर्षच राजाबाळला झाला.

छब्याच्या शिकवणीनं राजाबाळ नवनव्या लबाड्या आणि नवनव्या घातुक संवयी चिकटवून घ्यायला लागला. हॉटेल, नाटक, सिनेमा यांची त्याची चट वळावली. सिगारेटचा झुरका मारायला दबकायचं बाजूलाच राहिलं, पण तो छब्याकडून सिगारेट आपण होऊन मागून घ्यायला लागला.

या सर्व गोष्टींचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? तिसऱ्या इयत्तेंत तिसरा नंबर मिळवणारा राजाबाळ चवथींत सतराव्या नंबरला गेला आणि त्याला 'पास' म्हणवून घेतां आलं असलं, तरी गणित-इंग्रजींत एक दोन मार्कांची भिक्षा त्याला पदरांत घ्यावी लागली होती. माईला मात्र आपण दुसरा नंबर पटकावल्याची थाप द्यायला तो चुकला नाहीं. मुलगा हुशार असून त्याचा अभ्यास मन लावून होतो आहे, ही माईची समजूत टिकून असेपर्यंत तिच्या राज्यांत आपणांस शंभर खून माफ होतील हें राजाबाळ ओळखून होता.

पण पाप घटकाभर पचलं, तरी केव्हां ना केव्हां तें उघडकीला येतंच. राजाबाळचं पापहि असं अचानक उघडकीस आलं.

कंपास-पेटीचा सौदा साधल्यावर दुसऱ्या वस्तूंचे तसेच सौदे करण्याचा मोह राजाबाळला झाला नसता तरच नवल होतं; आणि त्याला तसा धीर झाला नसता, तरी छब्या त्याला थोडाच स्वस्थ बसूं देणार होता! हॉटेल-सिनेमाची चैन राजाबाळच्या जिवावर चालण्यासाठीं छब्या वाटेल तें करण्याच्या भरीस त्याला घालीत होता. आणि त्यांत

त्याला यशहि येत होतं. फुकट मिळालेली डिक्शनरी विकण्याला छब्यानं त्याला भाग पाडलं होतं.

सहावींतल्या हरी पाटणकरानं तीन रुपयांला डिक्शनरी विकत घेतली. हरीची वहीण जान्हवी हेमाची मैत्रीण होती आणि त्या मैत्रिणींचं एकमेकींकडं वरचेवर जाणंयेणं असे. हेमा अशीच एकदां पाटणकरांकडे गेली असतां हरीच्या हातीं तिनं डिक्शनरी पाहिली. आपलं पुस्तक तिनं ओळखलं. तिनं हरीला विचारलं—

" कुणाचं रे हें पुस्तक ? "

" माझंच कीं. कां ? " हरीनं विचारलं.

" कांहीं नाहीं बाबा. केवढ्याला घेतलंस ? आणि कुठल्या दुकानांत ? "

" दुकानांत नाहीं घेतलं मीं. तुमच्या वाड्यांत तो राजाबाळ नाहीं का ? त्याच्याकडून घेतलं मीं तीन रुपयांना. चेंबरची डिक्शनरी तीन रुपयांना मिळाली, हें स्वस्तच नाहीं का ? "

आपण वापरायला दिलेलं पुस्तक राजाबाळनं असं विकून टाकावं आणि माईंनीं त्याला संमति द्यावी, याचा हेमाला विस्मय वाटला.

घरीं आल्यावर ती नेहमींसारखी माईकडं गेली. राजाबाळ जेवायला बसला होता. आपण शाळेंत कशीं बरोबर आणि पटापट उत्तरं देतों, आणि मास्तर आपणाला कशी शाबासकी देतात, याची बढाई तो माईंना सांगत होता. आपला मुलगा किती गुणी आहे याची धन्यता वाटत होती त्या माउलीला.

" राजाबाळ, मला थोडीशी डिक्शनरी बघायची आहे रे. आणतोस का इकडं ? " या हेमाच्या प्रश्नानं राजाबाळ चपापला. त्याच्या चर्येवरली चलबिचल हेमाच्या नजरेंतून निसटली नाहीं. तरीपण क्षणभरांतच तो बेडरपणें म्हणाला—

" डिक्शनरी होय ? उद्यां आणतों हं. एका मित्रानं नेलीय शब्द काढायला. "

"असं? कोणत्या मित्रानं रे?"

"बापू कस्तुऱ्यानं."

राजाबाळच्या या उत्तरानं त्याच्या लबाडीबद्दल हेमाला संशय उरला नाहीं. तरीपण उतावीळपणा न करतां त्याच्याच तंत्रानं चालून त्याची लबाडी त्याच्या पदरांत घालायचं हेमानं ठरवलं. ती म्हणाली, "उद्यां तरी आठवणीनं आण हं. एक दोन दिवसांत परत देईन मी तुला."

दुसरे दिवशीं राजाबाळ डिक्शनरी घेऊन हेमाकडं गेला आणि म्हणाला, "ही घे. पण उद्यां दे हं. आतांशा आम्हांला खूप शब्द काढायचे असतात."

बोलल्याप्रमाणं राजाबाळनं पुस्तक आणून दिलं याचं हेमाला नवल वाटलं. हरि खोटं बोलला कीं काय अशी तिला शंका आली. पण जेव्हां तिनं पुस्तक उघडून बघितलं तेव्हां खरा प्रकार तिच्या लक्षांत आला. पुस्तकावर हरीनं आपलं नांव घातलं होतं, एवढंच नव्हे, तर विकत घेतल्याची तारीखहि लिहिली होती. मागून नेलेल्या पुस्तकावर नांव, तारीख कोण कशी घालील? हरीनं पुस्तक विकत घेतलंच असलं पाहिजे व वेळ मारून नेण्यापुरतं राजाबाळनं तें मागून आणलं असलं पाहिजे, असं हेमानं ताडलं. आणि त्याची शहानिशा करण्यासाठीं संध्याकाळीं राजाबाळ पुस्तक मागायला आला, तेव्हां हेमानं 'अजून काम झालं नाहीं, सकाळीं देतें' असं सांगितलं. सकाळीं मागायला जातो तों हेमा पुस्तक घेऊन मैत्रिणीकडे अभ्यासाला गेल्याचं त्याला कळलं. हरीचा तगादा जोरावला आणि राजाबाळला त्याला थोपवून धरतां धरतां पुरेवाट होऊं लागली!

"संध्याकाळीं डिक्शनरी आणून दिली नाहींस तर बघ. माझ्याशीं गांठ आहे, लक्षांत ठेव." अशी हरीनं तंबी दिली तेव्हां राजाबाळ भेदरून गेला.

हेमा घरीं आल्यावर त्यानं पुस्तकाची मागणी केली तेव्हां ती म्हणाली, "हें बघ किनई, आणखी आठ-दहा दिवसतरी मला डिक्शनरी हवीय रे."

"मग आम्हांला शब्द नाहीं काढायचे वाटतं?"

"मग काढ कीं. घेऊन ये तुझं रीडर नि वही."

"पण माझ्याबरोबर माझ्या मित्रांनाहि काढायचे आहेत."

"मग त्यांनाहि येऊं दे इथं."

"ते म्हणताहेत आम्ही नाहीं येणार कुठं. . इथ्थं आणली पाहिजे डिक्शनरी."

"बरेच्च आहेत कीं तुझे मित्र! पुस्तक तुझं नि तें त्यांच्या हातांत पाहिजे असा हट्ट करणारे ते रे कोण! तूं मुळींच ऐकूं नको त्यांचं. हवं असलं तर येतील इथं, नाहींतर जातील आपल्या घरीं."

हेमाच्या या बोलण्यावर काय उत्तर द्यायचं हें राजाबाळला सुचेना. त्याला तिचा खूप राग आला होता, पण त्याचा काय उपयोग होता? त्याची केविलवाणी चर्या पाहून हेमा म्हणाली—

"आणि हें बघ राजाबाळ, तुम्हांला रीडरचे शब्द मराठींत काढायचे असतात, त्याला इंग्रजी-मराठी डिक्शनरीच पाहिजे. ती जा घेऊन. तुमचंहि काम झालं, नि माझीहि खोटी नाहीं."

"आम्हांला नको तसली डिक्शनरी—" असं पुटपुटत राजाबाळ तिथून चालता झाला.

पण रुसून, रागावून किंवा रडत बसून त्याला आतां भागण्यासारखं नव्हतं. हरीला पुस्तक परत देणं भागच होतं. त्याचे पैसे परत फेकून त्याला गप्प बसवतां आलं असतं कदाचित्, पण त्याच्याकडून घेतलेले पैसे शिल्लक कुठं राहिले होते? हॉटेल-सिनेमांत त्यांचा फडशा पडला होता. मग या पेंचांतून कसं निसटायचं? राजाबाळच्या नजरेपुढं पुढच्या एकेक गोष्टी डोळे वटारून उभ्या राहूं लागल्या. हरी हमरी-

तुमरी करील, मास्तरांकडं तक्रार करील, मग माईशीं भांडायला येईल आणि आपलं बिंग फुटून आपली फजिती होईल. मग माईला काय वाटेल? ती आपलं पाहिल्यासारखं कोडकौतुक तर करणार नाहींच, पण आपल्यावर ती कोणत्याच गोष्टींत विश्वास ठेवणार नाहीं. मग आतां करावं तरी काय?

पण अशा बावरलेल्या अवस्थेंत तो फार वेळ राहिला नाहीं. त्याला आपली लबाडी पचवली पाहिजे होती आणि दुसरी लबाडी केल्यावांचून ती पचण्यासारखी नव्हती. काय वाट्टेल तें करावं लागलं तरी हरकत नाहीं, पण तें करायचं त्यानं ठरवलं. हेमाचा डोळा चुकवून डिक्शनरी पळवायचा घाट त्यानं घातला. आपल्या घरांत बसून तो हेमावर पाळत ठेवीत होता.

त्याला हवी होती तशी संधि त्याला घटकाभरांत मिळाली. ती डॉक्टरांच्या बाळला घेऊन बाहेर चाललेली त्याला दिसली. तो उठला. हेमाच्या बिऱ्हाडीं गेला. सर्व माणसं आंत आहेत व हेमाची अभ्यासाची खोली अगदीं मोकळी आहे असं पाहून त्याला मोठा हर्ष झाला. त्याला शोधीतहि बसावं लागलं नाहीं. त्याला हवं असलेलं पुस्तक टेबलावरच दिसलं. त्यानं तें लगबगीनं हस्तगत केलं. इतक्यांत कुणाचीं तरी पावलं वाजलीं. चोराच्या मनांत चांदणं म्हणतात तशांतली तऱ्हा! खरोखर कुणी आलं नव्हतं कीं गेलं नव्हतं. पण राजाबाळला पावलांचा नुसता भास झाला होता! त्यानं पुस्तक शर्टच्या आंत दडवलं आणि बाहेर धूम ठोकली.

तो तडक हरीकडं गेला. हरि घरीं नव्हता. त्यानं पुस्तक त्याच्या धाकट्या भावाकडं दिलं. आणि हरि आल्यावर तें त्याला द्यायला सांगितलं. आपलं काम सोळा आणे फत्ते झालं असं त्याला वाटलं आणि मोठ्या समाधानानं तो जेवायला बसला. हेमा रोजच्यासारखी माईच्याकडं आली. इकडच्या तिकडच्या गोष्टी ती बोलत होती. आपली चोरी

तिच्या लक्षांत आली नाहीं हें राजाबाळनं ओळखलं. त्यानं मनांतल्या मनांत आपल्या चातुर्याला शाबासकी दिली.

पण त्याचा हा आनंद किती वेळ टिकला? घटकाभरसुद्धां नाहीं. हरीच्या रूपानं त्याच्या लबाडीचा पुरावा दत्त म्हणून पुढं आला.

"ए राजाबाळ, डिक्शनरीऐवजीं हें रे कसलं पुस्तक दिलंस? पुठ्ठयावरून मीहि प्रथम फसलों. पण उघडून पाहातों तों या ओ हेनरीच्या गोष्टी!"

"अय्या! बघूं" हेमानं पुस्तक हातीं घेतलं. उघडून पाहातांच तिचं आश्चर्य दुणावलं.

"हें माझं पुस्तक तुझ्याकडं रे कसं आलं! तुझ्या ताईसाहेबांनीं नेलं वाटतं पळवून मला नकळत. अशी आहे पण!"

"ताई कशाला देईल असलं पुस्तक मला? या राजाबाळनं माझी डिक्शनरी म्हणून दिलं होतं—"

राजाबाळचं जेवण थांबलं. काय केलं नि काय होऊन बसलं! आतां आपल्या अब्रूचा भोपळा पुरता फुटला हें त्याला समजून चुकलं.

"अरे, स्वस्थपणें जेव ना! याचं लक्षच नसतं बघ जेवणाकडं हेमाताई. त्यांतून मित्र नि पुस्तकं म्हटलीं कीं झालंच." माई बोलल्या.

हेमाला हंसूं आलं माईचा भोळा-भाबडेपणा पाहून! अशा माउलीच्या पदरीं राजाबाळसारखं लबाड पोर देवानं बांधावं याचं तिला वाईट वाटलं. चुकून त्यानं लबाडी केली असली, तर ती खोड कोवळी असतांनाच कापून टाकलेली बरी असं वाटून हेमा म्हणाली—

"चल हरी आमच्या इथं. हात धुऊन राजाबाळहि येतोय तिथं. ये हं राजाबाळ."

हेमाची ही ताकीद मुकाट्यानं पाळली राजाबाळनं.

कांहींतरी भानगड आहे व ती आपणापासून छपवून ठेवण्याचा हेमाचा प्रयत्न चालला आहे असा माईना संशय आला. आपल्या



“ अय्या ! बघूं ” हेमानं पुस्तक हातीं घेतलं.
उघडून पाहातांच तिचं आश्चर्य दुणावलं.

राजावाळच्या अंगलट येणारं कसलं लफडं असेल तर तें आपल्याला न कळून तरी कसं चालेल, असं त्यांना वाटलं. ही चुटपुट त्यांना चैन पडूं देईना. लोकांचीं बोलणीं चोरून ऐकणं वाईट, हें माईना माहीत होतं आणि त्या तसल्या फंदांत चुकूनसुद्धां पडल्या नसत्या. पण मुलाची माया व काळजी त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. माई हलक्या पावलानं गेल्या आणि दाराआड राहून हेमाच्या खोलींतले सवाल-जवाब ऐकूं लागल्या.

राजावाळनं करतां येईल तितकी उडवाउडवी करून पाहिली, पण हेमानं त्याच्याकडून त्याची लबाडी वदवून घेतलीच. हरीच्या रूपानें त्याच्या लबाडीचा मूर्तिमंत पुरावा हजर असल्यामुळं त्याला एकेक गोष्ट कबूल करावीच लागली. हेमानं तीन रुपये हरीच्या हातावर ठेवून पुस्तकाचं प्रकरण निकालांत काढलं. हरीचीहि समजूत पटली. तो निघून गेला. हेमानं राजावाळला चावट पोरांची संगत सोडण्याबद्दल, लबाडी न करण्याबद्दल उपदेश केला. एवढंच नव्हे, तर 'पुन्हा असं करणार नाहीं' अशी त्याच्याकडून शपथहि घेवविली.

माई गुपचूप घरीं येऊन बसल्या. त्यांचं जेवण अझून व्हायचं होतं, पण जेवणावर आतां त्यांना वासनाच उरली नव्हती. मुलाच्या सुखासाठीं आपण इतका जीव तोडीत असतांना हें असं कां व्हावं, हें मुलाचं दुर्दैव कीं आपलं नष्टचर्य, असे प्रश्न त्यांच्या मनांत थैमान घालीत होते. खट्याळ पोरांचा उपद्रव आपण चुकवला, पण वाह्यात सोबत्यांच्या तावडींत तो सांपडलाच. मुलाला घरांत कोंडून का ठेवायचं? तें शक्यच नाहीं. तो बाहेर जाणार आणि बाहेरचे बरेवाईट सोबतीहि त्याला चिकटणार. जगांतल्या सगळ्या मुलांसारखाच आपलाहि मुलगा. विचारांच्या आणि शंकाकुशंकांच्या भोवऱ्यांत माईचं मन इतकं व्यग्र होऊन गेलं होतं कीं, त्यांच्या जवळच असलेल्या दुधाच्या पातेल्यावर मांजर ताव मारतं आहे हेंहि त्यांना उमगलं नाहीं! अतिविचारानं त्यांचं डोकं भणभणायला लागलं आणि इतका विचार

करूनहि पुढं काय करावं याचं निश्चित उत्तर न समजल्यामुळं त्यांना रडूं यायला लागलं.

"भलते-सलते भोग वांट्याला येण्याऐवजीं देवा मला मरण दे" अशी माईनीं करुणा भाकली. दुसरं काय करणार बिचारी!

आपली चोरी उघडकीला आली याबद्दल राजाबाळ कष्टी झाला, तरी ती माईला कळली नाहीं याचं समाधानहि त्याला वाटत होतं. 'माईला सांगूं नको' अशी त्यानं हेमाची विनवणी केली होती आणि तिनं ती मान्यहि केली होती. पण हेमानं न सांगतांच माईंना सगळा प्रकार माहीत झाला होता हें कुठं त्याला ठाऊक होतं?

राजाबाळ रोजच्यासारखा शाळेंत गेला. माईनीं न जेवतांच स्वैंपाक-घरांतली आवराआवर केली आणि दार बंद करून त्या आडव्या झाल्या. पण डोळा लागण्याऐवजीं विचारांची गर्दीच बळावयाला लागली. त्या उठल्या. मन दुसऱ्या कशांततरी गुंतवावं म्हणून त्यांनीं कांहींतरी वाचीत बसायचा बेत केला. राजाबाळचं पुस्तकाचं कपाट उघडून पाहावं म्हणून त्या उठल्या. कपाटाला कुलूप! किल्ली शोधण्यासाठीं त्यांनीं टेबलाचा कप्पा उघडला. तिथं नाहीं सांपडली ती. त्यानं ती शाळेंत नेली असेल असं त्यांना वाटलं. पुन्हा वाटलं शाळेंत कशाला नेईल तो किल्ली? असेल घरींच. त्याच्या दुसऱ्या कोट-जाकिटाच्या खिशांत असेल ती. माईनीं खुंटाळ्यावरील कपड्यांचे खिसे चाचपले. पण एका खिशांत किल्लीऐवजीं त्यांच्या हाताला दुसरंच कांहींतरी लागलं! त्यांनीं तें बाहेर काढलं. सिगारेट! एक सबंध नि एक अर्धी—जळकी!

"कार्टं हेंहि शिकलं कीं काय तरी! नशिबांत काय काय वाढून ठेवलंय कुणास ठाऊक!" असं म्हणून माईनीं कपाळाला हात लावला आणि त्या मटकन् खालीं बसल्या.

* * *

# ६

माई कितीतरी वेळ विषण्ण होऊन बसून राहिल्या. आपल्या जिवाचा जो एकुलता एक आधार, त्याला दुर्गुणांची कीड पोखरीत आहे आणि ती अशीच पोखरीत राहिली तर तो आधार मोडून कोलमडून पडेल या विचारानं त्यांना रडूं यायला लागलं. आपला राजाबाळ हुषार आहे, त्याला खूप खूप शिकवायचं, त्याला मोठा बनवायचं, सुंदर आणि सद्गुणी बायको त्याला मिळवून द्यायची आणि त्याचं वैभव, मानमरातब व सुखाचा संसार पाहात नातवंडांना खेळवत आयुष्य संपवायचं हीं माईचीं मनोराज्यं पुसून गेलीं होतीं; आणि दुराचारी, व्यसनी, उधळ्या आणि भिकेला लागलेल्या राजाबाळचीं भेसूर चित्रं माईच्या मनःपटावर उमटायला लागलीं होतीं. माईना तीं पाहावेनात!

'हेंच का माझं नशीब! कोणतं पाप मीं केलं म्हणून असं नष्टचर्य माझ्या वांट्याला यावं!' असे हताश विचार त्यांना चैन पडूं देईनात. मुलाचे असे धिंडवडे बघण्याची पाळी येण्यापेक्षां आतांच आपले डोळे मिटले तर किती छान होईल, असं माईना वाटूं लागलं. प्रेमळ आणि कर्तबगार पति सुखाच्या ऐन सुरुवातीला सोडून गेला, तेव्हां माईना आकाश कोसळल्यासारखं झालं होतंच, पण पोरका झालेल्या राजाबाळकडं पाहून त्यांनीं आपलं दुःख गिळलं होतं, आणि पतीनं स्वाधीन केलेली ही ठेव काळजीपूर्वक जतन करायची आणि बापापेक्षांहि बेटा सरस बनवायचा अशी महत्त्वाकांक्षा मनांत बाळगून माई दिवस काढीत होत्या. नवऱ्याकडून झालेल्या अपेक्षाभंगाची भरपाई मुलाकडून करून घेऊं आणि सद्गुणी पराक्रमी पुत्राची 'धन्य माउली' म्हणून घेऊं, हें माईचं मनोराज्य. पण—!

माई भांबावल्या, भ्याल्या ! रोजचा त्यांचा परिपाठ म्हणजे या वेळीं त्या वाचीत पडलेल्या असायच्या. वाचन झाल्यावर राजाबाळच्या खाण्याच्या तयारींत त्यांचा वेळ जायचा. भुकेजून आलेल्या मुलाला सात्त्विक आणि स्वादिष्ट खाऊ देण्यांत माईंना केवढा आनंद वाटे ! खातांना राजाबाळकडून शाळेंतल्या गमती ऐकण्यांत तर त्यांना ब्रह्मानंद वाटे. केशाची कविता चुकल्यावर मास्तरांनीं त्याची कशी टिंगल केली, खराब अक्षराबद्दल थट्टा केल्यामुळं कमल कशी रडली, भिक्याचं कॉपीबुक शाई सांडून कसं खराब झालं, अशा नित्य नव्या गमती राजाबाळकडून ऐकणं हा माईंचा एक आवडीचा विषय होऊन राहिला होता आणि म्हणूनच फराळाची ताटली तयार ठेवून त्या राजाबाळच्या घरीं येण्याची आतुरतेनं वाट पाहात वसत.

पण आज माईंना या रोजच्या दिनचर्येचं भानच नव्हतं ! त्या इतक्या बधिरल्यासारख्या झाल्या होत्या कीं, गालावरले अश्रूंचे ओघळ पुसण्याची उमकाहि त्यांना राहिली नव्हती ! ते गालावरच्या गालावरच सुकून जात होते !

राजाबाळ घरीं आला. माईकडं पाहातांच त्याच्या मनांत धस्स झालं. त्यानं विचारलं—

"माई ! अशी कां बसली आहेस ?"

माईंनीं तोंड फिरवलं. त्यांचा हुंदका ऐकून राजाबाळ भ्याला. तो उद्गारला—

"काय झालं सांग ना माई !"


माईंचं दुःख अधिकच अनावर झालं.

राजाबाळ बावरला, भ्याला. आईच्या गळां पडून त्यानं तिचं तोंड आपल्याकडं वळवून घेतलं आणि कांपऱ्या आवाजांत विचारलं—

"माई, सांग ना ग ? काय झालं तुला रडायला ?"

माईंनी त्याला बाजूला लोटून म्हटलं—

"चालता हो इथून...दळभद्री लक्षणाचं पोर....माझंच नशीब खोटं—"



“ चालता हो इथून........दळभद्री
लक्षणाचं पोर.......माझंच नशीब खोटं—”

राजाबाळ चपापला. आपली लबाडी माईंना कळली हें तो समजून चुकला. तो ओशाळला आणि माईंच्या रागाच्या शब्दांनीं त्याचं सगळं अवसान संपुष्टांत आलं. आतांपर्यंत माईंच्या तोंडून त्यानं मायेचे, कौतुकाचे शब्दच ऐकले होते. कठोर शब्दांचा हा पहिला प्रहार होता आणि कल्पना नसतांना तो त्याच्यावर पडला होता. छब्याच्या तालमींत भलभलत्या गोष्टी करायला तो निढावला असला, तरी माईंचा कोप पचवण्याची कुवत त्याच्या मनाला नव्हती. फार काय, आपले चाळे माईंना कळायचेच नाहींत अशा वेड्या विश्वासानं तो निर्धास्तपणें मजा करीत होता. पाप कांहीं काळ पचलं, तरी कधीं ना कधीं उघडकीस येतंच, हा जगाचा कायदा माहीत नव्हता बिचाऱ्याला. तो कायदा त्याला आज कळला.

आजपर्यंत लडिवाळपणें कुरवाळणाऱ्या माईनंच असं तुसडेपणानं झिडकारलेलं पाहातांच राजाबाळला भडभडून आलं. तो परत तिला बिलगला आणि ढसढसा रडत म्हणाला—“ माई– ”

माईंनीं फिरून त्याला बाजूला लोटलं आणि म्हटलं—“ पुरें झालं हें सोंग. आजपर्यंत फसलें, आज चांगले डोळे उघडले माझे. आतां नाहीं मी फसायची. चोऱ्या करा, विड्या ओढा, नाहींतर शेण खा. चल, चालता हो माझ्यापुढून. ”

माई ताडकन उठून आंत निघून गेल्या. राजाबाळ हताश होऊन कितीतरी वेळ तिथंच बसून होता. त्याचं अपराधी मन माईपुढं पुन्हां जायला भीत होतं. त्याला दुःख तर झालंच होतं, पण दुःखापेक्षां भीतीचा पगडा त्याच्या मनावर अधिक बसला होता. थोड्या वेळानं तो उठला, आपल्या खोलींत गेला. पुस्तकाचं कपाट त्यानं उगीचच उघडलं आणि उघडलं तसं झांकलं. टेबलावरच्या वह्यांची चाळवाचाळव केली, खुंटाळ्यावरले कोट शर्ट उचलून फिरून तिथंच ठेवले! तो कांहींतरी करीत होता. पण आपण काय करतों आहों आणि कां

रतों आहों हें मात्र त्याला उमगत नव्हतं. उमगावं तरी कसं ? त्याचं
न ठिकाणावर कुठं होतं ?

राजाबाळच्या मनांत विचारांचं काहूर माजलं होतं. आणि माईच्या मनांततरी तें कुठं नव्हतं ? त्या रागाच्या झटक्यासरशीं आंत निघून गेल्या असल्या, तरी आंतल्या कोणत्याच कामाला त्यांचा हात लागेना. फळीवरचे डबे इकडचे तिकडे सरकव, दुभत्याचं कपाट उघडून विरजणावरची झाकणी चाचप, असं कांहींतरी त्या करीत होत्या. हाताचे असे चाळे चालू असतां त्यांच्या डोक्यांत विचारचक्र फिरत होतं. आपण राजाबाळला झिडकारलं यांत आपण चुकलों तर नाहीं ? आतां-पर्यंत आपण त्याला कधीं रागानं बोललों नाहीं कीं डोळे वटारून दटावलंहि नाहीं. तो मागेल तें तें त्याला दिलं, फार काय, त्यानं न मागतांहि त्याची हौस परोपरीनं पुरविली. मग आजची आपली कठोरता त्याला कशी सोसवेल ? इतर मुलांचं आपण पाहतों, तीं आईबापांच्या लोभाप्रमाणं रागालाहि सरावलेलीं असतात. वडील माणसांनीं कोडकौतुक केलं तरी तीं जशीं हुरळून जात नाहींत, तशीं त्यांच्या कावण्या-कदरण्यानं किंवा हाणामारीनं डगमगतहि नाहींत. उन्हाळ्या-पावसाळ्याला तीं सारखींच मुरलेलीं असतात. आपल्या राजाबाळला आपण आतांपर्यंत कधीं उन्हाळ्याची तिरीप लागूं दिली नाहीं. आज पहिल्यांदा आणि फारच कठोर वागलों आपण त्याच्याशीं ! सोसवेल का हा प्रहार लेकराला ? चुकलंच आपलं.

माईचं एक मन असं म्हणे, तर दुसरं मन सांगे, असं उग्र रूप योग्य वेळीं धारण करायलाच हवं. दुर्गुणी पोराला दटावणं हें आईचं कर्तव्य आहे. तें कठोर असलं, तरी तें मन घट्ट करून बजावलं पाहिजे. ताप भरल्यावर कुटकीचा कडू काढा पाजायला नको का ? देवाची सुंदर मूर्ति घडवायची तर छनी-हातोडा चालवलाच पाहिजे. घाव बसेल, टवके उडतील म्हणून भिऊन कसं चालेल ? मूल म्हणजे

खाणींतून निघालेला दगड. आईबापांनीं त्याला देवकळा आणायची तर हळुवारपणानं नुसतं गोंजारून भागायचं नाहीं. टाकीचे घाव घालायला हवेतच. आपल्याला आपल्या राजाबाळला असं घडवायचं आहे, तर नुसता हळुवारपणा सोडला पाहिजे. आपलं त्याच्याशीं कठोरपणानं वागण्यांत कांहीं चुकलं नाहीं.

प्रेमळ माउली आणि कर्तव्यदक्ष माता यांच्या या झगड्यानं माई भांबावून गेल्या. पण घटकाभरांत त्यांच्यामधील प्रेमळ माउलीचाच जय झाला! त्यांना वाटलं, राजाबाळच्या हातून होऊं नयेत त्या गोष्टी झाल्या खऱ्या. तो जात्या वावगा मुलगा नाहीं. दुसऱ्या कोणाच्या नादानं त्यानं हें केलं असलं पाहिजे. मुलाला काय कळतं? दुसऱ्याचं पाहिलं कीं तसं करावंसं वाटणारच. आपण करतों तें वाईट,एवढा पोंच पोराच्या बुद्धीला कुठून असणार? त्याची चूक आपण त्याला समजून दिली पाहिजे. कठोरपणा सोडला पाहिजे. देव बनविण्यासाठीं टाकीचे घाव घातले तरी ते हलक्या हातानंच नकोत का घालायला? फार जोरानं घाव घातला तर शिळा भंगायची भीति. आपल्या कठोरपणानं राजाबाळचं मन चिंबून तर जाणार नाहीं? छे, नकोच तें.

माईंनीं बशींत वड्या घातल्या आणि राजाबाळला द्यायला निघाल्या. राजाबाळ कॉटवरील वळकटीवर डोकं टेकून उपडा पडला होता. माईंचीं पावलं वाजतांच त्यानं मान वर करून पाहिलं. त्याची चर्या कमालीची उदास दिसत होती. माईंना भडभडून आलं. पण आपण आतांच कनवाळूपणा दाखवला तर आपला पहिला राग खरा नव्हता, असा राजाबाळचा समज होईल असं वाटून त्यांनीं रागाचं नाटक तसंच चालू ठेवलं.

"हें घ्या खायला." एवढंच बोलून त्यांनीं बशी राजाबाळपुढं ठेवली आणि मागल्या पावलीं त्या परत स्वैंपाकघरांत निघून गेल्या.

'घ्या' हा माईंच्या तोंडचा शब्द राजाबाळच्या जिव्हारीं लागला.

तिची रागीट चर्या आणि तडकाफडकीं निघून जाणंहि त्याला भीतिप्रद वाटलं ! माईनीं त्याला आतांपर्यंत कधीं घ्या, द्या, असं बहुमानवाचक बोललेलं नव्हतं आणि आपलं खाणं होईपर्यंत माई जवळ बसून असायची व कधीं कधीं तर तिचा प्रेमळ हात पाठीवरून फिरत असायचा, अशी राजाबाळला संवय झालेली होती. आजचा हा प्रकार त्याला कसासा वाटला, असह्य वाटला. आपल्या आवडीचा खाऊ पुढं असून तो तोंडांत घालावा अशी इच्छाच त्याला होईना !

माई रागावली ! छब्याच्या नादाला आपण कशाला लागलों आणि भलंतसलंत करून बसलों ! छे, यापुढं छब्याबरोबर अक्षरहि बोलायचं नाहीं. त्याच्याबरोबर कुठं जायचं नाहीं. अभ्यास करायचा, पांचवींत पहिला नंबर मिळवायचा. हो, मिळवायचाच. आपली चूक कबूल करायची. पुन्हां असं करायचा नाहीं असं माईला सांगायचं. अगदीं शपथ घ्यायची माईच्या पायाची. असं मनाशीं म्हणत तो माईकडं जायला उठला, तोंच दारांत टांगा थांबल्याचा आवाज ऐकूं आला. त्यानं खिडकींतून पाहिलं—

मनूमावशी !

राजाबाळ पुढं गेला. टांग्याचा आवाज ऐकून माईहि दरवाजांत आल्या. बहिणीला पाहतांच त्यांची चर्या खुलली, कीं आपला उद्वेग तिला दिसूं न देण्यासाठींच माईनीं आपल्या मुद्रेवर हास्य उमटविलं हें त्यांचं त्यांना ठाऊक !

"अशी कशी अवचीत आलीस मनूताई ? आणि नेहमींसारखं पत्र नाहीं पाठवलंस ?" माईनीं बहिणीच्या हातची वळकटी काढून घेत विचारलं.

"म्हटलं एकदम जाऊन चकित करावं तुम्हांला." मनूमावशी उत्तरली, आणि राजाबाळकडं वळून म्हणाली, "आणि हे रावसाहेब घरीं कसे या वेळीं ! अन् चेहेराहि उतरलेला दिसतोय् ! कांहीं होतंय कीं काय तुला ?"

" कांहीं होत नाहीं मला मावशी ! " राजाबाळ म्हणाला.

" मग खेळायला नाहीं गेलास तो ? "

" खेळायला होय—अं—" राजाबाळ घुटमळला.

" अग, आंत चल बघूं ! चहा होऊं दे अगोदर. नाहींतर डोकं उठेल तुझं. बोलायला खूप वेळ आहे मग. "

माईचं हें बोलणं मावशीला थोडं चमत्कारिक वाटलं. मुलाचं बोलणं निघालं कीं तल्लीन होणारी माई आज त्या बोलण्यांत सामील तर होतच नाहीं, उलट त्या बोलण्याला खीळ घालण्याचीच तिची इच्छा दिसते, असा संशय मावशीला आला व ती मनांत म्हणाली, " कां बरं ? "

तिचा संशय बळावण्याला आणखी एक कारण झालं. मनूमावशी माईबरोबर आंत गेल्यावर राजाबाळ बाहेर आपल्या खोलींतच घुटमळत राहिला. मावशी दिसतांच तिच्या अवतींभवतीं रेंगाळत असायचं, शाळा-खेळाची शुद्धहि त्याला रहायची नाहीं, ही नेहमींची तऱ्हाहि आज दिसली नाहीं !

हा संशय मनूमावशीला चैन पडूं देईना. चहा घ्यायला बसतांच त्यांनीं हाक मारली—

" राजाबाळ, ए राजाबाळ ! अरे, बाहेर बाहेर कां तूं ? इकडं ये ना ! "

निरुपायानं राजाबाळ आंत आला. त्यानं आपली चर्या आनंदी करण्याचा आपल्याकडून प्रयत्न केला होता, तरी पण नेहमींचा टवटवीतपणा मावशींना दिसला नाहीं. त्यांनीं विचारलं,

" आज कांहींतरी बिघडलंय वाटतं स्वारीचं ? काय झालंय् रे ? "

" कुठं काय ? एक्झरसाइज लिहायचाय—"

" आहे ठाऊक अभ्यासाची काळजी. रात्र आहे, उद्यां सकाळ आहे, ढीग पाडशील तेवढ्यांत अभ्यासाचा. "

असं म्हणून मावशींनीं त्याचा हात धरून त्याला आपल्यापाशीं बसवून घेतलं आणि त्याच्या पाठीवर हात फिरवीत, त्याचं तोंड गोंजारीत विचारलं—

"कितवा नंबर आहे तुझा वर्गांत? कसलीं कसलीं बक्षिसं पटकावलींस या वर्षी?"

मावशी-भाच्यांचा लडिवाळपणा पाहण्यांत माईंना आल्हाद वाटायचा आणि त्यांच्या बोलण्यांत त्याहि भाग घ्यायच्या. पण आज त्या तिथं थांबल्याहि नाहींत! भांडीं विसळायला त्या परसदारीं उठून गेल्या! मावशींची खात्रीच झाली कांहींतरी बिघडलं असल्याबद्दल.

विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरं देतांना राजाबाळ चाचरत आहे, त्याचा चेहरा पडतो आहे ही गोष्टहि मावशींच्या चाणाक्ष नजरेंतून निसटली नाहीं. शाळेंतल्या आपल्या विक्रमांचं वर्णन करण्यांत खुलणारा—रंगून जाणारा राजाबाळ आज असा ओशाळवाणा कां? त्याचा नंबर खालीं गेला कीं तो मुळांतच नापास झाला? तसंच कांहींतरी असलं पाहिजे हें मावशींनीं ताडलं. त्यांना वाईटहि वाटलं त्याचं. पण त्या बाबतींत खोदखोदून प्रश्न विचारून आपल्या शंकेची शहानिशा करण्याची घाई मात्र त्यांनीं केली नाहीं. अपेशाचा कबुलीजवाब देण्याइतकी कठोर शिक्षा मुलाला दुसरी कोणतीहि घाटत नाहीं हें मुलांचं मानसशास्त्र मावशींना माहीत असल्यामुळं त्यांनीं तो विषय तिथंच सोडला.

संध्याकाळच्या जेवणाच्या वेळींहि मायलेकांमधील अढी मावशींना दिसलीच. हें घाल, तें घे, असं जेवतांना सारखं चालायचं, पण आज माईंनीं मुक्यानं वाढप चालवलं होतं. आणि राजाबाळहि तोंडाऐवजीं हातानंच हवं नको दर्शवीत होता! माई बोलत होत्या, राजाबाळहि बोलत होता, पण तें एकमेकांशीं नसून मावशीशीं! त्या दोघांत अगदीं अळीमिळी बसली होती.

जेवण झालं, थोडासा अभ्यास केल्यासारखं करून राजाबाळ झोंपला. काम आवरून माई-मावशींनींही अंथरुणं पसरलीं. बहिणी-बहिणींच्या सुखदुःखाच्या गोष्टी सुरू झाल्या. आपले हे तातडीच्या कामासाठीं फिरतीवर गेले, मुलांचं करायला सासूबाईहि घरीं आल्या आहेत, या संधीचा फायदा घेऊन आपण वहीणभाच्याला भेटायला मुद्दाम आल्याचं मावशींनीं सांगितलं. माईनींहि 'फार फार छान केलंस' म्हणून आनंद व्यक्त केला आणि चार आठ दिवसांत परत जाण्याची घाई न करतां महिनाभर तरी राहिलं पाहिजे आल्यासारखं, असा आग्रह चालवला. फारां दिवसांनीं झालेल्या बहिणी-बहिणींच्या गांठीभेठींत व्हावयाच्या त्याच गोष्टी माई व मनूमावशी बोलून घेत होत्या.

तरी पण माईच्या जीवनांतला नेहमींचा उल्हास आज दिसत नव्हता आणि त्याचं कारण शोधून काढलं पाहिजे असं मावशींना तीव्रतेनं वाटूं लागलं होतं. आधींच विसकटलेल्या माईच्या संसारांत एखादं नवं नष्टचर्य डोकावूं लागलं असलं तर त्याला हुसकून लावण्याच्या कामीं आपण आपली शक्ति-बुद्धि खर्च केली पाहिजे, आपली माई नि तिचा राजाबाळ यांचं सुख आपण वाढवलं नाहीं, तरी टिकवलं पाहिजेच, असं मावशींना वाटूं लागलं, पण माईला कसली काळजी हैराण करते आहे, कसल्या चिन्तेचे चटके तिच्या मनाला बसत आहेत? माई तर त्यांतलं अक्षरहि बोलायचं टाळते आहे! राजाबाळहि उडवाउडवीच करतो आहे! मग हें गुपित कसं उकलायचं?

एकीकडं बहिणीशीं बोलत असल्या, तरी मनूमावशींच्या मनांत अशा विचारांची गर्दी उसळली होती. अखेर स्पष्ट विचारण्यावांचून गत्यन्तर नाहीं असं दिसून आल्यावर त्या म्हणाल्या—

"माई, रागावूं नको हं, पण स्पष्टच विचारतें, माझ्याबद्दल तुला वाटत आलेला जिव्हाळा नि विश्वास कमी झालेला दिसतोय्. कां ग? माझ्याकडून कांहीं चुकलंय् का?"

“ मनू ! नसता संशय घेऊन जिवाला त्रास करून घ्यायची तुझी खोड अझून कमी कशी होत नाहीं ? कशावरून तुला असा संशय आला तें कळूं दे तरी ? ”

“ संशय येण्यासारखं तुझं वागणं चाललंय कीं नाहीं हें तुझं तूंच पहा कीं विचार करून ! आल्यापासून मी बघतेंय्, तूं राजाबाळविषयीं अक्षर बोलली नाहींस ! बाळच्या बाललीलांचं वर्णन करण्यांत तुला ब्रह्मानंद होत असे, पण आज तूं तो विषय बळें बळें टाळते आहेस ! त्याच्याशींहि तुझा अबोलाच दिसतोय. तोहि तुझ्यामाझ्यापासून दूरदूर राहायला पाहतोय ! कां ग असं ? तूं तोंड मिटून धरलंस तरी तुझी चर्या तुम्हां मायलेकरांत कांहींतरी बिनसलंय हें सांगते आहे. ” बोलतां बोलतां मावशी माईंना बिलगल्या. त्यांनीं माईच्या तोंडावर हात फिरविला आणि बोलणं पुढं चालू केलं—

“ असं नको गडे करूं. काय झालंय तें मला सांग. तुला कसली अडचण असेल तर ती दूर करण्यासाठीं तुझी मनू शक्य ती धडपड करील. मग सांग ना ! ”

बहिणीचं हें प्रेम आणि कळकळ पाहून माईंना भडभडून आलं. आपल्या अंतर्यामीं बोचणारा कांटा दुसऱ्यापुढं कशाला सांगायचा ? सहानुभूतीऐवजीं उपहासच वांट्याला यायचा, असं जगाच्या अनुभवानं माईंना वाटत होतं. पण बहिणीच्या या सहानुभूतीनं त्यांच्या अंतर्यामींच्या वेदना बाहेर खेंचल्या.

माईंनीं राजाबाळचा सारा वृत्तान्त निवेदन करून हताश स्वरांत म्हटलं—

“ मनूताई, जीवापलीकडं ज्याला जतन करीत आलें, तो माझ्या आशेचा एकुलता एक अंकुर. पण त्याला दृष्ट लागली ग. वाईट संगतीनं म्हण, कीं माझं नशीबच दळभद्री म्हण, त्यावर दुर्गुणांची कीड पडायला लागलीय्. बाळ आपल्या हुषारीनं नि चांगल्या गुणानं

सर्वांकडून धन्य म्हणवून घेईल आणि त्याचं तें कौतुक बघून माझ्या कष्टासायासांचं पारणं फिटेल, ही मला केवढी आशा होती! पण हें असं होऊन बसलंय्. मग मी जगायचं तरी कशासाठीं ग?"

माईना अधिक बोलवेना. बहिणीच्या गळां पडून त्या ढसढसा रडायला लागल्या. त्यांच्या त्या केविलवाण्या अवस्थेनं मनूमावशीहि गहिंवरल्या. बावरल्या. या आपत्तींतून पार पडण्याचा कोणता उपाय बहिणीला सुचवावा हें त्यांना कळेना.

घटकाभर दोघी बहिणी सुन्न होऊन पडल्या होत्या. नंतर मनूमावशींना एक कल्पना सुचली. त्या म्हणाल्या—

"तूं मुळींच हवालदील नको होऊं माई. सगळं सुरेख होईल. मी काढलाय उपाय. सकाळीं ठरवूं आपण. झोप तूं स्वस्थ."

* * *

## ७

"काळजी करूं नको, सगळं कांहीं छान होईल" असा माईना धीर दिला खरा, पण राजाबाळची सुधारणा करायची कशी हें मनूमावशीला सुचेना. त्याला जडलेल्या या घाणेरड्या खोडी झाडून काढण्याचा कोणता उपाय माईला सुचवावा, त्या संवयी त्याला जडल्याच कशा, असे अनेक प्रश्न मावशींच्या मनांत गर्दी करूं लागले. एका चांगल्या मुलाच्या जन्माचं मातेरं होतंय, यापेक्षां आपल्या प्रेमळ आणि दुर्दैवानं नाडलेल्या बहिणीच्या आशेचा एकुलता एक तन्तु तुटत चाललेला आहे, या गोष्टींचं मावशींना अधिक दुःख वाटत होतं.

मावशींनीं खूप विचार केला. निश्चित आणि हुकमी उपाय शोधून काढलाच पाहिजे. औषधयोजना करतांना जाणता वैद्य दुखण्याच्या

बाह्य लक्षणांपेक्षां त्याचा उगम शोधून काढतो व त्यावरच मारा करतो. दोषाचं उगमस्थान नाहींसं केलं म्हणजे रोगी आपोआपच सुधारतो, ही दृष्टि ठेवून मावशी राजाबाळच्या आयुष्यक्रमाचं संशोधन करूं लागल्या. राजबाळला घाणेरड्या संवयी जडल्या, त्या कुसंगतीमुळं जडल्या असल्या पाहिजेत ही गोष्ट सहजच कळण्यासारखी होती. पण त्याला संगत जडली ती कुसंगतच कां जडली ? त्याच्या शाळेंत सद्वर्तनी मुलं असतील, त्यांची मैत्री संपादन करण्याऐवजीं राजाबाळ दुर्वर्तनी दोस्तांच्या नादाला कां आणि कसा लागला, हें कोडं त्यांना सुटेना. त्याच्याकडूनच याचा उलगडा होतो का पहावा म्हणून त्यांनीं त्याच्या खोलींत जाऊन विचारलं—

" कां हो राजेश्री, अभ्यासावर फार जोर चाललाय् आतांशा ? कालपासून बघतेंय् मी, मावशीची आठवणहि होत नाहीं आहे तुम्हांला ! "

" न व्हायला काय झालं ? पण परीक्षा आलीय्—"

" इतक्यांत रे कुठली परीक्षा ! पाडवा झाल्यावर परीक्षा असतात. अन् पाडवा तर किती दूर ! मग तुझीच एवढी घाई कशासाठीं ? "

" किनई मावशी, आतां पहिल्यासारखे आमचे अभ्यास थोडे असत नाहींत. रोजचे अभ्यास करून उजळणी करायची म्हणजे—"

" पुरे झाले तुझे अभ्यासाचे सडगर. पांचवीचे अभ्यास किती असतात हें ठाऊक आहे मला. भाउजींचा मुकुंद सहावींत आहे, तो तर तासाभराहून अधिक अभ्यास केलेला दिसत नाहीं. लिहाबिहायचं असलं तर बरीक बसतो लिहीत थोडा वेळ अधिक. इतकं असून त्याचा नंबर खालीं असतो असं नाहीं हं. परवांच्या परीक्षेंत त्याला स्कॉलरशिप मिळालीय्. त्याबद्दल बाई त्याला म्हणाल्यासुद्धां कीं ' तुझं नि अभ्यासाचं वांकडं असून बरी रे तुला स्कॉलरशिप मिळाली ! अभ्यासापरीस तुझं किरकेट नि हुतुतु बघूनच तुला पहिला नंबर दिलेला दिसतोय तुझ्या

मास्तरांनीं !' त्यावर मुकुंद म्हणाला, 'वैनी, तालीम मास्तर परीक्षा घेतात असं वाटतं कीं काय तुला ? मी अभ्यास करत नाहीं असं कशावरून म्हणती आहेस तूं ? वर्गांत मास्तर शिकवतात तें मन लावून ऐकलं आणि सांगितलेले धडे वेळच्या वेळीं लिहिले वाचले, कीं उत्तम अभ्यास होऊन जातो. त्यासाठीं ऐन वेळीं उरस्फोड करावी लागत नाहीं मग.' मला पटलं बाबा मुकुंदाचं हें सांगणं. तूं वर्गांतल्या शिकवण्याकडं नीट लक्ष देत नाहींस वाटतं ? आणि रोजचे धडे वेळच्या वेळीं केले नसशील; होय ना ?"

मावशीच्या या सवालानं राजाबाळ गांगरला. उत्तर देतांना त्याची उडणारी तारांबळ मावशींच्या लक्षांत आली. त्याला अधिक खिजवण्यांत अर्थ नाहीं हें ओळखून त्यांनीं विषय बदलला. त्यांनीं विचारलं—"यंदा तुझ्या शाळेंत कोणकोणत्या खेळाच्या शर्यती झाल्या ?"

"खूप झाल्या. आमच्या हायस्कूलनं सबंध जिल्ह्याचं क्रिकेट शील्ड पटकावलंय् अन् हुतुतूची ढालहि आमच्या शाळेलाच मिळालीय्. मुलांचंच काय पण मुलींनींसुद्धां निरनिराळ्या गेम्समधें चँपियनशिप मिळवलीय ! रिंगटेनिसमधें तारा कदम आणि मनू बर्वे यांनीं कप मिळवले अन् जान्हवी प्रकाशेनं पोहण्यांतलं पदक जिंकलं. महापुरांतनं नदी पोहून गेली ती !"

"छान ! तुमची शाळा अभ्यासाप्रमाणं खेळाकडंहि लक्ष देते हें चांगलं आहे. बरं, पण तूं कोणकोणते खेळ खेळतोस ? मॅचमधें किती धांवा काढल्यास तूं ?"

"मी टीममधें नाहीं मावशी."

"तें रे कां ? बरं हुतुतूंत ?"

"हुतुतूहि येत नाहीं मला."

"पोहायला शिकलाहेस कीं नाहीं ?"

राजाबाळनं नकाराची मान हलवली !

" म्हणजे कोणत्याच खेळांत तूं नाहींस म्हणायचा ! असा कसा रे तूं आंबलेला ! तुझ्याएवढ्या मुलाचा खेळ म्हटला कीं पाय पुढं पाहिजे खरं म्हटलं तर ! "

" मला पाण्याचं भारी भय वाटतं बघ. आणि माईहि मला पोहायला जायचं नाहीं म्हणते. "

" हुतुतु-क्रिकेटमधें नसतं ना पाणी ? मग त्यांत कां जात नाहींस तूं ? "

" जात होतों पहिल्यांदा, पण मुलं मला घेत नाहींत आपल्या टीममधें. मी धिटाईनं खेळत नाहीं असं म्हणतात. उगीच एकमेकांच्या अंगावर धडक घ्यायचं जमत नाहीं मला. असल्या धुडगुसांत सोन्या-नरवणेनं हात मोडून घेतला नि महिना न् महिना गळ्यांत हात बांधून हिंडत होता ! क्रिकेटमधें सुद्धां कमी लागत नाहीं मावशी. जया देसाईनं हाणलेला चेंडू पवाराच्या छातीवर आदळला, तर झीट येऊन पडला तो ! माईला मीं हें सांगितलं तर तिनं मला क्रिकेटमधें जाऊंच नको म्हणून सांगितलं. तिनं मला शप्पत घातलीय् आपल्या गळ्याची ! "

" धन्य आहे बाबा तुझी नि तुझ्या माईची ! बरं, पण राजाबाळ, चवथींत तुझा कितवा नंबर आला रे परीक्षेंत ? "

" किनई मावशी, परीक्षेला बसणारच नव्हतों मी. मला बरं नव्हतं बघ. पण तरी बसलों नि पास झालों. "

" सिनेमा-नाटकाला कधीं जातोस कीं नाहीं ? "

मावशींच्या या प्रश्नानं राजाबाळ चपापला. आपलं बिंग हिला कळलं तर नाहीं, असा त्याला संशय आला. काय उत्तर द्यावं हें त्याला कळेना. तिच्या प्रश्नाकडं आपलं लक्षच नाहीं असा बहाणा करून तो आपल्या वहींत कांहींतरी लिहायला लागला.

त्याचा हा गोंधळ पाहून मावशी काय समजायचं तें समजल्या. त्याच वेळीं——

“राजा ! ए राजाबाळ !” अशी हांक आणि त्याच्या पाठोपाठ छब्या येऊन दाखल झाला.

त्या वेळीं छब्याचं तिथं येणं राजाबाळला आवडलेलं दिसलं नाहीं; फार काय, छब्याच्या येण्यानं तो घाबरल्यासारखा झाला. ‘मावशी इथं आहे’ अशी त्यानं केलेली डोळ्याची खूणहि मावशींच्या चाणाक्ष नजरेंतून निसटली नाहीं.

“अभ्यासाला यायला लागली वाटतं तुझी मित्र-मंडळी? तुमच्या अभ्यासांत नको माझा व्यत्यय.” असं म्हणून मावशी खोलीबाहेर पडल्या.

मावशी खोलींतून गेल्या, तरी त्यांचे कान नि डोळे खोलीवर खिळलेले होते. कारण राजाबाळ वाईट सोबत्यांच्या संगतीला लागल्याचा जो संशय माईनीं प्रदर्शित केला होता, तो छब्याला पाहिल्यापासून मावशींच्या मनांत दृढ होऊं लागला होता. विड्यानं रंगलेले दांत, किमती पण मळलेला पोषाख, करपट चेहरा, हा छब्याचा अवतार पाहून त्याच्याविषयीं कुणाचाहि चांगला ग्रह होणं शक्य नव्हतं.

“राजा, आज शाळेला बुट्टी द्यायची रे. आज आपटबार हें स्टंट पिक्चर लागलंय अन् तीनला स्पेशल मॅटिनी शो आहे.”

“असूं दे. मी मुळींच यायचा नाहीं. आणि मला यापुढं बोलवायला येत जाऊं नकोस. तुझ्या नादानं—”

“काय झालं लेका माझ्या नादानं? आयती चैन करून माझ्याच नांवानं रडायला लागलास होय?”

“तूं निघून जा इथून. माईला सांगीन नाहींतर. आणि तुझ्या सांगण्यानं मीं आतांपर्यंत काय काय केलं तेंहि सांगीन.”

“खुशाल सांग. माई नव्हे, माईच्या बापालाहि भ्यायचा नाहीं मी. तूंच कसा चोर आहेस आणि तूंच थापा देऊन मला कसं फसवलंस असं सांगेन मी तुझ्या माईला. सांगेन कशाला? आत्तांच टाकतों

सांगून आंत जाऊन, कीं घरांतले पैसे चोरून तुमच्या राजाबाळनं काल सिगारेटचं पाकीट घेतलं म्हणून. पानवाल्याला रुजवातीला आणतों वाटलं तर. "

" छब्या, पाया पडतों तुझ्या. तूं माईकडं जाऊं नको. "

" लेका, माझ्यावर तूं उलटणार नि मीं गप्प बसूं होय ? "

" उगीच म्हटलं मीं तुला. शाळेंत ठरवूं आपण काय करायचं तें. तूं आत्तां जा इथून. मावशी आलीय्—तिला नको संशय यायला. "

अक्षर नि अक्षर ऐकूं आलं नाहीं, तरी छब्या-राजा संभाषणांचा आशय मावशींना समजला. राजाबाळला कुमार्गावर नेणारी ही एक वल्ली असून तिच्या कचाट्यांत तो चांगलाच अडकला आहे हें मावशींनीं ओळखलं. आईची आंधळी माया आणि वाह्यात मुलांची कुसंगति यामुळं राजाबाळ बिघडत असला पाहिजे आणि या दोन्ही गोष्टींपासून दूर केल्यावांचून त्याच्या सुधारण्याचा मार्ग नाहीं, ही गोष्टहि मावशींना कळून चुकली. आपल्या हताश बहिणीच्या जीवनांत आशेचा एकच एक तंतु म्हणजे तिचा मुलगा. तो करपूं लागलेला पाहून ती हवालदिल झाली आहे, भ्याली आहे, हें मावशींना दिसलं होतं आणि तिची भीति दूर करून तिच्या आशांकुराला टवटवी आणण्यासाठीं आपण खटपट केली पाहिजे आणि करायचीच, असं मावशींनीं मनाशीं ठरवलं.

जेवण होऊन राजाबाळ शाळेला निघाला तेव्हां मावशी म्हणाल्या—

" बरं का रे राजाबाळ, आज दोनला मधली सुटी झाली कीं मास्तरांची परवानगी घेऊन घरीं ये. मी भुवनेश्वराला जाणार आहें अन् तूं यायला हवंस माझ्याबरोबर. "

राजाबाळला मावशीच्या बोलण्यानं बरं वाटलं. छब्याच्या तोंडावर फेकायला ही चांगली सबब सांपडली त्याला. आतांपर्यंत हवाहवासा वाटणारा छब्या त्याला आज नकोसा झाला होता.

"येतों हं मावशी. अडचाच्या आंत येतों वघ."

राजावाळपुढें आपटवार सिनेमाचं आमिष आहे आणि तो जर सिनेमाला पूर्णपणें चटावलेला असेल, तर आपल्या बोलावण्याबद्दल कुरकुर करील अशी मावशींची कल्पना होती. त्याचं मन पारखण्या-साठींच त्यांनीं हा तोडगा केला होता; आणि जेव्हां त्यानं ताबडतोब रुकार दिला, तेव्हां आपला भाचा चैनीचा पूर्णपणें गुलाम झालेला नसून त्याला चांगल्या मार्गावर आणण्याचा आपला प्रयत्न वायां जाणार नाहीं असं वाटून त्यांना समाधान वाटलं.

दुपारीं त्यांनीं माईंना म्हटलं—

"माई, राजाबाळला सुधारण्याचा मी प्रयत्न करणार आहें, आणि त्यांत मला यश येईल असा मला विश्वासहि वाटतो. मात्र मला तुझं साहाय्य पाहिजे. तें तूं देशील?"

"म्हणजे ग काय तुझं विचारणं मनू? माझं एकुलतं एक लेकरूं. त्याच्या कल्याणासाठीं तूं झटत असतांना मी स्वस्थ कशी बसेन? सांग, मी काय करूं?"


"तूं स्वस्थ बैस, एवढंच कर. हें काम अवघड आहे. बाळचं सगळं कांहीं आपल्या हातून व्हावं असं तुला वाटतं. आपण केलं नाहीं, तर त्याचं दुसरं कोण करणार असं तुला वाटणं साहजिक आहे. पण मुलाची जपणूक करतांना किती करायची याचाहि विचार करायला हवा. आईनं मुलांवर मायेची पखरण घालावी आणि ती तशी घालणारच. पण मायेच्या सावलीला सावटाचं रूप येतां कामा नये. कोवळा अंकुर उन्हाच्या तिरपीनं करपूं नये एवढी खबरदारी घ्यायलाच पाहिजे. पण म्हणून अष्टौप्रहर त्याला सावटांत ठेवायचा का? अंकुराचं रोप व्हावं, तें फोफावून त्याचं टवटवीत आणि फुलांफळांनीं बहरलेलं झाड बनावं म्हणून त्याची हंगामशीर छाटणी केली पाहिजे. माई, रागावूं नको, पण राजाबाळचं रोप तूं सावटांत ठेवत राहिलीस; त्याला

खतपाणी घालण्यांत तूं कसूर केली नाहींस, पण रोपाच्या वाढीला आवश्यक असणारा बाहेरचा वारा आणि सूर्यप्रकाश त्याला तुझ्याकडून मिळूं शकला नाहीं. हवी असलेली गोष्ट या नाहीं त्या मार्गानं मिळ-वण्यासाठीं सृष्टि धडपड करीत असते. विकासाच्या मार्गावर असणाऱ्या राजाबाळच्या बालमनाला बरोबरीच्या मुलांत मिसळावं, त्यांच्यासारखं चढावं, त्यांच्यासारखं पडावं, त्यांच्यासारखं हंसावं, त्यांच्यासारखं रडावं, थोडक्यांत सांगायचं म्हणजे त्यांच्याशीं तद्रूप व्हावं अशी ओढ असणारच. पण पडेल झडेल या धास्तीनं तूं त्याला त्यांच्यापासून तोडलंस. खेळानं शरीर कणखर आणि मनहि लढाऊ बनतं, या फायद्याकडं तुझं लक्षच गेलं नाहीं. माई, राजाबाळला आतांपर्यंत तूं मूल म्हणून वाढवण्यापेक्षां फूल म्हणून जपून ठेवलंस. तूं त्याला घरांतल्या घरांत आणि आपल्या मायाळू नजरेच्या टप्प्यांत डांबून ठेवण्याचा आपल्याकडून प्रयत्न करीत होतीस, पण दुसरीकडून बालमनाच्या नैसर्गिक प्रवृत्ति राजाबाळला बाहेरच्या वातावरणाकडं ओढीत होत्या. मित्रासाठीं हापापत होत्या. शेवटीं त्यांचा जय झाला. छव्यासारखा मित्र त्याला चिकटला आणि बलवर्धक खेळाऐवजीं बलनाशक करमणुकींत तो गुरफटला. ताई, व्हायचं तसंच हें झालं."

"काय झालं तें दिसतंच आहे. पण आतां त्यांतून बाहेर कसं पडायचं हें सांग कीं?"

"मी व्याख्यान देत बसलें असं तुला वाटणं साहाजिक आहे माई. पण दुखण्यावर इलाज करण्यापूर्वीं तें कशामुळं झालं आणि त्याचं स्वरूप काय आहे, हें समजून घेतलं म्हणजे इलाज करणं सोपं होतं. एवढ्यासाठींच मी इतकं बोललें. माई, राजाबाळला तुझ्या मायेचं सावट बाधलं आहे. त्या सावटांतून त्याला बाहेर काढणं हा त्याला सुधारण्याचा एकच एक उपाय मला सुचतो. पहा तुला पटतो का?"

"म्हणजे! बाळला माझ्यापासून दूर सारायचं?"



" ताई, व्हायचं तसंच हें झालं ! "
मनूमावशी म्हणाली.

" होय, कायमचं नव्हे, कांहीं वेळापुरतं. त्याच्या बुद्धीवर पडलेली कीड जाईपर्यंत तरी तो तुझ्यापासून दूर राहिलाच पाहिजे. त्याच्या आणि तुझ्याहि निरंतरच्या कल्याणासाठीं तुला हें करायला हवं. तुला हें अवघड वाटेल हें मला माहीत होतं, म्हणूनच तुझी मदत मिळेल का अशी मीं भीतभीतच विचारणा केली. मी राजाबाळला माझ्याबरोबर घेऊन जावं म्हणतें. यांच्या विचारानं पुढं कशी व्यवस्था करायची तें ठरवीन. तूं विचार कर. मी दोन तीन दिवसांनीं इथून परत जाणार तोंपर्यंत तुझा निश्चय होऊं दे. "

पण माईंचा निश्चय होतां होईना. राजाबाळ दूर जायचा? आपण एकटं राहायचं, हा विचारहि माईंना भीतिप्रद वाटूं लागला. मनुताईच्या स्वाधीन त्याला केलं तर ती त्याचं कांहीं कमी पडूं द्यायची नाहीं हें खरं, पण तिच्या दहाजणांच्या संसारांत त्याच्याकडं ती झाली तरी भरपूर लक्ष कसं देऊं शकणार? त्याच्या अधूनमधून पोटांत दुखतं तेव्हां मी सुंठसाखर देतें, कधीं डोकं दुखतं तेव्हां मात्रा-मोरावळा देतें. परक्या ठिकाणीं हें कसं जमायचं? मावशी प्रेमळ असली, तरी ती परकीच. आईपुढं मुलाला मन उघडं करायला संकोच वाटत नाहीं. पण मावशीपुढं इतका मोकळेपणा कुठला? थोडीतरी भीड वाटणारच. आणि भिडेखातर त्यानं आपलं दुखणं दडवून ठेवलं, अंगावर काढलं तर? दुखणं दडवलं, अंगावर काढलं तर तें मुरतं आणि विकार बळावतो, कायमचा जडतो. राजाबाळला तसं कांहीं झालं—

कांटाच आला माईंच्या अंगावर या विचारासरशीं!

माईंच्या ठिकाणच्या मायाळू आईनं त्यांना असं भिवविलं तरी बहिणीनं सांगितलेल्या गोष्टीहि त्यांना आठवूं लागल्या, पटूंहि लागल्या. आपल्या जपणुकीनं आणि लाडानं आपला राजाबाळ दुबळा, दुर्गुणी बनूं लागला ही आपली चूक त्यांना नाकारतां येईना आणि त्याला सुधारण्याचा बहीण सांगते तो एकच मार्ग असेल, तर पत्करणं भाग

आहे, असं त्यांचं कर्तव्यदक्ष मन त्यांना बजावूं लागलं. मुलगा दुर्गुणी होत जाण्यापेक्षां दूर राहून कां होईना, सुधारला पाहिजे. मुलाच्या कल्याणासाठीं आईनं आपल्या आवडीनावडीकडं लक्ष देणं उचित नव्हे, असं त्यांचं मन त्यांना बजावूं लागलं. मनाला धुडकावणं योग्य नव्हे असं मनांत आलं कीं 'बाळ मावशीबरोबर जाऊं दे' असा माईचा निर्णयहि ठाम होऊं लागला.

एकदां असं, तर एकदां तसं अशा मनाच्या हेलकाव्यांनीं माई हैराण झाल्या. ते दोन तीन दिवस त्यांनीं जी अस्वस्थता अनुभवली तशी आतांपर्यंतच्या आयुष्यांत कधींच अनुभवली नव्हती !

"मग काय ठरलं तुझं माई ?" असं मावशींनीं विचारलं.

"ने, नेतें म्हणते आहेस तर. पण त्याच्याबरोबर मलाहि ने. मी त्याला कांहीं सांगायची नाहीं. तुझ्या आणि शामरावांच्या तालमींत तो राहूं दे. पण तो माझ्या डोळ्यापुढं असूं दे एवढीच माझी इच्छा."

"नाहीं माई, तुझी ही इच्छा मला मुळींच मान्य नाहीं. तूं आलीस तर तुझ्या सहवासांत माझा आनंद वाढेलच. पण तुझं सान्निध्य राजाबाळला बाधक आहे. म्हणून तूं इथंच राहायला हवं. तूं म्हणत असलीस, तर त्याचा क्षेमसमाचार मी तुला रोजच्या रोज पत्रानं कळवीन. पत्रभेटीवरच तूं पुत्रभेटीचं समाधान मानायला हवं."

"ठीक आहे मनू, तुझ्या मताप्रमाणंच होऊं दे. भगवानाचीच तशी इच्छा असली, तर मी कोण मोडता घालणार ? आणि माणसानं मोडता घातला तरी व्हायचं तें झाल्यावांचून थोडंच राहणार ?"

मावशीबरोबर जायचं ही गोष्ट राजाबाळला एकदम आवडली. मुलांना परगांवीं जाण्यांत आनंद वाटतो तसा तर राजाबाळला झालाच, पण त्याच्या आनंदाचं दुसरं एक कारण होतं. अलीकडं शाळेंतली त्याची अपूर्वाई कमी झाली होती. फार काय, शिक्षकांच्या उपहासाचा आणि सोबत्यांच्या तिरस्काराचा तो विषय झाला होता. कडचट

वातावरणांतून निसटायची आयती येणारी ही संधि त्याला आनंद-दायक वाटली तर नवल कसलं ?

" बाळ, उद्यां सकाळच्या गाडीनं निघायचं. आज शाळेंतनं दाखला घेऊन ये " मावशींनीं सांगितलं.

माईच्या उरांत धस्स झालं बहिणीची ही सूचना ऐकून. येणार येणार म्हणतां म्हणतां पुत्रवियोगाचा प्रसंग खराच येऊन ठेपला ! ज्याचा आपणाला राग आला होता, ज्याच्याबरोबर आपण बोलणंहि सोडलं होतं, तोच आपला राजाबाळ दूर जातो आहे ! जातो आहे तो भल्यासाठीं जातो आहे आणि कुठं रानावनांत न जातां मावशीच्या घरीं जातो आहे, या सर्व गोष्टी विसरून माई उद्गारल्या—

"थांब मनूताई, बाळ आणखी दोन महिने इथंच असूं दे. परीक्षा दोन महिन्यांवर आलीय्, ती होऊं दे. नव्या ठिकाणीं नवीं पुस्तकं. त्याचं वर्ष फुकट जाईल म्हणून म्हणते—"

मावशी आणि राजाबाळ बघतच राहिलीं माईच्या तोंडाकडं. मावशी एकट्याच गेल्या दुसरे दिवशीं ! सावटांतलं रोप सावटांतच खितपत राहिलं.

* * *

## ८

माईनीं काढलेली परीक्षेची अडचण खरी असली, तरी त्यांच्या मनांत मरणाला रात्र आडवी घालण्याचाच खरा हेतु होता. राजाबाळ आपल्या नजरेआड व्हायचा ही गोष्ट त्यांना सहन होईना. आपल्यापाशीं राहून तो बिघडतो आहे आणि तो मावशीच्या देखरेखींत राहिला तर सुधारेल एवढंच नव्हे तर त्याचा उत्कर्ष होईल हें त्यांना अमान्य नव्हतं. पण

त्याच्या सुधारणेपेक्षां, उत्कर्षापेक्षां, आईच्या आंतड्याची ओढच अधिक जोरदार ठरली. राजाबाळ जागच्या जागीं राहिला.

माईनं आयत्या वेळीं घातलेल्या या आडकाठीमुळं राजाबाळचाहि विरस झाला. नव्या दुनियेंतल्या मजेचीं जीं सुखस्वप्नं तो मनांत रंगवीत होता त्यांवर बोळा फिरला. टिंगलखोर शिक्षक, तिटकारा दर्शविणारे शाळासोबती यांना जसा तो विटला होता, तसा गोड गोड बोलून भलत्या नादाला लावणाऱ्या छब्यालाहि तो भ्याला होता. त्याच्या माईचीहि त्याला भीति वाटत होती. आपलीं पापं तिला कळलीं आहेत आणि ती आपल्यावर पहिल्यासारखी माया करणार नाहीं असें त्याला वाटत होतं आणि तो माईपुढं जातांना ओशाळत होता. मावशीबरोबर गेल्यावर या सर्व कटकटी टळतील या आनंदांत तो रंगला. पण होऊन बसलं तें असं! माईचा मनस्वी राग आला त्याला.

नेहमींचा जीवनक्रम सुरू झाला. माईचं नाटक फार काळ टिकलं नाहीं. त्या पहिल्यासारखाच प्रेमाचा वर्षाव राजाबाळवर करूं लागल्या. मात्र त्याच्या हालचालींवर त्या अधिकच दक्षतेनं नजर ठेवीत होत्या. छब्याबरोबर कुठं जायचं नाहीं, फार काय त्याच्याशीं मुळींच सलगी करायची नाहीं अशी ताकीदहि त्यांनीं राजाबाळला देऊन ठेवली होती.

राजाबाळ आपल्याकडून चांगलं वागूं लागला होता. छब्याच्या संगतीमुळं आपली तोंडफोड झाल्याची जाणीव झाल्यामुळं तो होऊनच त्याला टाळूं लागला होता. पण माई त्याबद्दल साशंकच होत्या. घाणेरडी संगत आणि संवयी सहजासहजीं सुटत नाहींत हें त्यांनीं दुसऱ्या मुलांच्या उदाहरणांवरून पाहिलं होतं आणि आपल्या राजाबाळचंहि तसंच होईल ही धास्ती माईच्या मनांत घर करून राहिली होती. राजाबाळ शाळेंत वेळच्या वेळीं येतो का, अभ्यास नीट करतो का, तो छब्याबरोबर कुठं जातो का, याची चौकशी त्याला न कळत त्याच्या

घरंमित्रांकडं त्या करूं लागल्या. राजाबाळला घरीं यायला घटकाभर जरी उशीर झाला तरी त्या त्याला शोधायला स्वतः बाहेर जाऊं लागल्या, आणि राजाबाळनं उशीराचं कारण खरंखुरं सांगितलं तरी त्यावर विश्वास न ठेवतां त्याची दुसरीकडं चौकशी करून त्याचा खरेखोटेपणा पडताळून पाहूं लागल्या. आपण मनापासून चांगुलपणानं वागत असतां माईनं आपला संशय घ्यावा ही गोष्ट राजाबाळला अपमानास्पद वाटूं लागली.

राजाबाळच्या मनाला झोंबणारी दुसरी गोष्ट म्हणजे पैशाच्या बाबतींत माईंना त्याच्याविषयीं वाटणारा अविश्वास. जुन्या वळणांत वाढलेल्या असल्यामुळं माई निरुपाय झाला तरच घराबाहेर पडत. त्यांचा बाजार-हाट दुकानदारच करी. निरोप आला कीं दुकानदारानं आपल्या गड्याच्या हातीं जिन्नस पाठवावा, असा रिवाज पडला होता. फीचे पैसे त्या आतांपर्यंत राजाबाळच्या हातीं देत होत्या. पुस्तकं, कागद, पेन्सिलीसारख्या वस्तूंसाठींहि त्याला माईकडून पैसे मिळत. पण आतां माई धुणंभांड्यांसाठीं नेमलेल्या रामाच्या हातीं फी शाळेंत पोंचवीत आणि त्याला बरोबर दिल्यावांचून त्या एकट्या राजाबाळला बाजारांत जाऊं देत नसत. रामा हा आपल्या घरचा कामकरी नसून आपल्या-वरचा पहारेकरी आहे असं राजाबाळला वाटे आणि त्याला त्याची चीड येई.

आधीं अंधळा विश्वास आणि आतां कडक सासुरवास असा माईंचा प्रकार झाला. राजाबाळची सुधारणा व्हावी ही माईंची इच्छा मात्र त्यानें सफल झाली नाहीं. कुंपणच शेत खातं म्हणतात, तसा प्रकार होऊं लागला! गडीमाणसं कामचुकार असतात तशीं डल्ला मारायलाहि टपलेलीं असतात. एखाद्याविषयीं धन्याचं मन साफ नाहीं हें त्यांनीं हेरलं कीं त्यांचं फावतं. धन्याच्या मर्जींतून उतरलेल्या माणसाविषयीं तीं त्याचं मन अधिकाधिक कलुषित तरी करीत राहतात, किंवा

गैरमर्जीतल्या माणसाला सहानुभूति दाखवून अंकित करून ठेवतात. आणि दोघें मिळून मालकाला फसवतात, लुबाडतात. माईंच्या रामा गड्यानं तसंच केलं.

"बाळासाब, माई तुमास्नी लै जपत्यात बगा. तुमास्नी काय म्हटल्या काय करूं देत नाहींत—"

आपल्या प्रश्नांवरून राजाबाळचा कल अजमावण्याचा रामानं प्रयत्न केला. राजाबाळनं कांहींच उत्तर दिलं नाहीं. त्याची चर्या खट्टू झालेली रामाच्या नजरेंतून निसटली नाहीं. तो पुन्हां म्हणाला—

"माई तुमास्नी कुठं नाटकासिनेमाला पाठवीत नाहींत, कधीं फराळपाण्याला पैसा दिलेला बी दिसत नाहीं. तुमच्याबरोबरीचीं एकेक पोरं बगतों मी, किती चैन करत्यात! तुमचं मात्तर शाळेंतनं घरांत नि घरांतनं शाळेंत चालतंय. तुमास्नी बगितलं कीं त्या घोलकराच्या किसनची आठवण येती मला. त्येची सावतर आई हायना, ती आपल्या पोरांची वाटेल ती मिजास चालवती. पर किसननं दिडकी मागितली तर मुस्काट फोडायला उठतीया! त्या बिचाऱ्याची आई सावतर तरी हाय. पर माई तुमची सख्खी माय असून—"

राजाबाळच्या डोळ्यांत पाणी डबडबलेलं पाहून आपली मात्रा लागू पडत चालल्याचं रामाला समाधान वाटलं. तिचा आणखी एक वळसा त्यानं दिला—

"तुम्ही पर्वतरावाची सर्कस बघितलीत का बाळासाब? पंधरा रोज झालं हितं सर्कस येऊन. मानसांचा नुसता तोबा उडतोय तंबूवर. गांवचं बी तसच अन् खेड्यापाड्याचं बी तसच! शंबर दोनशें गाडी सुटतीया तंबूपाशीं. अन् उगाच नाहीं माणसं गर्दी करत. कामगतच होतीया तशी! काय एकेक जनावर! त्यो समशेर शिंव्ह काय, ती तलवार शिंव्हीन काय! वा र वा जनावरं! मला समद्या जनावरांत आवडला असला तर त्यो तुफान्या वाघ! त्याचं त्ये डोळं बघितलं कीं

उरांत घडधडायला लागतंय अन् त्येची डरकाळी ऐकल्यावर तर इचारूंच नगा. पोरं मुतत्यात म्हणं बसल्या जागीं! पर शाबास हाय त्या पर्वतरावाची! असल्या जनावराला बी त्यो नाचिवतोय चाबकाच्या फटकाऱ्यावर! उगाच नाय छाताडभर पदकं मिळत! त्याचा कोट कापडाचा नसून पदकांचाच केलाया असं वाटतंया बगा. अन् यवढीच मज्जा हाय म्हनतासां व्हय? छ्या! कसरतींचीं कामं बी एकाहून एक चढ! त्यो गोरा साहेब अन् त्येची आवा त्या चिंचुळ्या बुरजांत आडवी तिडवी सायकल मारायला लागली कीं नजर ठरत नाय! ती मड्डम मंजे भूत हाय कीं काय असं वाटतं तिची करामत बघून. तीन घोडीं एकटी पळवती रिंगणांत, अन् कमाल मंजे अस्मानांतनं जाळांतनं उडी मारती खालच्या डबऱ्यांत! अन् त्या गुड्डीची मजा बी इचारूं नगा. दगडाला बी हशिवल्याविगर सोडायचा नाय त्यो गडी! एकदां तरी बगाच खेळ बाळासाब."

रामानं सर्कशीचं चित्र असं बहारदार रंगवलं कीं तें पाहून कसल्याहि अरसिकाला खेळ पाहण्याची उत्कंठा वाटली असती. राजाबाळचं मनाहि त्या विचारानं भारलं गेलं, पण त्याबरोबरच आपल्या अवघड परिस्थितीची जाणीव होऊन तो उदासहि झाला. माईपुढं हौसेमौजेची गोष्ट काढायची त्याला लाज वाटत होती आणि ती होऊन आपणाला सर्कस पाहायला पाठवील हें शक्यच नव्हतं.

"आम्हांला कुठली सर्कस नि बिर्कस! आणि करायची आहे काय सर्कस बघून? तिनं काय पोट भरतंय?"

कांहींतरी बोलायचं म्हणून राजाबाळ बोलला. पण त्यानं विरक्तपणाचा आव आणला असला तरी त्याच्या मनांत सर्कशीची उत्कंठा उसळी घेत आहे हें चाणाक्ष रामानं हेरलं. तो म्हणाला—

"समद्या गोष्टी पोट भरायसाठीं करायच्या नसतात. तुमी नवीं नवीं धडुतं घालतां त्यानं काय पोट भरतं? गाणं म्हनतां, खेळ खेळतां, त्यें

तरी काय पोटासाठीं? पोटावाणी मन रिझवायला बी लागतंच कीं. तुम्हीं सर्कशींचा खेळ बगितला तर तुमचं मन छान रमेल. इचाराच तुमी माईस्नी."

"माईना विचारूं? कशाला विचारायचं नि 'नाहीं' म्हणून घ्यायचं? माईचं माहीतच आहे कीं तुला. घोलकराच्या किसनचं तूंच सांगितलंस ना मघाशीं?"

"त्येंबी खरंच म्हना." रामा राजाबाळपेक्षांहि निराश स्वरांत म्हणाला, "पर त्यें काय नाय बाळासाब. मी दावतों तुमास्नी खेळ. तुमच्या अन्नावर जगतुंया मी. तुमच्या सुखासाठीं मला कायतरी कराया व्हॊवंच. उद्यां आइतवार हाय. तुमास्नी सुट्टीच हाय. शाळेच्या, कचेरीच्या मानसांसाठीं आइतवारीं जादा खेळ ठेवत्यात. त्येला जायाचं तुमी आमी. ठरलं."

आणि राजाबाळ नको नको म्हणत असतांहि रामानं त्याला सर्कशीला नेलं. आठ आठ आण्यांचीं गॅलरीचीं तिकिटं काढलीं रामानं. एवढंच नव्हे, तर मध्यंतराच्या वेळीं बाहेर जाऊन त्यानं चार आण्यांचा शेव-चिवडा नि एक आण्याच्या दोन मसालेदार पानपट्टयाहि आणल्या. कितीतरी दिवसांत करायला न मिळालेली चैन रामामुळं आज राजाबाळला करायला मिळाली. माईपेक्षां आपला रामाच प्रेमळ आहे असं त्याला वाटल्यावांचून राहिलं नाहीं.

पण माईचंहि आपल्यावरलं प्रेम कमी झालं नाहीं, उलट तें वाढायलाच लागलंय असा राजाबाळला भास होऊं लागला. कारण माई एकदां त्याला म्हणाल्या—

"इथं कुणाचीशी सर्कस आलीय म्हणे. फार चांगली आहे असं म्हणतात माणसं. मी उद्यां पैसे देईन. आपली हेमा आणि तिचा दादा जाणार आहेत. त्यांच्यावरोबर तूंहि जा बघायला."

माई हें मनापासून बोलते आहे कीं तिच्या पोटांत दुसरा कसला हेतु आहे हें राजाबाळला उमगेना. तो विस्मयानं तिच्या तोंडाकडं

पाहात राहिला. पण माईच्या मनांत कपट असल्याचं कांहींच चिन्ह त्याला दिसलं नाहीं! उलट दुसरे दिवशीं माई फिरून त्याला म्हणाल्या—

"आज शाळेंतून घंटा होतांच परत ये. दिवे लावणीपावतर उद्यांचा अभ्यास ठेव करून. रात्रीं सर्कशीला जायचंय तुला."

"मी जात नाहीं माई सर्कशीला. उद्यां आमची तयारीची परीक्षा घेतों म्हणालेत सर. मला उजळणी करून ठेवायचीय."

राजाबाळानं दिलेली ही थाप ऐकून माईंना विस्मय वाटला आणि आनंदाहि वाटला. मुलगा अलीकडं व्यवस्थित वागायला लागलेला दिसतो, त्याची ही सुधारणा वरवरची नसून मनापासून आहे आणि जर ती तशी होत असेल तर दोन महिन्यांनीं तरी त्याला मनूताईकडे कशाला पाठवायचं? माई अशा समाधानाच्या विचारांत रंगल्या.

राजाबाळची आणि रामाची गट्टी हळूहळू वाढत चालली. सिनेमा-हॉटेलची छब्यानं त्याला लावलेली चटक रामानं ताजी केली. राजाबाळला त्यामुळं घरीं यायला उशीर होई आणि फराळ झाला असल्यामुळं जेवणाहि जात नसे. आपलं गुपित माईला कळेल कीं काय या धास्तीनं तो बावरल्यासारखा होई. त्याची चलबिचल पाहून माईंनीं एकदां म्हटलं—

"छब्यानं गाठलं वाटतं पुन्हा! आज नाटक झालं कीं सिनेमा?"

"मी छब्याबरोबर बोलतसुद्धां नाहीं आतांशा. शप्पत घेऊन सांगितलं तरी खरं वाटत नाहीं तुला!" राजाबाळनं उत्तर दिलं आणि रडायला सुरुवात केली.

आपण दाखविलेला अविश्वास राजाबाळच्या मनाला झोंबलेला पाहून माईंना कळवळा आला. आपण कुठल्याकुठं बोललों असं त्यांना झालं. त्या जवळ जाऊन त्याच्या पाठीवरून हात फिरवीत आणि त्याचे डोळे टिपीत म्हणाल्या—

" अरे, उगीच म्हटलं मीं. साडेसात वाजून गेले तरी घरीं आला नाहींस—"

" चौकांत पोवाडे चालले होते, तिथं होतों मी. विचार वाटलं तर रामाला. तो होता तिथं, त्यानं मला घरापर्यंत पोंचवलं. "

थापा पचतात असा विश्वास आल्यावर नित्य नव्या थापांनीं माईला चकवायचा राजाबाळ प्रयोग करूं लागला.

आपला छोटा मालक आपल्या पूर्ण कावूंत आला अशी खात्री झाल्यावर रामानं आपलं खरं स्वरूप बाहेर काढलं.

" बाळासाब, एक काम करा कीं गरीबाचं. आईच्या जिवाला बरं नाहीं. डागदारानं एक औशिद आनायला सांगितलंया, पर त्या बाटलीला पांच रुपये पडत्यात. माझ्यापाशीं दोन रुपये हैती, पन आनखी तीन रुपये द्या. पहिल्या तारखेला परत देईन. "

" माझ्याजवळ कुठले आलेत पैसे ? माईला विचार. ती देईल. "

" माईसाब नाहीं द्यायच्या अगाऊ. "

" तूं माग तरी. कारण सांगितल्यावर ती नाहीं म्हणायची नाहीं. आणि नाहीं म्हणाली, तर मी सांगीन द्यायला. "

रामाची पैशाची मागणी माईनीं खरोखरच झिडकारली. अगाऊ पैसे नेऊन चैन करायची आणि मागाहून त्याच्या आईनं ओरडत यायचं हा अनुभव माईनीं एकदोनदां घेतला असल्यामुळंच त्यांनीं नकार दिला होता. राजाबाळची मध्यस्थीहि निकामी ठरली होती.

" बगा बाळासाब, तुमच्या माईसाबांचा चिकटपणा. आपल्या पोटच्या पोरावर ज्या बाईचा इस्वास नाय, ती बाई गडीमाणसाचं थोडंच ऐकणार ? त्यें काय नव्हं वघा. तुम्हा शीरमंताकडनं गरीबांची नड कधींच भागायची नाहीं. "

रामा म्हणेल तें मुकाट्यानं ऐकून घेणं राजाबाळला भाग होतं. आपली माई दुसऱ्याचं कांहीं ऐकत नाहीं, आपल्या मनांत नसेल तर

दुसऱ्याला झिडकारून मोकळी होते. तिचा हा स्वभाव चांगला नाहीं, असं राजाबाळलाहि वाटायला लागलं. आईवर टीका केली तर राजाबाळ रागवण्याऐवजीं मुकाट्यानं ऐकून घेतो हें पाहून रामा माईविषयीं राजाबाळच्या मनांत अधिकाधिक विष पेरायला लागला. आपण बोलतों, तें छोट्या मालकाच्या सुखाच्या तळमळीनं बोलतों, त्यांत आपला कांहीं स्वार्थ नाहीं, अशी वतावणी तो चाणाक्षपणें करी.

" माई, मला दोन रुपये हवेत. " राजाबाळनं मागणी केली.

" कशाला ? " माईनीं विचारलं.

" मी रामाबरोबर उद्यां श्रीपुरला जातों. "

" रामाबरोबर ! आणि श्रीपुरला ! तें कशाला ? आणि अभ्यास बुडवून ? "

" उद्यां रविवार आहे. परवां सोमवारींहि वैशाखी पूर्णिमेची सुट्टीच आहे. नरसिंहजयन्तीचा मोठा उत्सव तिथं असतो म्हणे. खूप खूप मौज असते म्हणे तिथं त्या वेळीं. रामा म्हणत होता, इथून हजारों माणसं जातात, आमच्या शाळेंतलीं पुष्कळ मुलंहि जातात. म्हणून मीहि जातों माई. "

माईनीं राजाबाळच्या या मागणीला नकार दिला. दोन रुपयांसाठीं त्यांचा नकार नव्हता, पण जत्रेच्या धक्काबुक्कींत त्यानं जाणं माईना भीतिप्रद वाटलं. तिथं त्याला जेवण चांगलं मिळणार नाहीं, कांहींतरी कोरडं, जाडंभरडं खाईल, तें त्याला बाधेल, तिथल्या नदींत तो स्नानाला जाईल त्या नदींत नेहमीं अपघात होतात, अशा अनेक शंकाकुशंका त्यांच्या मनांत आल्या. पण माईना सर्वांत नकोशी वाटणारी गोष्ट म्हणजे राजाबाळनं रामासारख्या हलक्या माणसाबरोबर जाणं ही.

माईनीं आपली मागणी नाकारली ही गोष्ट राजाबाळला रुचली नाहीं. हें असं होणार हें भाकित रामानं आधींच वर्तवलं होतं, आणि

तें खरं ठरल्यावर राजाबाळनं काय करायचं तेंहि त्याला पढवून ठेवलं होतं.

" माई, कांहीं झालं तरी मी उद्यां श्रीपुरला जाणार. तूं मला पैसे दिले पाहिजेस."

राजाबाळचा सूर आणि बोलण्याची ही तऱ्हा अगदीं नवी होती. माई चपापल्या. त्या त्याच्याकडं नुसत्या बघत राहिल्या.

" मी साफ ऐकणार नाहीं तुझं. जेव्हां तेव्हां तूं मोडता घालतेस मला. एक गोष्ट माझ्या मनासारखी व्हायची नाहीं तुझ्या हातून. पण यापुढं तुझं कांहीं चालूं द्यायचा नाहीं मी. मी वाटेल तेव्हां वाटेल तिथं जाणार. श्रीपुरला नरसिंहजयन्तीला जायचं म्हणजे कांहीं पाप नव्हे. परीक्षाहि झाली आहे. अभ्यासाची अडचण नाहीं. मला कोणी नांव ठेवणार नाहीं त्याबद्दल."

राजाबाळ आणखीहि असंच कांहींतरी तावातावानं बडबडला! आणि शेवटीं तर 'आजपर्यंत तुझा छळ खूप सोसला, पण यापुढं मी तुझं कांहींहि चालूं देणार नाहीं.' अशी तंबी देऊन तो दाणदाण पाय आपटीत त्यांच्यापुढून चालता झाला!

रामानं भरलेला बार चांगलाच उडला! माईंच्या डोळ्यांपुढं अंधारी आल्यासारखं झालं. गोगलगाईचा साप होऊन त्यानं फणा काढून फुसकारावं तसा प्रकार पाहून माई दचकल्या. 'तूं माझा छळ केलास' हा मुलानं केलेला प्रहार तर त्यांच्या वर्मी बसला, त्यानं तर त्या विव्हल झाल्या. ज्याच्या सुखासाठीं आपण जिवाभावानं झटलों त्या मुलाच्या तोंडून असे विपरीत शब्द निघावे त्यापेक्षां मरण आलं असतं तर बरं झालं असतं असं माईंना वाटलं.

माई कितीतरी वेळ नुसत्या बसून राहिल्या. काय बोलावं, काय करावं हेंच त्यांना सुचत नव्हतं.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



“—पण यापुढं मी तुझं कांहींहि चालूं देणार नाहीं.”

पण नुसतं बसून राहून तरी कसं भागणार? वेळ होतांच त्यांनीं चूल पेटवली, स्वयंपाक केला, राजाबाळला जेवायला वाढलं. सगळा कारभार मुक्यानं चालला होता.

माईंना आज झोंप कुठली? विचारानं त्यांचं डोकं फुटायची वेळ आली. अखेर त्यांनीं ठरवलं, मुलावर चिडून रागावून कसं भागणार? आपण आपल्याकडून होईल तेवढं जपायचं. होणं जाणं हरीच्या हातीं आणि दैवाच्या मनांत असेल तसं.

सकाळीं त्यांनीं राजाबाळला म्हटलं—

" डोक्यांतलं वेड काढून टाक. तुझ्यासारख्या मुलानं असं वागणं बरं नव्हे. "

" बरं बरं. ठाऊक आहे मला. " असं तिरसट उत्तर देऊन राजाबाळ घराबाहेर पडला.

तो जेवायलाहि घरीं आला नाहीं! माईंना चौकशीअंतीं कळलं, तो रामाबरोबर श्रीपुरला गेला!

माईंना ब्रह्मांड आठवलं!

* * *

# ९

माई आचारी विचारी होऊन घरांत वावरत होत्या. त्यांच्या विव्हल अंतःकरणाला नवनवे डंख मारले जात होते. राजाबाळ गेला तो मोकळ्या हातानं गेला नसून पेटींतून त्यानं किमानपक्षीं दहाबारा रुपये तरी लांबवले आहेत ही गोष्ट माईंना समजून आली होती. माई पैशाची जपणूक करीत, ती त्यांना पैशाचा हव्यास होता म्हणून नव्हे, तर राजाबाळच्या पालनपोषणाला, शिक्षणाला पैशाची ददात पडूं नये, एवढ्यासाठींच त्या पै-पैशाचा खर्चहि अनाठायीं न होईल

अशी दक्षता घेत आल्या होत्या. ज्याच्यासाठीं आपली ही जपणूक त्या आपल्या मुलानंच असं घर पोखरावं हें अवलक्षण त्या माउलीला भयानक वाटलं.

त्यांतच राजाबाळचं परीक्षेचं निकालपत्रक त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलं. परीक्षा होऊन उन्हाळ्याची सुटी लागण्यापूर्वींच तें राजाबाळला देण्यांत आलं होतं, पण त्यानं तें माईंना दाखवलं नव्हतं. त्यांनीं त्याबद्दल एकदां विचारलंहि होतं, पण सुटी संपल्यावर 'रिझर्ट' लागायचाय, अशी थाप त्यानं ठेवून दिली होती. पण राजाबाळच्या खोलींत कांहींतरी शोधायला गेल्या असतां छपवून ठेवलेलं तें फजीतिपत्रक माईंच्या हातीं आलं. राजाबाळ तीन विषयांत नापास झाला होता. त्याला वरच्या वर्गांतहि चढवलं नव्हतं. त्यानं अभ्यासांत उत्कृष्ट प्रगति दाखविली असती, तर माईंना दुःखांतहि आनंद वाटला असता. पण या दुर्वर्तनाच्या जोडीला मुलाचा मठ्ठपणा पाहण्याचा प्रसंग बिचारीवर ओढवला होता.

'मनूताईबरोबर बाळाला पाठवलं असतं, तर असं कशाला झालं असतं? आतां मन घट्ट करायचं. आपण होऊन त्याला मावशीकडं पोचवायचं. झाला इतका नरमपणा पुष्कळ झाला. यापुढं पोराची आणि मनाचीहि बिलकूल भीड धरायची नाहीं. सरळ वागला तर ठीक आहे, नाहींपेक्षां त्याला घरांतून हाकलून लावायलाहि मागंपुढं पाहायचं नाहीं.'

माईंच्या मनाचा हा खंबीरपणा प्रत्यक्ष वेळ आली तेव्हां टिकला मात्र नाहीं. कारण जत्रेंतील मजा करून राजाबाळ घरीं आला तो नुसत्या शर्ट-चड्डींत! त्याचा कोट ठिकाणावर नव्हता, टोपी डोक्यावर नव्हती! त्याचे डोळे लाल झाले होते व ते रडून रडूनच तसे झाले असले पाहिजेत, हें माईंना सांगायला नको होतं.

मुलाचा तो अवतार दृष्टीस पडतांच माईंचं मन कासावीस झालं. त्याच्याविषयींची चीड, संताप आणि त्याला शासन करण्याचा निग्रह

त्या मनांत नांवालासुद्धां उरला नाहीं. त्यांनीं चोरपावलानं खालीं मान घालून येणाऱ्या राजाबाळकडं क्षण दोन क्षण पाहिलं. त्यांच्या अंतर्यामींचा कळवळा उफाळून वर आला. त्यांनीं घाबऱ्या घाबऱ्या धांवत जाऊन बाळाला कवटाळलं आणि त्याचं तोंड वर करून म्हटलं—

"असा कसा आलास ! तुझी ही अशी दशा कशानं झाली !"

राजाबाळनं तोंड उघडलं नाहीं. आईच्या मिठींतून सुटण्याची धडपड तो करीत होता.

"काय झालं सांग ना राजा—!"

"राजा मेला—खड्ड्यांत गेला. आणखी छळूं नको तूं त्याला." असं तिरसट उत्तर देऊन राजाबाळनं माईंचे हात झिंझाडले आणि आपल्या खोलींत जाऊन कॉटवर धाडकन् अंग टाकलं.

या प्रकारामुळं माईंचं मन पुरतं भेदरून गेलं. मुलाच्या बाबतींत आई किती दुबळी, किती लाचार होते ! दुराचारी, मूर्ख आणि स्वतःचा अवमान करणाऱ्या मुलाकडंहि ती ममतेनंच कशी पाहाते ! माई कॉटवर जाऊन बसल्या आणि बाळच्या अंगावर प्रेमानं हात फिरवीत, आपलं रडं आवरीत म्हणाल्या—

"असं रे काय करतोस ? बोल ना ? तूं सांगितलं नाहींस तर काय बरं समजावं माणसानं ?"

माईंच्या प्रेमळ स्पर्शानं राजाबाळची सगळी मगरुरी विरघळली. माईंचा ममतेचा हात पाठीवरून फिरला, तिच्या हातचा गोड घास तोंडांत पडला, कीं त्यांचं मन आनंदानं फुलून जात होतं, तसं आतांहि फुललं. आपल्या प्रेमळ माईशीं आपण तुसडेपणानं वागलों या कल्पनेनं तो मनांतून ओशाळला. माईंच्या मनाविरुद्ध आपण श्रीपुरला गेलों आणि म्हणूनच आपणाला एवढा त्रास सोसावा लागला, असंहि त्याला वाटलं आणि त्याला जोराचा हुंदका आला.

"उगा म्हणतें ना ? काय झालं सांग तरी ?" माईंनीं राजाबाळचे डोळे पुशीत विचारलं.

राजाबाळचा हुंदका अधिकच जोरकस झाला. तो थांबून त्याच्या तोंडून शब्द उमटायला कितीतरी वेळ लागला. आणि मग माईंना हळूहळू कळलं कीं, राजाबाळ पेटींतले पंधरा रुपये घेऊन रामा-बरोबर श्रीपुरला गेला. तिथं त्यानं जत्रेंतल्या पुष्कळ गमती पाहिल्या, हॉटेलांतल्या शेवचिवड्यावर खूप ताव मारला, ‘ जरासा जाऊन येतों ’ असं म्हणून रामा गेला तो दोन तास परत आलाच नाहीं आणि सिनेमाच्या तंबूंत भेटला, तेव्हां त्याच्या तोंडाला घाण सुटली होती. त्याला सरळ बोलायला येत नव्हतं. तंबूंतून बाहेर पडून हॉटेलांत चहा प्यायला म्हणून तो गेला आणि तिथं त्याला कळलं कीं आपला खिसा फाटला असून पैशांचं पाकीट नाहींसं झालं आहे. हॉटेलवाल्यानं पैशासाठीं कोट-टोपी तर काढून घेतलीच, पण लबाडीबद्दल दोन धपाटेहि त्यानं दिले. आपली ही फजिती कांहीं गांवकऱ्यांनीं पाहिली आणि त्यांना तोंड दाखवायची लाज वाटल्यामुळं जत्रेंत अधिक न रेंगाळतां तो घरीं पळून आला. बिनतिकिटानं प्रवास कसा केला आणि स्टेशनवर उलट बाजूला उतरून तिकिटमास्तरला कसा गुंगारा दिला ही आपली बहादुरीहि राजाबाळनं माईंना सांगितली.

राजाबाळची ही कर्मकथा ऐकून माईंना मनस्वी खेद वाटला. पोराला त्रास झाला याबद्दल त्यांचं मन कळवळण्याऐवजीं कोणत्याहि शहाण्या समजूतदार मुलानं लाजून मान खालीं घालावी, असं घाणेरडं वर्तन आपल्या मुलाच्या हातून घडलं, याचं त्यांना वाईट वाटलं. राजाबाळला रडायला येतंय तें दुष्कृत्याच्या शरमेमुळं नसून शारीरिक त्रासामुळं येतंय, हें त्यांना समजून चुकल्यामुळं तर माईंच्या मनाची तगमग असह्य होऊं लागली. राजाबाळचे पैसे चोरीला गेले नसते, त्याला हॉटेलवाल्याचा मार खावा लागला नसता, त्याची कोट-टोपी हिसकावून घेण्यांत आली नसती, चोरून प्रवास करायची पाळी त्याच्यावर ओढवली नसती, तर तो विजयी वीरासारखा घरांत आला असता



हॉटेलवाल्यानं कोट-टोपी तर काढून घेतलीच पण लबाडीबद्दल
दोन धपाटेहि दिले.

आणि पैसे चोरल्याबद्दल आपण त्याला विचारलं असतं, तर ' तूं कोण विचारणार ' असं उर्मट उत्तरच त्यानं दिलं असतं. अशीं चित्रं माईंच्या मनांत उमटूं लागलीं. त्यांनीं तर माईंच्या अंगांतली सगळी शक्ति संपुष्टांत आली.

डोळ्यांवर हात घेऊन राजाबाळ पडला होता. त्याच्या शेजारीं माई हवालदील चर्या करून बसल्या होत्या.

घटकाभर झाला तरी कुणी कुणाशीं बोललं नाहीं. आपला मूर्खपणा कसा पचवावा आणि माईंवर आपली छाप पुढंहि कशी ठेवावी याचा विचार राजाबाळच्या डोकींत घोळत होता आणि मनूताईच्या सल्ल्या-प्रमाणं आपण चाललों असतों तर ही अशी दशा कशाला झाली असती, अशी हळहळ माईंच्या मनांत धुमाकूळ माजवीत होती.

तीं मायलेकरं तशा स्थितींत आणखी किती वेळ राहिलीं असतीं कुणास ठाऊक? स्वयंपाकघरांतल्या फळीवरून भांडीं ढासळल्याचा आवाज झाल्यामुळं माईंना उठून जावंच लागलं. राजाबाळलाहि ती अवस्था असह्य झालीच होती. तोहि माईंपाठोपाठ गेला.

उंदीर-मांजराच्या धरपकडींत भांडीं गडगडलीं होतीं.

" उंदीर फार झालेत नाहीं ग माई?" राजाबाळनं बोलण्याला सुरुवात केली. माईंनीं नुसतं ' हं ' म्हटलं.

" उद्यां कमिटींत जाऊन पिंजरा घेऊन येतों." माईंनीं कांहींच उत्तर दिलं नाहीं.

" माई, दुपारचं कांहीं आहे का? भूक लागलीय—"

राजाबाळ निघून गेल्यापासूनचे दोन दिवस माईंनीं चुलीकडं पाहिलं नव्हतं. अगदींच कलकलल्यासारखं झालं तर कधीं चहा तर कधीं पाणी पिऊन त्या आलेली घटका मागं सारीत होत्या.
माईंनीं शंकरपाळीं आणि दूध राजाबाळपुढं ठेवलं.

" माई, दुपारचं कांहींच उरलं नाहीं? दुपारीं काय केलं होतंस जेवायला?"

" बासुंदीपुरीचा बेत केला होता आणि पोट फुटेपर्यंत गिळून घेतलंय बरं मीं." माई बोलल्या. मुलाविषयीं त्यांचं मन प्रथम कळवळलं असलं तरी फसगत, चीड, संताप अशा विकारांनीं आतां उचल खाल्ली होती. त्यांच्या स्वरांत राजाबाळला आतांपर्यंत कधींहि दिसली नव्हती अशी कठोरता या वेळीं स्पष्ट उमटली होती. राजाबाळ चपापला ! त्यानं उचललेलं शंकरपाळं तोंडापर्यंत न पोंचतां वाटेंतच थबकलं. तो भयचकित नजरेनं माईकडं पाहूं लागला.

माईचे ओठ थरथरत होते, आवाजहि कांपरा झाला होता. त्या म्हणाल्या—

" गुणाचा मुलगा माझ्या पोटाला आला. त्यानं एकाहून एक दिवे पाजळले. ते बघून आईच्या अंतःकरणाला हर्ष झाल्याशिवाय कसा राहील ? तुझ्या पराक्रमाचं केवढं कौतुक वाटलं म्हणतोस मला ! माझं मन आनंदानं फुलून गेलं नुसतं ! आणि त्या आनंदाच्या भरांत गेले दोन दिवस मी पंचपक्वान्नं करून खात राहिलें बघ. तुझी आई झाल्याचं सार्थक झालं आतां—"

माईंना अधिक बोलवेना. त्यांनीं डोळ्याला पदर लावला आणि भिंतीला मान टेकून मुसमुसून रडायला सुरुवात केली.

राजाबाळनं दोन दिवसांपूर्वीं माईंना वाटेल तीं उत्तरं दिलीं होतीं. पण त्याचा तो उर्मटपणा खरा नव्हता. रामानं तें विष त्याच्या डोक्यांत भरवलं होतं. आतां त्याचा अंमल उतरला होता आणि त्याचा स्वाभाविक मवाळपणा शिल्लक होता. आईच्या या मर्मभेदक शब्दांनीं तो अधिकच नरमला. तो खालीं मान घालून म्हणाला—" माई, मी चुकलों. फिरून कधीं तुझ्या मनाविरुद्ध वागायचा नाहीं. माई, खरंच मी फिरून कधीं असं करायचा नाहीं. तुझ्या गळ्याची शप्पत. माई, रडूं नको ना ग ?"

राजाबाळचा तो कळवळा, तो पश्चात्ताप पाहून माईंना दुःखांतहि आनंद वाटल्यावांचून राहिला नाहीं. पण त्या आनंदाला त्या मुलल्या

मात्र नाहींत. त्याला झालेली ही उपरति तात्पुरती असेल, संधि सांपडली कीं, तो मूळपदावर जाईल हा संशय त्यांना वाटला. त्या कांहींच बोलल्या नाहींत.

ती रात्र दोघांनींहि अस्वस्थतेंतच काढली. आणखी कांहीं दिवस गेले. राजाबाळाबद्दल एखादी कागाळी ऐकूं येई, पण ती गंभीर स्वरूपाची नसे.

सहामाहीप्रमाणेंच निकाल लागला. उन्हाळ्याची सुटी लागली, संपत आली. शाळेचीं बोलणीं निघूं लागलीं आणि त्याच संधीस मनूमावशीचं पत्र आलं.

वार्षिक परीक्षा झाली. 'लवकरच शाळा सुरू होतील. दाखला घेऊन राजाबाळला पांच तारखेच्या आंत पाठवून दे. सातवींत जागा शिल्लक नाहीं, तरीपण मुख्याध्यापकांनीं स्नेहाखातर राजाबाळला प्रवेश द्यायचं कबूल केलं आहे.'

माईंना बरं वाटलं वहिणीच्या पत्रानं. मुलाला दृष्टीआड करायला भीत असलेल्या माई आज 'तो दूर गेलेलाच बरा' असं वाटण्याइतक्या घट्ट झाल्या होत्या. दूर जाऊन तरी तो सुधारावा आणि मनूताईच्या ममतेच्या, शिस्तीच्या छायेंत तो सुधारेलहि, ही आशा त्यांना वाटूं लागली होती.

पण राजाबाळची मावशीकडं जायची उत्सुकता आतां कुठं उरली होती? आपण नापास झालों आहों. मावशीनं वशिल्याच्या जोरावर सातवींत जागा राखून ठेवली असली, तरी आपणास पुढल्या वर्षीं फिरून सहावींतच बसावं लागणार, आपण नापास झाल्याबद्दल मावशीपुढं आपणास मान खालीं घालावी लागणार. आपलीं मावसभावंडं आपल्या हुषारीचा दिमाख दाखवणार आणि शिवाय माईपुढं जशी आपली मिजास चालते तशी मावशीकडं चालणार नाहीं, उलट तिच्या व आप्पासाहेबांच्या शिस्तींत आपणाला राहावं लागणार असा अनेक

प्रकारचा धाक त्याला वाटूं लागला होता आणि या धाकामुळं मावशीकडं जाऊंच नये असं त्याचं मन त्याला सांगूं लागलं होतं.

पण 'मी जात नाहीं' म्हणायला त्याला तोंड तरी कुठं होतं! त्याला जो बाऊ वाटला होता, तो बोलून दाखवण्यासारखा नव्हता. मग आतां हा पेंच कसा सोडवायचा?

इकडं माईंनीं राजाबाळची पाठवणीची तयारी जोरांत चालवली होती. वर्षभर पुरतील इतके कपडे त्यांनीं शिवून घेतले. त्याच्याबरोबर कोणकोणता खाऊ द्यायचा त्याची सिद्धता करून ठेवली. राजाबाळ आपल्याला दुरावणार या विचारानं त्यांचं मन एकीकडून उदास होत असलं, तरी दुसरीकडून तें मन भविष्यकालांतील भव्य चित्र पाहण्यांत दंगहि होत होतं. मनूताई आणि आप्पासाहेब यांच्या देखरेखीखालीं आपला राजाबाळ सुधारला आहे, तो परीक्षांमागून परीक्षा देतो आहे, आपल्या शेजारचा श्रीकांत बी. ए. पास झाल्याची तार घेऊन ज्या विजयी मुद्रेनं आपल्या आईपुढं आला, त्याच विजयी मुद्रेनं आपला राजाबाळहि आपल्यापुढं आलेला माईंना दिसूं लागला होता! फार काय, त्यापुढल्या परीक्षा दिल्यावर त्याचं लग्न होतं आहे आणि आपल्या सुनेच्या तोंडांत साखर घालतांना आपलं अंतःकरण आनंदानं भरून आलं आहे, या सुखस्वप्नांतहि माई रंगत होत्या.

सोमवारीं राजाबाळ निघायचा. मधें फक्त दोनच दिवस उरले. शनिवार आणि रविवार. आज मनूताईला पत्र लिहून टाकायचं. माईंनीं तें लिहिलं. तें कोपऱ्यावरल्या टपालपेटींत टाकायला माई निघाल्या. दारांतच साळूआक्का हजर!

साळूआक्कासारखी गांवभवानी पुढं यावी हा माईंना शुभ शकुन वाटला नाहीं. साळसूदपणाचा आव आणून दुसऱ्याचीं काळींबेरीं उजेडांत आणायचा साळूआक्काचा छंद माईंना माहीत होता. ती कुणाचं कसलं तरी भारूड सांगत बसली कीं माईंचं डोकं उठे. पण

कुणाला तोडून बोलायचा खंबीरपणा त्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळं साळूपुराण त्यांना ऐकून घ्यावं लागे.

"फार गडबड दिसतेय माई !"

"आहे थोडीशी. निकडीचं पत्र टाकायचं आहे."

"मग पुन्हां कधींतरी येईन मी. पण खरं का माई, तुमच्या राजाबाळचं ऐकलं तें? तुमच्या वळणांत वाढलेला मुलगा इतका कसा बाई अगोचर? त्यानं म्हणे श्रीपुराला चांगलंच हें केलं!"

माई जिथल्यातिथं थवकल्या! आपल्या दुःखावर दुसऱ्यानं, सहानुभूतीचा फुंकर घालावा असं माणसाला वाटत असलं तरी एखादं शल्य असं असतं कीं त्याची बोंच आपली आपण सहन करावी, दुसऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस तें येऊंच नये असं त्याला वाटतं. आणि छिद्रान्वेषी माणसांनीं तें शल्य उघडं केलं तर त्याच्या वेदना अधिक दुःसह होतात. राजाबाळचीं अवलक्षणं आपल्याला दिसलीं तरी तीं आपल्यापुरतींच छपून राहावीं, त्यांचा बोभाटा होऊं नये असं माईंना वाटत होतं. पण साळुआक्कानं नेमका वर्मावर घाव घातला! त्या घावासरशी माईंचा सगळा खंबीरपणा फुटून तुटून गेला.

माई घरांत परतल्या. साळूआक्काला तेंच हवं होतं. तिनं माईंपुढं बैठक ठोकून त्यांना कळला होता तोच वृत्तान्त तिखटमीठ लावून ऐकविला. माई सुन्न होऊन बसल्या होत्या. साळूआक्कानं विचारलं—

"पोर वाईट संगतीनं बिघडतंय, तेव्हां वेळींच खबरदारी घ्यायला हवी. पुढं काय करायचं योजलं आहेत?"

माईंनीं मुलाला बहिणीकडं पाठवायचा आपला विचार सांगितल्यावर दचकल्यासारखं करून साळूआक्का म्हणाली—

"हा खुळेपणा नका करूं माई. तुमची सख्खी बहीण असली, तरी परक्याच्या घरचीच. शिवाय तिच्या घरच्या बाकीच्या माणसांना राजाबाळबद्दल थोडंच अगत्य वाटायला बसलंय? राजाबाळनं तिथं

इथल्यासारखंच कांहीं केलं, मुद्दाम नाहीं केलं तरी चुकून कांहीं तरी होतंच माणसाच्या हातनं; मोठींमोठीं माणसं घाणेरड्या गोष्टी करतात, मग राजाबाळ तर मूल, जडलेल्या संवयी एकदम कुठल्या सुटायला? आणि त्याचं हें मावशीच्या घरांत सहजावारी कोण हो खपवून घेणार? टारं होईल त्याचं तिथं. आणि त्याला वैतागून पोर काय करील नि काय नाहीं! अलीकडचीं पोरं अघोचर झालींत बरं का! तो दाजींचा वाशा खासा चांगल्या बोर्डिंगांत ठेवला होता बापानं. पण तिथनं पळून गेला."

साळूआक्काचा हेतु सिद्धीस गेला. बहिणीकडं मुलाला पाठवण्याचा प्रयोग सिद्धीस जाण्याऐवजीं अंगाशीं येईल कीं काय या शंकेनं माईंच्या मनांत ठाणं दिलं.

राजाबाळ माईंच्या बेताला मोडता कसा घालावा या विवंचनेत होता. त्यानं ओळखलं कीं उद्धट उत्तरं देऊन या वेळीं माई दाद द्यायची नाहीं. तीहि हट्टाला पेटेल व आपली हाकालपट्टी करील नरमाईनंच माईला चकविण्याचा त्यानं डाव टाकला. संध्याकाळीं जेवायला बसल्यावर तो एकदम हुंदके द्यायला लागला!

"काय झालं रे!" माईनीं भयचकित होऊन विचारलं."

"मला तुझ्या हातचं जेवण आतां कुठलं—" राजाबाळचं रडूं अनावर झालं. माईहि गहिंवरल्या. त्या आंवढे गिळीत म्हणाल्या— "असं काय करावं बरं सासरीं जाणाऱ्या मुलीगत! मावशी म्हणजे आईहून माया करणारी. म्हणूनच 'माय मरो पण मावशी उरो' अशी म्हण पडली."

"नको माई, मी इथंच राहातों तुझ्याजवळ. अगदीं तूं सांगशील तसं वागतों. खूप अभ्यास करतों. बघ तरी"

राजाबाळचं नाटक यशस्वी झालं. माईनीं लिहिलेलं पत्र फाडलं. दुसरं कार्ड घेऊन त्यांनीं लिहिलं—

" राजाबाळनं इथली शाळा सोडूं नये असा त्याच्या मास्तरांचा आग्रह आहे. त्यांना नकार देववत नाहीं. राजाबाळ मात्र तुमच्याकडं, येत नाहीं. "

अनुक्रम
विभाग
क्रमांक

* * *

## १०

सावटांतलं रोप सावटांतच खितपत राहिलं. त्याच्यावर पडलेली कीड त्याला अधिकाधिक कुरतडूं लागली.

आपल्याजवळ ठेवून घेतलं आहे, तर त्याच्या शिक्षणाची हेळसांड होऊं द्यायची नाहीं आणि त्याला खराब माणसांचा संपर्क न बाधेल याबद्दल घेतां येईल तितकी खबरदारी घ्यायची, असा माईनीं निश्चय केला आणि सुटी संपून शाळा सुरू व्हायच्या वेळीं त्यांनीं म्हटलं—

" बरं का राजाबाळ, आतां या वर्षीं तरी अभ्यासाची हेळसांड करूं नको. एक वर्ष फुकट घालवलं आहेस आपल्या खुळेपणानं "

राजाबाळ शरमेल आणि 'दुरावलेलं यश परत मिळवीनच मिळवीन' अशी प्रतिज्ञा करील अशी माईंना आशा वाटत होती. पण राजाबाळचं रडगाणंच त्यांना ऐकावं लागलं. तो चाचरत म्हणाला, " खरं सांगूं तुला माई ? माझं अभ्यासाकडं लक्ष लागत नाहीं. मास्तर शिकवतात तें माझ्या डोक्यांत शिरत नाहीं, लक्षांत राहात नाहीं. म्हणून शाळा सोडावी—"

" काय ! तूं शाळा सोडणार ! मग करणार तरी काय तूं ? काय रे तुझीं हीं दळभद्रीं लक्षणं ? परवांपावेतर तुझं अभ्यासाकडं लक्ष लागत होतं, वरचा नंबर तुला मिळत होता. दुसऱ्या घाणेरड्या नादांतनं लक्ष काढलं तर अभ्यासाकडं छान लागेल. म्हणे शाळा सोडणार !

मग काय पाणक्या होणार आहेस कीं हाटेलांतला वाढप्या ! बोलायला लाज तरी कशी वाटत नाहीं म्हणतें मी. गेलंच पाहिजे तुला शाळेंत. नुसत्या शाळेंतल्या शिकवणीनं अभ्यास चांगला झाला नाहीं तर शिकवणी ठेवीन मी. कांहीं झालं तरी बी. ए., एम्. ए. व्हायलाच पाहिजेस तूं."

"पण माई, मला फिरून त्याच वर्गांत बसायला लाज वाटते. बरोबरीचीं पोरं मला चिडवतील—"

माईंना मुलाची अडचण कळली, पण त्यांना ती निवारणं शक्य कुठं होतं ?

तरी पण माई निराश झाल्या नाहींत. मुलासाठीं वाटेल ती अवघड गोष्ट करायला आई सिद्ध होते. घराबाहेर सहसा न पडणाऱ्या आणि परक्या माणसापुढं न जाणाऱ्या माई आपण होऊन मुख्याध्यापकांकडं गेल्या. राजाबाळला वरच्या वर्गांत घालण्याबद्दल त्यांनीं त्यांची विनवणी केली, त्याचे कच्चे विषय पक्के करण्यासाठीं आणि मागं पडलेले अभ्यास भरून काढण्यासाठीं शिकवणी ठेवण्याची सिद्धता त्यांनीं दर्शवली. मुख्याध्यापकांनीं नाखुषीनं का होईना, पण राजाबाळला सातवींत घालण्याचं वचन दिलं. पण त्याच वेळीं माईंना बजावलं—

"राजाबाळबद्दल त्याच्या वर्गशिक्षकांकडून ज्या गोष्टी मला कळल्या आहेत, त्या फारशा आशादायक नाहींत. कुसंगतीमुळं आणि त्याच्या जोडीला फाजील लाड होत असल्यामुळें चांगला मुलगा खराब होतो आहे असं त्यांचं म्हणणं आहे. कुसंगतीपासून त्याला दूर ठेवायची जबाबदारी आपल्याइतकीच आमच्यावरहि आहे, आणि आम्ही शक्य ती खबरदारी घेऊंच. पण घरांतल्या लाडांमुळं मुलगा विघडला तर त्याला मास्तर काय करूं शकणार ? तुमचा मुलगा सुधारायला पाहिजे असेल, तर तुम्ही आणि आम्ही दोघांनींहि झटलं पाहिजे. आईनं मुलाची आबाळ करूं नये, आणि ती करील तरी कशी ? पण आबाळ करायची

नाहीं म्हणजे मुलगा म्हणेल तें आणि म्हणेल तेव्हां देऊन टाकणं नव्हे. मुलाची इच्छा रास्त कीं वावगी हें आईनं पारखलं पाहिजे आणि वावगी इच्छा वेळींच मोडून काढली पाहिजे. राजाबाळसारख्या एका होतकरू मुलाची सुधारणा आणि उत्कर्ष घडवून आणण्यासाठीं आपण दोघंहि प्रयत्न करूं या."

मुख्याध्यापकांच्या उपदेशापेक्षां त्यांनीं राजाबाळला वर ढकललं याचा आनंद माईंना अधिक झाला होता. पण ती वार्ता ऐकून राजाबाळला मात्र आनंद झाला नाहीं. 'माई कांहींतरीच करून बसते' असं तो स्वतःशींच पुटपुटला.

निरुपाय म्हणून राजाबाळ शाळेंत जायला लागला. नवा वर्ग, नवीं पुस्तकं यांत तो थोडासा रमला. त्याचे छब्यासारखे नको असलेले वर्गबंधु मागं रेंगाळत राहिले हें राजाबाळला बरं वाटलं. पण बाकीचे वर्गमित्र आपल्याशीं सलगी करायला उत्सुक नाहींत ही गोष्ट समजून आल्यामुळं तो थोडासा खट्टू झाल्यावांचून राहिला नाहीं. दोन-चार नवीं अनोळखी मुलं त्याच्या वर्गांत आलीं होतीं, त्यांच्याशीं दोस्ती जमविण्याचा राजाबाळनं प्रयत्न चालवला.

राजाबाळचे कच्चे विषय पक्के व्हावे व त्याचे चालू अभ्यासहि वर्गाबरोबर राहावे म्हणून माईंनीं त्याच्याच शाळेंतल्या एका शिक्षकांची शिकवणी त्याला ठेवली. राजाबाळ खरोखर बुद्धीचा जड नव्हता. पुष्कळ मुलांपेक्षा त्याचा पाठ थोड्या श्रमांत व थोड्या वेळांत तयार होई. पण त्याचं पाठाकडं लक्ष लागलं तर! त्याच्या बाबतींत हा तरच नडत होता. तरी पण सुरुवात बरी झाली होती. माई त्याच्यावर बारीक नजर ठेवून होत्या. राजाबाळची गाडी रुळाला लागली हें समाधान त्यांना वाटूं लागलं होतं.

पण हें समाधान फसवं ठरलं. चैनीला चटावलेलं राजाबाळचं मन कांहीं वेळ ताळ्यावर राहिलं असलं तरी संधि सांपडतांच तें उधळूं

लागलं. छव्या बाजूला गेला तरी दुसरा एक बाव्या त्याला येऊन चिकटला. त्याच्या वर्गांत जे नवे विद्यार्थी जमले होते, त्यांत बाबुण्या हा एक होता. कलाप्रवीण नाटक मंडळीचे मालक भालबा पितळे यांचा हा मुलगा. त्याचं बालपण नाटक मंडळींत गेलं होतं. कंपनी-बरोबर तो खूप फिरला होता आणि नटांचे चाळे त्यानें जवळून पाहिले होते. कांहीं त्यानं अंगवळणीं पाडूनहि घेतले होते. तो पान खाई, एवढंच नव्हे, तर तंबाखूची चिमूट तोंडांत टाकण्यांतहि त्याला कांहीं वाटत नसे. विडीसिगारेट तर तो एखाद्या मुरलेल्या वयस्क माणसाच्या सफाईनं ओढी. त्याला आपल्या नाटककंपनींतच रुळवावा आणि हिरो हिरॉइनचा दर्जा त्याला प्राप्त करून द्यावा ही भालबांची इच्छा होती; पण बाबुण्याच्या आईनं मोडता घालून शाळेचं लफडं त्याच्या मागं लावलेलं होतं. दरसाल नव्या हायस्कुलांत जायचं, नव्या वसतिगृहांत राहायचं, नापास झाल्यावर शाळेला शिव्या द्यायच्या, वसतिगृहाच्या जेवणाला आणि गांवच्या हवापाण्याला नांवं ठेवायचीं, हा बाबुण्याचा ठरलेला कार्यक्रम होता. भालबांनींहि नवं गांव, नवं हायस्कूल निवडायचं, मुख्याध्यापकांना गळ घालून मुलाचं नांव वरच्या वर्गांत घालवायचं आणि तेवढं झाल्यावर चिरंजीव काय करतात, याची उभ्या वर्षांत वास्तपुस्त करायची नाहीं हा क्रम अखंड पाळला होता.

बाबुण्याची गट्टी अभ्यासू आणि सरळमार्गी वर्गबंधूंशीं जमणं शक्य नव्हतं, पण मित्राशिवाय दिवस काढणं तरी त्याला कसं शक्य होतं? टेहळणी करतां करतां त्याला राजाबाळ हें सावज सांपडलं. आजारी माणसाला नेमके वावडे पदार्थच खावे-खावेसे वाटतात. पौष्टिक, पथ्यकर पदार्थ पुढं वाढून ठेवले तरी त्यांची त्याला शिसारी येते, तसं राजाबाळचं झालं होतं. चांगल्या मुलांची त्याच्या वर्गांत वाण नव्हती. पण तशा कोणाशीं सख्य जोडण्याऐवजीं बाबुण्यासारख्या छचोर आणि टारगट पोराच्या नादालाच तो लागला. प्रारंभीं कांहीं दिवस

त्याच्या वागणुकींत दिसूं लागलेली सुधारणा आतां दिसेनाशी झाली. शिकवण्याकडं त्याचं लक्ष नाहीं आणि घरीं करावयास सांगितलेले पाठ तो करीत नाहीं अशा शिक्षकांच्या तक्रारीहि माईंच्या कानावर आल्या.

माईंनीं जाब विचारला, तर राजाबाळचीं उत्तरं आणि सबबी तयार असत, ' मास्तर एकाच वेळीं फार होमवर्क देतात त्यामुळं तें लवकर उरकत नाहीं, ' 'दोन दिवस डोकं दुखत होतं,' 'त्या वेळीं डोळे लालसर दिसले म्हणून वेतानंच लिहीत वाचीत जा असं तूंच म्हणालीस ' अशा उत्तरांनीं तो वेळ मारून नेई. पण ' तुझ्याशिवाय बाकीचीं मुलं कसं नेमून दिलेलं काम वेळच्या वेळीं करतात, आणि तुझ्याबद्दलच मास्तरांची तक्रार कां ? ' असं माई विचारीतच. त्यावरहि राजाबाळचं राखीव उत्तर होतंच ! हे ' सारळकर मास्तर सर्वच मुलांबद्दल ओरडत असतात. तें तुला कसं कळणार ? किती वाटेल तितका अभ्यास केला तरी सारळकर मास्तरांची ओरड संपत नाहीं, म्हणून मुलांनीं त्यांचं ' ओरडकर ' असं नांव ठेवलंय. तूं त्यांच्याकडं फारसं लक्ष देऊं नको, असं म्हणून तो माईला गप्प बसवी. मुलाला लबाड बोलण्याची खोड लागली आहे याचं प्रत्यंतर माईंना आलेलं असलं, तरी माई त्याच्या थापांना आणि नाटकी साळसूदपणाला थोड्या फसतच.

सहामाही परीक्षेची सूचना फलकावर लागली. परीक्षेंत आपण गोता खाणार ही खात्री असल्यामुळं राजाबाळचं काळीज धडधडायला लागलं. परीक्षेच्या निकालानं आपलं आतांपर्यंतचं सगळं नाटक फसेल आणि माई आपलं उच्चाटन करायचं वेड डोक्यांत घेऊन बसेल, या विचारानं राजाबाळ घाबरा झाला. त्यानं आपलं संकट बाबुण्याला सांगितलं, तेव्हां तो टिंगलखोरपणानं म्हणाला—

" लेका, भागूबाईसारखा भितोस काय असा ? नापास होणं हा विद्यार्थ्याचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच, अशी हिंमत

प्रत्येक विद्यार्थ्यानं वाळगली पाहिजे. त्यांतून ही कांहीं वार्षिक परीक्षा नव्हे. असल्या तिमाही-सहामाही परीक्षेला विचारतो कोण? असल्या परीक्षेला मुळीं बसायचंच कशाला? आणि बसलाच नाहींस तर तूं नापास झालास असं म्हणायची कुणाची छाती आहे?"

वाबुण्याचा हा उपाय राजाबाळला ठीक वाटला. पण परीक्षेला बसायचंच नाहीं, ही गोष्ट वाबुण्याइतकी राजाबाळच्या बाबतींत सोपी नव्हती. परीक्षा कोणत्या तारखेला सुरू होणार याची माहिती माईनीं मिळविली होती आणि उजळणीसाठीं म्हणून त्या राजाबाळला पहाटे उठवूं लागल्या होत्या. पण वाबुण्यापाशीं असल्या अडचणीवरले तोडगे तयार असत. सोमवारीं परीक्षा सुरू व्हायची, तर रविवारीं संध्याकाळीं आठ वाजून गेले तरी राजाबाळ घरीं आला नाहीं! माई अस्वस्थ झाल्या. पूर्वीं त्यानं अनेक प्रकार दाखवले असल्यानं त्यांतल्याच एखाद्याची पुनरावृत्ति निघते कीं काय असं त्यांना वाटायला लागलं. स्वस्थ बसून चैन पडेना आणि शोध कुठं करायचा हेंहि कळेना. अखेर जवळपासच्या त्याच्या एखाद्या सोबत्याला विचारून यावं असा बेत करून माई उठतात, तोंच राजाबाळला घेऊन वाबुण्या हजर!

तें दृश्य पाहतांच माईच्या हृदयांत धस्स झालं. राजाबाळचा उजवा हात फळ्यांत बांधून गळ्यांत अडकवलेला!

"हें काय झालं आणिक!" भीतीनं कांपऱ्या झालेल्या आवाजांत माई उद्‌गारल्या.

"राजाबाळचं नशीब चांगलं म्हणा माई, नाहींतर त्याचा हात तोडावाच लागला असता आज!" वाबुण्या सांगूं लागला. "अभ्यास करून डोकं दुखायला लागलं म्हणून आम्ही माणिकतळ्यावर फिरायला गेलों. तिथं पाय निसरून राजाबाळ पडला आणि त्याच्याच अंगाखालीं त्याचा हात दुमडला. काय ओरडलाय म्हणतां! मी धांवत जाऊन त्याला उठवायला लागलों तर उठेनाच बघा! झीट आली होती त्याला.

रस्यावरून एकजण जात होता त्याला हांक मारली मीं. त्यानं सांगितल्यावर मीं राजाबाळच्या डोक्यावर आणि डोळ्यांवर पाणी मारलं तेव्हां सावध झाला. पण गुरासारखा ओरडत होता बघा! पण त्या बुवानं काय झालंय तें बरोबर ओळखलं. मनगटांतलं अन् कोपरांतलं हाड निखळलं होतं. जर करतां हाडं चिवलीं–मोडलीं असतीं तर ऑपरेशन करून हात कापावाच लागला असता. पण आमचं नशीब चांगलं बघा माई. तो माणूस हाडाचा वैद्यच कसा निघाला! त्यानं टांगा बोलावला आणि आम्हांला आपल्या घरीं नेऊन राजाबाळचीं हाडं बसवून हात बांधला. आठदहा दिवस हात बांधून ठेवला पाहिजे आणि रोज चोळून घेतला पाहिजे असं सांगितलंय त्यानं."

राजाबाळ अपघातांत सांपडला याचं माईना दुःख वाटल्यावांचून कसं राहील! पण तो अपघात जन्माच्या अधूपणाला कारण न होतां थोडयावर निभावला त्यामुळं त्यांना दुःखांतहि समाधान वाटलं. संकटाच्या वेळीं आपल्या मुलाला मदत करणारा बाबुण्या त्यांना देवदूतासारखा वाटला आणि त्यांनीं त्याचे ढीगभर आभार मानले.

आपला डाव साधला असा विश्वास येतांच बाबुण्या म्हणाला—

"यांत मीं अधिक काय केलं माई? माझा हात दुखावला असता आणि राजाबाळ जवळ असता तर त्यानं नसती का माझी काळजी घेतली? एकमेकांला मदत करायची नाहीं, तर आम्हीं वर्गबंधु कसले? माझ्याबद्दल मुळींच परकेपणा वाटूं देऊं नका माई. आतां आठ दिवस राजाबाळला हात चोळायला न्यायला पाहिजे तें मी घेऊन जाईन माझ्या सायकलवरून. नाहीं तरी मी नेहमींच नेतों एखाद्या सोबत्याला माझ्यापुढं बसवून."

सायकलवर बसणंहि धोक्याचं असतं असं माईच्या मनानं घेतलेलं असल्यामुळं त्यांनीं राजाबाळला सायकलजवळ जाऊं दिलं नव्हतं मग बाबुण्याच्या पुढं बसवून—आणि तेंहि हात जायबंदी झाला असतां—त्या कशा पाठवणार? त्यांनीं बाबुण्याची ती सूचना ऐकून म्हटलं—

" नको रे बाबा, त्यापेक्षां टांगा करून जा. "

" पण माई, चार मैल जायचं अन् तासभर तरी थांबायचं म्हणजे टांगेवाला कमींत कमी तीन रुपये घेईल. फुकटची सायकल असतांना पैसे कशासाठीं घालवायचे ? "

" जाऊं देत गेले तर. जिवापरीस पैसे जास्त नाहींत. "

बाबुण्या निघून गेला. राजाबाळ मुसमुसून रडायला लागला.

" उगी बाबा. फार कां दुखतोय हात माझ्या राजाचा ? " माई कळवळून म्हणाल्या.

" हाताचं नाहीं ग माई. पण माझी परीक्षा बुडाली याचं मला भारी हें वाटतंय ग—"

राजाबाळचा परीक्षेंत पहिला नंबर आल्यावर वाटला असता, त्यापेक्षांहि त्याच्या या आस्थेचा आनंद माईना वाटला. मुलगा आणि त्याचा साथीदार आपणाला बनवीत आहेत असा संशयसुद्धां त्यांना आला नाहीं !

आठ दिवसांऐवजीं पंधरा दिवस हात चोळण्याचं निमित्त लांबलं. बाबुण्यानं साडेआठला यायचं, माईनीं तीन रुपये त्याच्या हातावर टाकायचे, दोघांनीं घराबाहेर पडून दोन तास मजा मारायची, असा कार्यक्रम सुरू होता.

सहामाही चुकवण्यापुरती हात मोडल्याची युक्ति साधली, तरी प्रिलिमिनरीच्या वेळीं ती उपयोगी कशी पडणार ? प्रिलिमिनरीला बसलं पाहिजे आणि फॉर्म मिळवण्यापुरतं पासहि झालं पाहिजे. पण तें जमायचं कसं ?

राजाबाळ या धास्तीनं चूर होऊन गेला. पण बाबुण्या बेफिकीर होता. ' बघूं रे ज्या वेळचं त्या वेळीं ' हें त्याचं ठरलेलं उत्तर !

परीक्षा उद्यांवर आली. राजाबाळ अधीर झाला. बाबुण्या म्हणाला, " आज रात्रीं आठ वाजतां ये म्हणजे सांगतों काय करायचं तें. " रात्रीं

आठ वाजतां बाबुण्यानं एक किल्ल्यांचा जुडगा राजाबाळच्या हातीं देऊन म्हटलं—

"असाच शाळेंत जा. मास्तरांची खोली उघड. उजव्या कोपऱ्यांत साने मास्तरांचं कपाट आहे, तें तूं पाहिलं आहेस. तेंहि उघड. यांतच चावी आहे त्याची. त्या कपाटांत छापून आलेले पेपर आहेत. सर्वांत वरच्या कप्प्यांत ओळीनं मांडून ठेवलेत. प्रत्येकांतला एकेक कागद घे, कुलूप लाव, अन् ठोक धूम इकडं. रात्रींच तयार करून ठेवूं उद्यांचा पेपर—हं आटप."

"पण मी एकटा कसा रे जाऊं? दोघं मिळून जाऊं या."

"भागुबाईच आहेस. मी तुझ्याबरोबर येण्याऐवजीं सानेमास्तराकडं बसतों जाऊन. त्याला ठेवतों गुंगवून. नाहींतर एखाद वेळीं शाळेंत खेप टाकायची हुक्की यायची त्याला. शाळा म्हणजे घरापेक्षां प्रिय वाटते बेट्याला!"

"तरी पण एकट्यानं जायची भीति वाटती रे!"

"भीति वाटती तर बैस रडत, हो नापास अन् खा खेटरं आईचीं. लेका, वर्षभर कांहीं न करतां मजा केलीस, आतां एक दिवस तरी कर कीं धडपड! मीं नाहीं का किल्ल्या पळवल्या सान्याच्या खिशांतून?"

राजाबाळचा निरुपाय झाला. तो लपत छपत शाळेच्या आवारांत शिरला. अगदीं सामसूम होतं सगळं. आपण उगीचच भीत होतों असं वाटलं त्याला. त्यानं शिक्षकांची खोली उघडली, पुनः बंद करून घेतली. दारावरला पडदाहि ओढून घेतला. बाबुण्यानं सांगितल्याबरहुकूम सर्व तालीम झाली. मास्तरांचं कपाट उघडून राजाबाळनं टॉर्चच्या उजेडांत प्रश्नपत्रिकांच्या चवडीला हात घातला. तोंच—

दारांत टणकन् सोटा वाजला अन् मुख्याध्यापकांचे उद्गार ऐकूं आले—

"हें काय साने मास्तर! कुलूप न लावतांच घरीं गेलांत तुम्ही?"

" मीं कुलूप खात्रीनं लावलं होतं, पण—किल्ल्याहि खिशांत लागत नाहींत !"

" म्हणजे !"

मुख्याध्यापकांनीं दाराला धक्का दिला. दार आंतून बंद !

" कोण आहे आंत ? साने मास्तर, धांवत जाऊन पोलीसला बोलावून घ्या—चोरीचा प्रकार दिसतोय."

राजाबाळची या प्रकारानं पुरती गाळण उडाली. तो दार उघडीत म्हणाला—

" चुकलों सर ! मला तुम्ही शिक्षा करा. पण पोलीसच्या स्वाधीन करूं नका."


मुख्याध्यापकांनीं आपल्या टॉर्चच्या प्रकाशाचा झोत गुन्हेगाराच्या तोंडावर पाडला !

" कोण राजा ! अरे वा !!"

* * *

# ११

राजाबाळचा हा नवा विक्रम ऐकतांच माईच्या डोक्यावर वीज कोसळल्यासारखं झालं. 'असले धिंडवडे करून घेण्यापरीस कार्टं मेलं कसं नाहीं' असे वैतागाचे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघाले ! राजाबाळला साधी शिंक आली तरी ज्या माई दचकत, त्याला बारीकशी ठेंच लागली तरी ज्या माईचं मन कळवळे, आणि आजपर्यंत ज्या माईनीं जिवाचं पाणी पाणी करून त्याला जपलं त्याच माई तो मेला कां नाहीं म्हणण्याइतक्या आज कठोर बनल्या ! माई ही मानधन स्त्री होती. तिला अब्रू प्राणाहून प्रिय होती. मुलानं घरफोडी, चोरीसारखं दुष्कृत्य केलं आणि तो पकडला गेला आहे आणि आतां तो तुरुंगांत



मुख्याध्यापकांनीं आपल्या टॉर्चच्या प्रकाशाचा झोत गुन्हेगाराच्या तोंडावर पाडला !
" कोण, राजा ? अरे वा ! ! "

जाणार, चोर हा डाग त्याच्या कपाळीं कायमचा चिकटणार आणि 'चोराची आई' हा किताब आपल्यालाहि मिळणार, हीं एकाहून एक भेसूर दृश्यं त्यांना दिसूं लागलीं, त्यांचा थरकाप करूं लागलीं. छे! हें पाहण्यापेक्षां विहीर जवळ करावी, असंहि माईच्या मनांत आलं.

निराशेनं त्यांचं मन व्यापलेलं असलं, तरी मधून मधून त्यांत आशाहि चमकून जात होती. आपला राजाबाळ मुळांत वाईट मुलगा नाहीं. लोकांच्या नादीं लागून तो वांकड्या मार्गानं गेला असला तरी त्याला सांवरून घेतलं पाहिजे—आणि आपणाशिवाय कोण आहे त्याला सांवरायला? प्रयत्न केला तर तो सुधारेल. दुखणं आलं, तें विकोपाला गेलं म्हणून हातपाय गाळून कसं चालेल? शक्य तेवढे उपचार करीत राहिलंच पाहिजे. प्रयत्नाला यश येतंहि. अगदीं नाकाला सूत लावलेलीं माणसंहि परत येतात. असाच अनुभव आपल्या राजाबाळच्या बाबतींत कां येणार नाहीं? वाल्या कोळ्यासारखे महापातकीहि वाल्मीकीसारखे महात्मे बनले, आपला दुराचारी राजाबाळहि असाच सदाचारी थोर पुरुष कां होणार नाहीं? होईलहि.

माई, घट्ट मन करून उठल्या. मुख्याध्यापकांकडे गेल्या. मुलाचा अपराध पोटांत घालून त्याला क्षमा करण्याबद्दलहि त्यांनीं पदर पसरला. त्यांची ती केविलवाणी अवस्था पाहून मुख्याध्यापकहि कळवळले. ते म्हणाले—

"माई, मीहि मुलांचा बाप आहें. मुलांसाठीं आईबापांचं मन किती हळवं झालेलं असतं हें मी जाणतों. तुमच्या मुलाबद्दल—एकुलत्या एका मुलाबद्दल—तुमच्या मनाला पीळ पडत असला पाहिजे हें मला कळतं. आणि मुलासाठीं नसलं, तरी त्याच्या तळमळणाऱ्या आईला साहाय्य करणं योग्य आहे हेंहि मला कळत नाहीं असं नाहीं. तरीपण केव्हां केव्हां सौम्यतेपेक्षां कठोरता स्वीकारणं भाग असतं, तें हितपरिणामीहि ठरतं. बिघडलेल्या अंगाला चंदन चोळण्याऐवजीं डागण्या देणं—प्रसंगीं

बिघडलेला भाग चिरणं, कापणं भाग असतं. तुमच्या मुलाच्या एकेक गोष्टी आतां उघडकीस आल्या आहेत, त्यांवरून तो अधःपाताकडं गडगडत चालला आहे असं दिसतं. नाजूक उपाय आतां त्याला आवरून धरूं शकणार नाहींत. जालीम झणझणीत उपाय केले तरच कांहीं आशा. माई, त्याला गुन्हेगार मुलांच्या सुधारणागृहांत वर्ष दोन वर्षं धाडावं लागलं तरी तुम्ही मन घट्ट करा. राजाबाळ तुमचा मुलगा आहे, तसा माझा शाळेचा विद्यार्थी आहे. त्याच्या गुन्हेगारीनं आमच्या शाळेचीहि नाचक्की होणार आहे. तरी पण इतर मुलांच्या शिस्तीचं मला पाहिलं पाहिजे. ' वाटेल तसं वागलं तरी मास्तर खपवून घेतात ' असा विद्यार्थ्यांचा समज होऊं देणं घातुक आहे. त्यापेक्षां बेताल वर्तनाला कडक शासन होतं, असा वचक विद्यार्थ्यांच्या मनावर बसविण्यासाठीं मला राजाबाळ आणि बाबुण्या यांची गय करतां कामा नये. मी त्यांना पोलिसांच्या ताब्यांत द्यायचं ठरवलं आहे. माई, तुम्हांला आणखी मुलं असतीं तर राजाबाळच्या वाईट संवयी त्यांना जडूं नयेत म्हणून तुम्ही जपलां नसतां का ? ".

रडून रडून माईंचे डोळे कोरडे व्हायची वेळ आली. काय बोलावं हें त्यांना सुचेना. पण बोलल्याशिवाय स्वस्थ तरी कुठं बसतां येत होतं ? त्या म्हणाल्या—

" आपणांसारख्या विद्वानांपुढं मी खुळी अडाणी बायको काय बोलणार ? आणि आपण म्हणतां त्यांत वावगं तरी काय आहे ? पण आईचं आंतडं स्वस्थ बसूं देत नाहीं. एकाच्या संगतीनं दुसरीं मुलं बिघडूं नयेत म्हणून जपायला हवंच. पण त्यासाठीं बिघडलेल्या मुलाला तुरुंगांत डांबून टाकणं एवढाच का उपाय आहे ? दुसऱ्या एखाद्या रीतीनं त्याला दुसऱ्यांपासून दूर ठेवतांच येणार नाहीं का ? मी थोडं अधिक बोलतें म्हणून रागावूं नका. आपल्या एका मुलाकडून भलतंच कांहीं घडलं तर त्याला तुरुंगाचा रस्ता दाखवण्याइतकं आपलं मन

न्यायनिष्ठुर होईल का? आणि आपलं मन तसं झालं तरी त्याच्या आईचंहि तसं होईल का? तिनं गयावया केली, आपल्यापुढं पदर पसरला तर आपण तिला झिडकारून टाकाल का?"

माइचा हा सवाल विनतोड होता. त्याचं उत्तर मुख्याध्यापकांना देतां आलं नाहीं. ते गोंधळलेले पाहून माई बोलूं लागल्या—

"मास्तरसाहेब, यापुढं माझ्या मुलाला मी सर्वस्वीं आपल्या हवालीं करतें. दोन वेळां जेवूं घालायचं एवढं माझं काम. बाकी अष्टौप्रहर तो आपल्या नजरेखालीं राहील. आपण त्याला आपल्या कडक शिस्तींत वागवा. जरूर तेव्हां त्याला शासनहि करा. 'कां केलंत' असं मी विचारायची नाहीं. पण आज त्याला—माझं लेकरूं म्हणून नव्हे, पण आपला विद्यार्थी म्हणून त्याची कींव करा. त्याला उकिरड्यांत कुजविण्याऐवजीं दया दाखवून त्याचा उद्धार करा."

माईचा युक्तिवाद आणि त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रगट होणारा कळवळा अखेर प्रभावी ठरला. त्यांनीं राजाबाळला पोलीसऐवजीं माईंच्या हवालीं केलं. पण त्याच वेळीं बजावलं—"यापुढं तुमच्या मुलाला आमची शाळा बंद. त्याचा दाखला घेऊन जा, त्यांतहि 'वर्तन' या सदरांत आम्हांला 'असमाधानकारक' असं लिहावं लागेल."

मुलाची मुक्तता एवढा एकच विषय त्या वेळीं माईंच्यापुढं होता. त्यांनीं मुख्याध्यापकांच्या इतर अटींचा विचारच केला नाहीं.

पण त्याची कांहींतरी नवी व्यवस्था करायलाच हवी होती. नुसता घरांत बसवून तरी कसा आणि किती दिवस ठेवायचा! गांव बदलण्याचा विचार त्यांच्या मनांत आला. तिथल्या अनोळखी वातावरणांत राजाबाळची आणि त्याच्याबरोबर आपलीहि हेटाळणी थांबेल असं माईंना वाटलं. पण गांव बदलायचं तर मनूताईकडंच त्याला कां पाठवूं नये? ती वरचेवर बोलावीत असतां तिकडं न धाडतां आपण दुसऱ्या गांवीं बिऱ्हाड मांडून राहिलों तर तिला काय वाटेल? तिच्याबद्दल

आपणाला विश्वास वाटत नाहीं, आपण तिला दूरची लेखतों असा तिला संशय येईल आणि ती आपणावर रागावेलहि, अशा शंकाकुशंकांनीं माई बेचैन होऊन गेल्या.

मनूमावशीकडं जायला राजाबाळ तयार असता तर प्रश्नच नव्हता. त्याच्या नाराजीमुळंच नडत होतं. मुलाचीं अवलक्षणं पाहून आणि मनूताईच्या घरच्या सोज्वळ वातावरणांत तो सुधारेल असं दिसत असूनहि त्याच्याच कलानं चाललेलं बरं असं माईंना वाटत होतं. आपण सांगूं तसं आणि आपण सांगूं तें मुकाट्यानं केलं पाहिजे असं मुलाला सांगण्याची हिंमत माईंना असूनहि होत नव्हती !

अखेर गुणापूरच्या बिऱ्हाडाचा बेत ठरला. माई जाऊन जागा पाहून ठरवून आल्या. इतकीं वर्षं जें ठिकाण आपलं म्हटलं, ज्यावर आपण विविध प्रकारचा प्रपंच मांडला, त्या प्रपंचाची आवराआवर करतांना, तें ठिकाण सोडून जातांना माईचं मन जड झालं. अंवतीभंवतींच्या कितीतरी मंडळींशीं माईनीं आपुलकी जोडली होती. कित्येक शेजारणी सख्ख्या वडील वहिणीइतक्या ममत्वानं माईशीं वागत होत्या. माईहि त्यांच्या सुखदुःखांशीं समरस होऊन त्यांच्याबरोबर सुखदुःखांचा अनुभव घेत होत्या. त्यांच्या मुलांलेकरांचं कोडकौतुक करून आसपासच्या बालसृष्टीचं माई म्हणजे आरामाचं, उल्हासाचं स्थान बनलेलं होतं. पाळलेल्या कुत्र्या-मांजरावरहि माणसाचा लोभ जडतो, त्यांच्यासाठीं जिवाला ओढ लागते. तीं दृष्टीआड झालीं तर मन तगमगायला लागतं, मग हा मित्रपरिवार सोडून निघून जातांना माईंना किती अवघड झालं असेल ?

पण हें सगळं माईनीं सहन केलं, त्यांना करावं लागलं. जवळचीं माणसं भलीं असलीं आणि मुलाचा मूर्खपणा हा आईचा दोष नव्हे असं मानीत असलीं तरीपण राजाबाळशीं तीं गोडव्यानं वागतील हें शक्य नव्हतं. त्यांच्या वागण्यांत राजाबाळविषयीं तुटकपणा, उपहास

माईना दिसून आल्याशिवाय राहात नसे आणि त्यांच्यापुढं राजाबाळ-लाहि चोरटेपणा वाटे. माईना हा प्रकार असह्य होई आणि त्यापायींच सगळे लागेबांधे तोडून माई दुसऱ्या ठिकाणीं प्रयोग मांडायला गेल्या.

मनूबाईना हें कळलं तेव्हां त्यांना राग आल्यावांचून राहिला नाहीं. आपल्या अगत्याच्या बोलावण्याची कदर न वाळगतां माईनं अनोळखी आडवळणी गांवीं मुलाला घेऊन जावं ही गोष्ट त्यांना कशीशी वाटली आणि त्यांनीं पत्रांत लिहिलं, 'गांव सोडायचं होतं आणि बहिणीवर भार घालायचं अवघड वाटत होतं तर इथं येऊनहि तो उद्देश साधला असता. इथं वेगळं बिऱ्हाड तुला मांडतां आलं असतं. मला तुमच्या गांठीभेटीचा आनंद तरी मिळाला असता. पण इथं न येण्यांत मला न सांगण्याजोगी कसली सोय असेल, नाहीं तरी कुणीं म्हणावं?'

बहिणीच्या या पत्रानं माईना मनस्वी खेद झाला. आपल्या एकुलत्या एका बहिणीशीं आपण प्रतारणा केली, करीत आहों, या जाणिवेनं त्यांना बेचैन करून सोडलं. पण ही प्रतारणा पुढंहि करीत राहण्या-वांचून माईना गत्यंतर नव्हतं. त्यांनीं कसलींतरी कारणं सांगून मनूताईची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

फटकारा बसला कीं राजाबाळ नरमाईनं वागायचा. त्याचं वागणं सुधारलेलं दिसलं कीं माई पहिलं सारं विसरून त्याचं कौतुक करायला लागायच्या, त्याचे लाड पुरवायच्या. पण राजाबाळची ही सुधारणा तेवढ्यापुरतीच असे. पुन्हां तो बहकूं लागे. कारण त्याला जडलेली चैनीची चट त्याला बंधनांत राहूं देत नसे.

या नव्या ठिकाणींहि तसंच झालं. तिमाहीपर्यंत राजाबाळचा अभ्यास ठीक झाला. माईनीं शिकवणीसाठीं योजिलेले रामराव मास्तर एकदां माईना म्हणालेसुद्धां कीं, 'राजाबाळ असाच मन लावून अभ्यास करीत राहील तर सहामाहीपर्यंत त्याचा तयारीच्या परीक्षेचा अभ्यास होईल. पुढं नुसत्या उजळणीवर तो मॅट्रिकची परीक्षा पास होईल.'

रामराव मास्तरांचं हें आश्वासन म्हणजे माईंना अमृतवाणीसारखं वाटलं. त्या दिवशीं त्यांनीं राजाबाळच्या आवडीचे बटाटेपोहे मधल्या वेळच्या खाण्यासाठीं बनवले.

पण बिघडलेल्या रक्ताप्रमाणं बिघडलेल्या मनाचीहि तऱ्हा होते. रक्त नासल्यामुळं खरूज, नायटे होतात. मलमाच्या माऱ्यानं ते मावळल्यासारखे वाटतात, पण थोड्या वेळानं ते दुसरीकडं उमटतात. मन वळकट नसलं म्हणजेहि असंच होतं. तें भलतीकडं धांवतं आणि भलत्या गोष्टी घडवतं. त्याबद्दल चपराक बसल्यावर तें ओशाळतं, पस्तावतं. पण हा पस्तावा अल्पजीवी असतो. औषधाबरोबर पथ्यहि पाळावं लागतं; पण पथ्य पाळण्याचा निग्रह रोगग्रस्तापाशीं नसतो. तो कुपथ्य करूं लागतो आणि साहजिकच विकार उलटतो. राजाबाळ दुर्बल मनाचा होता. त्याची बुद्धि रोगट बनलेली होती. शिस्त, प्रयत्न, निग्रह अशीं पथ्यं पाळण्याची कुवत त्याच्या ठिकाणीं उरलेली नव्हती. संधि सांपडतांच तो बंधनाबाहेर पडणार होता.

रोगग्रस्तापुढं कुपथ्याचे पदार्थ आपोआप येतात, तसेच दुर्बल बुद्धीच्या माणसापुढं खराब मैतर येऊन उभे राहतात. त्यांना झिडकारण्याची कुवत त्या माणसाला नसते. छब्या सुटला, रामा चिकटला, रामाला पिटाळलं, बाबुण्यानं वेढलं; तसाच प्रकार आतांहि घडला. जंगल्या धटिंगण हा नवा समंध राजाबाळच्या डोकीवर बसला. जगन्नाथ हें त्याचें सोज्वळ नांव होतं आणि व्यवहारांत त्याला जगू म्हणत. पण त्याच्या अडाणी आणि असंस्कृत चाळ्यांमुळं शाळेच्या जगांत जगूचा जंगल्या झाला होता. मास्तरांच्या खुर्चीवर कांटा खोवून ठेवणं, त्यांच्या टेबलाच्या खणांत विंचू सोडणं, पोरांच्या अंगावर खाजकुयलीचीं कुसळं टाकणं—असे त्याचे चाळे असत. अभ्यासांत तो यथातथाच होता, तरी पण माकडचेष्टांमुळं तो वर्गाचा विदूषक बनला होता. सर्वच शाळासोबत्यांना तो आवडे. राजाबाळलाहि तो आवडला. एवढंच नव्हे, तर राजाबाळ जंगल्याचा भक्त बनला !

जंगल्याचा वाटेल तें करून मोकळं होण्याचा वेडरपणा आणि आडनांवाला साजेसा त्याचा आडदांडपणा राजावाळच्या अंगांत कुठला असायला? तरीपण जंगल्याच्या नादीं लागून तो उनाडक्या करायला लागलाच! पोटॅशसारखे पदार्थ आणून त्यानं जंगल्याच्या मदतीनं आपटबार तयार केले आणि गैरसावध माणसांच्या मागं ते उडवून त्यानं दचकायला लावलं. मलकू वाण्याच्या दुकानांत जायचं आणि राजावाळनं कांहींतरी जिन्नस मागायचा. मलकू तो काढून द्यायला उठला कीं जंगल्यानं खारीक-खोबऱ्यासारख्या पदार्थांवर हल्ला चढवायचा, असे प्रयोगहि त्यांनीं चालवले. सर्जेरावांच्या शालनचा पहिला नंबर येतो तो सहामाहींत येऊं द्यायचा नाहीं, मुलांवर मात केल्याचा तिचा नक्षा उतरायचा, असा जंगल्या आणि कंपूचा कट झाला आणि तो कसा सिद्धीला न्यायचा हें ठरवण्यांत आलं. त्यांत मुख्य भूमिका राजावाळला देण्यांत आली. राजावाळनं गुरुजींनीं सांगितलेलं काम चोख बजावलं.

सहामाही परीक्षेचे दोन दिवस सुरळीतपणें पार पडले. दोन्ही विषयांत आपणांस भरपूर गुण मिळणार अशा खुषींत शालन होती. तिसरे दिवशींहि ती मोठ्या उमेदीनं शाळेंत आली होती. घंटा होऊन प्रश्न-पत्रिका वांटायला फक्त पांचच मिनिटं उरलीं. इतक्यांत राजावाळ धावऱ्या धावऱ्या शाळेंत आला आणि संभाव्य प्रश्नांचे अंदाज बांधण्यांत गर्क झालेल्या वर्गबंधूंच्या घोळक्यांत असलेल्या जंगल्याला म्हणाला—

"ए, आतां एक भयंकर अपघात झाला म्हणे!"

"अपघात? अन् तो रे कसला?"

"कलेक्टरकचेरींतील एक गृहस्थ सायकलवर कचेरीला चालले होते. त्यांना लॉरीनं धक्का दिला सराफकट्ट्यापाशीं. बेशुद्ध स्थितींतच त्यांना दवाखान्यांत नेलंय. मोटारवाला मात्र पसार झाला म्हणे."

"पण कुणाला लागलं!" शालननं भयभीत होऊन विचारलं. तिचे वडील सर्जेराव कलेक्टर ऑफिसांत होते, आणि ते सायकलवरच कचेरींत जात. त्यांची जाण्याची वेळहि हीच होती! शालन बेचैन झाली.

आपला बाण बरोबर लागला, चाणाक्ष जंगल्यानं हेरलं आणि तो म्हणाला—

"अरे पण कुणाला लागलं याचा नाहीं का तपास करायचा? अर्धवटच आहेस लेका!"

"मीं खूप विचारून पाहिलं रे. पण गर्दीत मला कोण सांगायला बसलंय? तरी पण वाणकर कीं भाणकर असं कांहींसं म्हणत होतीं माणसं."

राजाबाळच्या या खुलाशानं शालनचा धीर पुरता खचला. कारण वाणकर हें तिचं आडनांव होतं आणि तिचे वडील कलेक्टर ऑफिसांत जाणारे–सायकलवर जाणारे–होते. तेच अपघातांत सांपडले अशी तिची खात्री झाली. तिनं परीक्षेचा विचार सोडून दिला. आणि अशा वेळीं तिला परीक्षा सुचणं शक्य तरी कसं होतं? आपलीं वह्या-पुस्तकंहि न घेतां ती घरीं धांवली. आईला घेऊन ती दवाखान्यांत गेली, तिथं पत्ता लागेना, म्हणून कलेक्टर-कचेरींत गेली. तिथं तिला तिचे वडील अगदीं ठणठणीत स्थितींत भेटले. मायलेकींचा जीव भांड्यांत पडला. शालन परत शाळेंत आली, तोंवर उत्तरपत्रिका देऊन तिचे वर्गबंधु-भगिनी बाहेर पडूं लागल्या होत्या!

शालन नापास झाली. जंगल्या नापास व्हायचाच होता तो झाला, पण राजाबाळहि नापासच झाला. त्या हळहळीपेक्षां शालनची खोड मोडल्याचा आनंदच त्यांना अधिक वाटला.

मुलांच्या कारवाईमुळें वर्गातली पहिल्या नंबरची विद्यार्थिनी परीक्षेस वसूं शकली नाहीं, ती नापास ठरली, तिची शिष्यवृत्ति बुडाली, याबद्दल शिक्षक-मंडळींतहि गवगवा झाला. या कारस्थानाचं मूळ जंगल्या-

कंपूंतच कुठंतरी असलं पाहिजे, असा त्यांना वहीम आला. त्यांनीं आपल्याकडून छडा लावण्याचा प्रयत्न केला, पण गुन्हा शाबीत करण्याइतका पुरावा मिळूं शकला नाहीं.

शाळेंत कसली तरी भानगड झाली आणि तिच्यांत राजाबाळ सामील आहे अशी कुणकुण माईंच्याहि कानावर आली. त्यांनीं राजाबाळला विचारलंहि. पण राजाबाळनं उडवाउडवी केली. आपल्या वाइटावर कांहीं मुलं आणि मास्तर आहेत, ते आपल्यावर नसते आळ घेतात असं त्यानं माईंना सांगितलंच; पण आपल्याशीं वाकुडपणा धरणाऱ्या मास्तरांनीं मुद्दाम कमी मार्क देऊन आपणाला नापास केलं अशी तक्रारहि केली. राजाबाळच्या शब्दांत आणि चर्येवर साळसूदपणा भरपूर होता. त्याला माई फसल्या. राजाबाळचं सांगणं त्यांना खरं वाटलं.

मुलींची कुरापत काढली तरी ती खपून जाते असा या प्रकरणांत धीर आल्यामुळं जंगल्या नवी कुरापत कोणती काढावी याबद्दल डोकं खाजवूं लागला. अभ्यासांत त्याचं डोकं नीटसं चालत नसलं, तरी अशा गोष्टींत चांगलं चाले. सिनेमांतलीं गाणीं गुणगुणत मुलींच्याभोंवतीं तो फिरे. एखादी मुलगी नवी साडी नेसलेली दिसली कीं, 'आज बाई मला दाखवायला नेणार आहेत' असं तिच्याकडं डोळे मिचकावीत पण मुलांना उद्देशून बायकी अभिनय करून म्हणे. एखादी मुलगी वेणीवर फुलं माळून आली कीं, 'आरास ही फुलांची ! राया तुझ्याचसाठीं' असं त्याचं काव्यगायन सुरू होई. मुली चिडत पण त्यांना गप्प बसावं लागे. तक्रार तरी कसली करणार त्या ? त्यांचा स्वाभाविक लाजाळूपणा नडे.

'पोरी चिडतात चिडतात आणि गप्प बसतात. अन् त्या करणार तरी काय आपलं ?' असं जंगल्याला वाटूं लागलं आणि त्याच्या वात्रटपणाला चावटपणाचा वास यायला लागला ! जंगल्याच्या कुचेष्टांत

राजाबाळहि कधीं आडून तर कधीं उघड भाग घेई. मुलांच्या खोड्यांत ताकदीचं काम असे. प्रकरण थट्टेवरून रट्ट्यावर गेलं तर दोन द्यायघ्यायची तयारी असावी लागे. राजाबाळला ही धमक नव्हती आणि म्हणून मुलांमुलांत जंगल्यानं दांडगावा केला, तर तो प्रेक्षकाचीच भूमिका घेई. पण मुलींच्या बाबतींत हाणामारीचा प्रश्न नव्हता. त्यामुळं राजाबाळ जंगल्याच्या बरोबरीनं मुलींची थट्टामस्करी करण्यांत पुढाकार घेऊं लागला होता.

संक्रान्तीचा सण झाला. या सणाला स्त्रिया साहजिकच नटतात. त्या दिवशीं काढलेल्या नव्या साड्या, नवीं पोलकीं त्यांच्या अंगावर राहतात. शाळेंतल्या बऱ्याच मुली आज अशा नटलेल्या दिसत होत्या. लीला आणि चतुरा तर आज विशेष उठून दिसत होत्या. त्यांच्याकडं पाहून जंगल्या राजाबाळला म्हणाला—

"आज फुलपांखरं फार उडायला लागलीं आहेत नाहीं रे!"

त्यांची ही थट्टा सहन न होऊन चतुरा म्हणाली—

"आज डोमकावळे आणि गिधाडंहि दिसताहेत नाहीं का ग लीला?" आपल्या चावटपणाला उलट जाब मिळालेला पाहून जंगल्या चपापला. तिथल्या तिथं दुसरा एखादा फटकारा देण्याचं त्याला साधलं नाहीं; पण संध्याकाळीं शाळा सुटून घरीं जातांना त्या पोरींची खोडकी मोडण्याचा त्यानं निश्चय केला. घंटा होतांच क्रीडांगणाकडं क्रिकेट-साठीं धांवण्याऐवजीं तो राजाबाळसह बाहेर पळाला.

बागेच्या वळणापाशीं लीला, चतुरा आल्या. जंगल्या-राजाला हवी होती तशी संधि मिळाली. कारण दुसऱ्या कुणी मुली जवळपास नव्हत्या. जंगल्या त्यांना आडवून उभा राहिला. मुली चपापल्या.

"हा रे काय तुमचा चावटपणा! वाट सोडा मुकाट्यानं." लीला म्हणाली.

"डोमकावळ्यांचा नि गिधाडांचा तडाखा दाखविणार आम्ही तुम्हांला. तुम्हीच आम्हांला शिव्या दिल्यात नाहीं का?" राजाबाळ वरिश्रीचा आव आणून गुरगुरला.

"पण तुम्हींच आमचं नांव काढलंत अगोदर." चतुरा.

"आम्हीं तुम्हांला कांहीं म्हटलं नव्हतं. आम्ही ताटव्यावरल्या फुलपांखरांबद्दल बोलत होतों." जंगल्या.

"आणि आम्हीहि आभाळांत घिरट्या घालणाऱ्या कावळे-गिधाडांबद्दल बोलत होतों." लीला.

"मग तींच गिधाडं आतां तुमच्यापुढं आलीं आहेत. त्यांच्या तावडींतून कशा सुटतां तें बघूं या." राजाबाळ.

"काय करणार रे तुम्ही? बाजूला होतां कीं नाहीं?" चतुरा.

"होतों बरं राणीसरकार. पण त्याच्या आधीं तूं माझा नवरा' असं म्हणून एकेकाला नमस्कार केला पाहिजे." जंगल्या.

"लीले, बोल तुला कोण पसंत आहे? डोमकावळा कीं गिधाड?" राजाबाळ.

पण या त्याच्या सवालाचा जबाब त्याला वेगळ्याच रीतीनं मिळाला. चतुराची चप्पल त्याच्या थोबाडावर आदळली!

जंगल्यालाहि तो प्रसाद मिळाला. तो चिडला. तो त्या मुलींवर हल्ला चढवण्याच्या तयारीनं राजाबाळला म्हणाला—"पाहातोस काय राजा? तूं एकीला धर, मी दुसऱ्या कार्टीचा समाचार घेतों."

आतां आपली धडगत नाहीं या धास्तीनं लीला ओरडली—

"अहो धांवा! कुणीतरी धांवा—"

"आतां कोण येतोय तुमचा बाप तुम्हांला सोडवायला बघूंया कीं!" असें म्हणत जंगल्या लीलाच्या अंगावर धांवणार तोंच पुढून एक टांगा येतांना त्याला दिसला. आतां सूंबाल्या करण्यावांचून गत्यंतर उरलें नाहीं. 'आजचं उट्टं उद्यां काढूं, जातात कुठं या पोरी' अशा ऐटीनं



पण त्याच्या सवालाचा जबाब–चतुराची चप्पल त्याच्या थोबाडावर आदळली.

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

जंगल्यानं बागेच्या कुंपणावरून आंत उडी घेतली. राजाबाळच्या अंगीं इतकी चपळता कुठली? पण वाट्टेल तें झालं तरी या वेळीं निसटून जाणं भागच होतं. त्यानं जंगल्याप्रमाणं तारेवर पाय देऊन आंत उडी घेण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. त्याचा शर्ट तारेंत अडकला, पिंढरींत तारेचा एक कांटा घुसला आणि त्याला घायाळ स्थितींत उचललेला पाय मागं घ्यावा लागला.

"अग आई ग!" म्हणत त्यानं रस्त्यावर बैठक मारली.

इतक्यांत टांगा तिथं येऊन दाखल झाला. तो आपल्या वाटेनं निघून जात होता, पण लीलेनं ओरडून म्हटलं—

"अहो बाई, थांबा!"

टांगा थांबला. आंत बसलेल्या बाई उतरून मुलींजवळ आल्या. त्यांनीं विचारलं—"काय हवंय बाळ?"

"आमच्यावर हल्ला झाला."

"हल्ला आणि असा दिवसाढवळ्या अन् हमरस्त्यावर? कोण होते हल्ला करणारे?"

"आमच्याच शाळेंतले मुलगे. आम्हीं त्यांचा छान समाचार घेतला. मग गेले पळून. त्यांतला एकजण पडलाय इथं." चतुरानं राजाबाळकडं बोटं दाखवलं.

"कोण हा? आमचा राजाबाळ हा!"

"कोण तूं? मनूमावशी!"

राजाबाळनं डोळेच मिटून घेतले!

* * *

# १२

माईचं स्थलांतर आणि त्याविषयीं त्यांनीं दिलेलीं उत्तरं यांवरून मनूताईंना शंका आली होती कीं ही घटना सुखासुखी झालेली नसावी. कसल्या तरी गंभीर स्वरूपाच्या अडचणींत सांपडल्यामुळंच माईंना वर्षांनुवर्षं मांडून ठेवलेलं, जिवाभावानं सजवलेलं बिऱ्हाड उचलावं लागलं असलं पाहिजे. पण कारण कोणतंहि असलं तरी तें त्यांनीं आपल्यापासूनच छपवून कशासाठीं ठेवावं ? माईवर प्रसंग आला तर आपण साहाय्य करूं, निदान सहानुभूति दाखवूं, एवढा तरी विश्वास माईंना आपल्याविषयीं कां वाटूं नये ? आपल्यावरला माईंचा विश्वास उडावा, असं कोणतंच निमित्त घडलेलं नसतांना ज्याअर्थीं माई आपलं हृद्गत उघडं करीत नाहीं, त्याअर्थीं कांहींतरी मोठाच घोटाळा झाला असला पाहिजे, असं मनूताईंना वाटलं. आपलं संकट बोलून दाखवायचं जिवावर येत असतांना त्याबद्दलच माईंना खोदखोदून विचारल्यास त्यांच्या दुःखावर डागण्या दिल्यासारखं होईल, अशा विचारानं त्या कांहीं काळ स्वस्थ राहिल्या. पण बहिणीविषयींची त्यांच्या अंतर्यामींची कळकळ त्यांना स्वस्थ बसूं देईना. माईनं बोलून दाखवलं नाहीं, तरी तिच्यावर संकट आलं असतांना आपण उदासीन राहणं उचित नव्हे, अशी टोंचणी त्यांच्या मनाला लागली आणि म्हणूनच त्या अशा अवचितपणें माईकडं धांवून आल्या. पण माईच्या आधीं त्यांना राजाबाळच दिसला ! आणि तो अशा गुन्हेगार स्वरूपांत !

मनूमावशींनीं लीला-चतुराचं सर्व गाऱ्हाणं ऐकून घेतलं. त्यांच्या वर्गबंधूंनींच त्यांना असा उपद्रव द्यावा याबद्दल त्यांचा निषेध करून मुलींना सहानुभूति दाखविली आणि ' राजाबाळला आपण योग्य तें शासन करूं ' असं आश्वासन दिलं. ' झालेल्या प्रकाराचा कुठंहि बभ्रा

करूं नका, तसा केला तर तो तुम्हांलाच त्रासदायक होईल; कारण अपराध मुलांचा असला तरी मुलींबद्दल लोकांच्या मनांत किन्तु राहतो' अशी त्यांची समजूत घालून मावशींनीं त्यांना वाटेला लावलं.

मनूताई आली याचं माईंना आश्चर्य वाटलं आणि आनंदहि वाटला. पण तो क्षणभरहि टिकला नाहीं. कारण मनूताईची नेहमींची हंसरी खेळकर चर्या आज कष्टी दिसत होती आणि त्यांच्यामागून येणाऱ्या राजाबाळच्या तोंडावरहि आजपर्यंत कधींहि दिसला नव्हता इतका शरमिंधेपणा पसरला होता! वहीण फारां दिवसांनीं भेटल्याबद्दल क्षणभर वाटलेला हर्ष मावळला आणि कसलं तरी नवं नष्टचर्य आपल्यावर चाल करून आलं या कल्पनेनं माईच्या मनांत धस्स झालं!

"माई! बघत काय राहिलीस अशी! दृष्ट काढायला मीठ-मोहऱ्या आण. मोठा पराक्रम गाजवून आलंय तुझं हें दिवटं बाळ."

"काय झालं तें कळूं दे तरी? माझं नशीव असं हात धुऊन कां ग माझ्यामागं लागलंय!" माई हताशपणें बोलल्या.

राजाबाळ आपल्या खोलींत गेला. त्याला आईमावशीकडं वर मान करून पाहण्याचीहि हिंमत होत नव्हती. पण तो त्यांच्यापुढून दूर गेला, तरी मावशी त्याला थोड्याच सोडायला बसल्या होत्या? त्या माईसह त्याच्या मागोमाग गेल्या आणि त्यांनीं त्याच्या पाजीपणाचा पाढा वाचून त्याला विचारलं, "असले घाणेरडे चाळे करायला लाज कशी वाटली नाहीं तुला?"

मावशींनीं करतां येईल तेवढी त्याची निर्भर्त्सना केली. माई सुन्न होऊन गेल्या होत्या. त्या सारं ऐकत होत्या, पण त्याकडं त्यांचं लक्ष किती होतं कुणास ठाऊक! पुढं आणखी होणाऱ्या धिंडवड्यांचीं चित्रं पाहण्यांतच त्यांचं मन गढलेलं असावं.

मावशीच्या तोंडचे तीक्ष्ण शब्द राजाबाळनं कांहीं वेळ निमूटपणें ऐकून घेतले. पण पापी मनालाहि चीड येतेच. राजाबाळ तसाच चिडला आणि म्हणाला—

" आम्ही काय वाटेल तें करूं. तूं कोण विचारणार मला ? "

एक क्षणभर मावशी चमकल्या. त्यांच्या चर्येवरल्या विषादाची जागा संतापानं घेतली.

" मी कोण विचारणार ? ठाऊक नाहीं तुला मी कोण तें ? " असं म्हणून त्यांनीं राजाबाळच्या श्रीमुखांत सणसणीत चपराक लगावली आणि म्हटलं—" आतां कळलं का मी कोण तें ? पोरींच्या चप्पलचे फटके खाऊन फुटलं नसलं तर तुझं थोबाड पुरतं फोडून काढतें मी. घे—" काड् काड्—थोबाडांत, डोकीवर, पाठींत जिथं लागतील तिथं मावशीच्या थपडा बसूं लागल्या.

बोलण्यांतला उर्मटपणा बोलण्यापुरताच राहिला. राजाबाळनं कळवळून किंकाळी फोडली. वधिर झालेली माईमधली आई कळवळली. माई धांवत जाऊन मधें उभ्या राहिल्या. राजाबाळला पाठीशीं घालून त्या म्हणाल्या—

" मनुताई, हें काय चालवलं आहेस तूं ? "

" जें आधींच करायला पाहिजे होतं, पण जें तूं कधींच केलं नाहींस तें मी आतां करतेंय माई. बाजूला हो तूं. आल्याबरोबर मावशीनं भाच्याला खाऊ द्यायला नको का ? सोड पाहूं त्याला ! "

आपल्या प्रेमळ बहिणीच्या अंगांत झालेला तो चंडिकेचा संचार माईंना भीतिप्रद वाटला. त्या अजीजीनं म्हणाल्या—

" मनुताई, शांत हो म्हणते ना ! मला पाहवत नाहीं हें. "

" म्हणूनच हें असं होऊन बसलंय. " मनुताई उद्वेगानं म्हणाल्या.

" माई, राजाबाळची खराबी झाली, ती तूं केलीस. मुलावर ममता करायला, त्याच्यावर मायेची पांखर घालायला तिला शिकावं लागत नाहीं. पण योग्य वेळीं मुलाला चपराक मारायला आईनं शिकायला हवं. हें कर्तव्य तुला कळलं नाहीं म्हणून तें तूं शिकली नाहींस. आपल्या एकुलत्या एका मुलाला हालअपेष्टांची तिरीप लागूं नये या

एकाच धोरणानं तूं त्याला अखंड मायेच्या सावलींत ठेवण्याचा अट्टाहास केलास. पण सावली आणि सावट यांतलं अंतर तुला कळलं नाहीं. कोवळं रोप प्रखर उन्हानं करपूं देऊं नये हें ठीक आहे. पण तेवढ्यासाठीं त्याला सदोदित सावटांतच ठेवणं घातुक आहे. अंकुर फोफावायला, रोप जोरानं वाढायला त्याला सूर्यकिरणांचं, पौष्टिक हवंच असतं. माई, अखंड सावटांत ठेवल्यामुळं तुझ्या आशेचा हा अंकुर खिरटला आहे. शरीराप्रमाणं मनानंहि तो दुर्बल बनला आहे. ज्या प्रकारें त्याचा विकास व्हायला पाहिजे होता त्या प्रकारें तो झाला तर नाहींच, उलट त्याच्यावर दुर्गुणांची कीड पडली आहे. या किडीनं त्याला पोखरलं आहे. वेळींच दक्षता घेतली नाहीं, आतां तरी ही कीड झाडून काढण्याची धडपड करायला नको का? कीड जिव्हारीं भिनली आहे, आपल्या धडपडीला यश कितपत येईल याची शंकाच आहे. तरीपण आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न केला पाहिजे."

मनूताईचं बोलणं माई मुकाट्यानं ऐकून घेत होत्या. बहिणीच्या बोलण्यांत रागाचा तिखटपणा दिसला, तरी सहानुभूतीचा, कळकळीचा गोडवाहि प्रतीत होत होता. माईंना त्या बोलण्याचं भय वाटत होतं; पण तिनं असंच बोलत राहावं, आपल्या मूर्खपणाची अशीच निर्भर्त्सना करावी असंहि वाटत होतं. आपण खरोखरच चुकलों आणि आपला हा अपराध अक्षम्य आहे असं त्यांचं मन त्यांना बजावीत होतं. मनूताई बोलायच्या थांबल्यावर किती तरी वेळ स्तब्धता पसरली होती. दोघीहि जड मनानं बसून होत्या. राजाबाळला तर बोलायला तोंडच नव्हतं.

अखेर मनुमावशींनीं शांततेचा भंग केला. त्या सद्गदित होऊन म्हणाल्या—"माई, रागावलीस? तुझ्या होरपळलेल्या अंतःकरणावर मीं आणखी डागण्या दिल्या. चुकलं माझं. क्षमा कर मला, माई!"

दोघी बहिणींनीं मनसोक्त रडून घेतलं. त्यांतच माई बोलत होत्या—"तूं कां वाईट वाटून घेतेस उगाच! माझं मन पुरतं निगरगट्ट झालंय

आतां. माझ्या या पोरानं मला इतक्या यातना दिल्या आहेत कीं, नव्या यातनांनीं व्याकुळ होण्याइतका हळुवारपणाच माझ्या मनांत उरलेला नाहीं. दोन वर्षांमागं मीं तुझा उपदेश ऐकला असता, तुझ्या हवालीं याला केलं असतं तर कशाला ही पाळी आली असती? पण सुई बोचते म्हणून इंजेक्शन चुकवायचं किंवा कडू लागतो म्हणून काढा घ्यायचा नाहीं आणि बळेंबळें दुखणं विकोपाला जाऊं द्यायचं अशांतला आत्मघातकी प्रकार झाला माझा. मनूताई, आतां होईल तें निमूटपणें पाहायचं, सोसवेल तितकं सोसायचं. नाहीं तर—मनूताई, ऊठ. चल आंत. आलीस तीं याच ब्रह्मघोटाळ्यांत गुरफटलीस. आणि मीहि—दिवा लावायचीसुद्धां शुद्ध राहिली नाहीं मला."

राजाबाळ उठून गेला. आपण वावग्या गोष्टी केल्या त्याबद्दल त्याला पश्चात्ताप वाटत नव्हता आणि यापुढं सद्वर्तन ठेवून माई-मावशीची ओसरलेली माया परत मिळवूं, शिक्षकांकडून, शेजाऱ्यांकडून भलं म्हणवून घेऊं अशी महत्त्वाकांक्षाहि त्याच्या मनांत जागृत झाली नव्हती. उलट, माई-मावशीची भीति वाटून त्यांच्या तावडींतून निसटलं पाहिजे. पण तें निसटायचं कसं? याबद्दल त्याच्या डोक्यांत विचारचक्रं फिरूं लागलीं होतीं. पण घराबाहेर पडून जायचं कुठं नि करायचं काय हा प्रश्न त्याला सुटत नव्हता.

इकडं माई-मावशीहि विकोपाला गेलेलं हें दुखणं कसं बरं करावं, तें बरं होईल का, याबद्दल चर्चा करीत होत्या. राजाबाळनं आज कांहींतरी घाणेरडी गोष्ट केली एवढंच माईंनीं अजमावलं होतं. पण मनूताईंनीं जेव्हां खुलासेवार माहिती सांगितली तेव्हां त्यांच्या मनानंहि धीर सोडला. त्यांनीं उद्वेगानं म्हटलं, "मनूताई, मुलगा नव्हे, पण त्याच्या रूपानं माझं नष्टचर्य जन्माला आलंय हें! चांगल्या आईबापांच्या पोटीं चांगलीं मुलं जन्माला येतात असं म्हणतात. मग आमच्याच वांट्याला हें नासकंकिडकं फळ कां ग यावं?"

" येऊं नये, पण आलंय खरं. पण तेंच सुधारायची धडपड केली पाहिजे. सुधारलं तर आपलं सुदैव, नाहीं सुधारलं तर आपण करतां येईल तेवढा प्रयत्न केला असं समाधान तरी वाटेल."

" तूंच आतां करायचं तें कर. मला कांहींच सुचत नाहीं. दोन वर्षांपूर्वी मीं तुझं ऐकलं नाहीं, रागावली असशील तूं. राग पोटांत घाल."

" असं बोलूं नकोस, माई. मी आपण होऊन इथं आलें ती तुझ्यावर रागावल्यामुळं का ? तुझी आणि तुझ्यापेक्षांहि तुझ्या लेकाची काळजी मला स्वस्थ बसूं देईना, म्हणूनच मीं इकडं धांव घेतली. आणि घेतली तेंच बरं झालं. खरा प्रकार कळला. आतां उपाय काय करायचा एवढंच ठरवायचं. माई, तूं आपली नि राजाबाळची वळकटी बांध. सामानसुमान आवरून ठेव. उद्यां सकाळच्या पहिल्या गाडीनें इथून निघायचं."

" पण जायचं कुठं ?"

" आमच्या घरीं. राजाबाळला ह्यांच्या हवालीं करायचं. आपणां-सारख्या बायकांपेक्षां विद्वान् आणि अनुभवी माणसांकडूनच योग्य ती व्यवस्था लागेल. नाहीं का ?"

माईंना आतां स्वतःची इच्छा-अनिच्छा उरलीच नव्हती. बहीण म्हणेल त्याला त्या 'हों' म्हणत होत्या. ती सांगेल तें करीत होत्या. घरचा पसारा आवरण्यांत दोघी बहिणी पहाटेपर्यंत जागल्या. मावशीच्या घरीं जायची राजाबाळची भीति कमी झाली नव्हती, आतां तर दुणावली होती. पण 'नाहीं' म्हणायला त्याला तोंड नव्हतं. लडिवाळपणाचं, समजूतदारपणाचं, रुसण्याफुगण्याचं नाटक करून माईला वश करणं आतां अशक्य आहे हेंहि त्याला समजून चुकलं होतं. मग या गंडांतरांतून निसटायचं कसं ? या विचारांत तो तळमळत होता ! माई-मावशी आवराआवरींत जाग्या, तर राजाबाळला कोणत्या युक्तीनं या बायांना गुंगारा द्यावा या विवंचनेंत झोंप लागत नव्हती. मावशीचं

बोलणं त्याला ऐकूं येतं होतं आणि त्यांतल्या एकेक वाक्यासरशीं त्याची छाती धडधडत होती. मनूताई सांगत होत्या—

"बरं का माई, आमच्या ह्यांची शिस्त कडक, आणि वचकहि दांडगा. मुलं म्हटलीं कीं खट्याळपणा करायचीं, खेळाकडं त्यांची ओढ असायची हें ह्यांना कळतं. त्याबद्दल हे कांहीं बोलायचे नाहींत. उलट मुलांच्या खेळाला ह्यांचं प्रोत्साहन मिळतं. मुकुंदानं हुतुतूंत पाय दुखावून घेतला याबद्दल त्याच्यावर रागावण्यापेक्षां त्यानं पदक मिळवल्याबद्दल यांनीं त्याला शाबासकीच दिली. पतंग काटल्याबद्दल शामूवर रोज फिर्यादी येतात आणि रडव्या पोरांच्या समजुतीखातर हे वरकरणी त्याच्यावर रागावले, तरी आंतून यांना शामूचं कौतुकच वाटतं. पण मुलं बेशिस्तपणें वागलीं, त्यांनीं वाह्यातपणा केला, तर हे मुळींच गय करीत नाहींत. ते मुलांना मारतात, झोडपतात असं मुळींच नाहीं. पण अपराधी मुलांशीं यांचं मौन सुरू होतं. ही शिक्षा त्याला मारापेक्षांहि कठोर वाटते. ज्याबद्दल विशेष कडक शासन करायला हवं असं ह्यांना वाटतं, त्याबद्दल अपराधी मुलाला एक वेळ उपाशी ठेवायचा यांचा हुकूम सुटतो, अथवा सर्वांसमक्ष आपल्या आपण थोबाडींत मारून घ्यायला लावतात त्याला. बापू एका सोबत्याबरोबर हॉटेलांत गेला हें ह्यांना कळलं. मुलांनीं हॉटेलांत कधींहि जातां कामा नये अशी यांची सक्त ताकीद असतांना तो गेला, तर त्याबद्दल एक सबंध दिवस त्याला उपास सोसावा लागला—"

मावशीच्या घरच्या या कडक शिस्तीचं वर्णन राजाबाळ पडल्या पडल्या ऐकत होता. अशा कैचींत आपण आतां सांपडणार—म्हणजे आपलं मरणच अशी त्याला धास्ती वाटायला लागली. मावशीच्या घरचीं मुलं अशा कडक शिस्तींत असूनहि दुःखी-कष्टी नाहींत, उलट कुणी खेळांत पदकं मिळवतो, तर कुणी शिष्यवृत्ति पटकावतो, हेंहि त्यानं ऐकलं होतं; पण ही तजेलदार बाजू त्याच्या नजरेंत भरली नाहीं,

आणि त्यांच्यांतलाच एक होऊन आपणहि त्यांच्यासारखी करामत करून दाखवावी अशी महत्त्वाकांक्षा त्याच्या मनांत जागृत झाली नाहीं ! मावशीच्या घरच्या कैदेंत जाऊन पडण्याऐवजीं तिच्या हातावर तुरी कशा द्यायच्या याचाच तो विचार करीत होता.

पहाटेच्या सुमारास काम थांबवून माई-मावशी लवंडल्या. शिणलेल्या असल्यामुळं त्यांचा बोलतां बोलतां डोळा लागला. त्यांना गाढ झोंप लागली अशी खात्री वाटतांच राजावाळ उठला. माईंचा खजिना कुठं असतो हें त्याला ठाऊकच होतं. तिथं जाऊन त्यानं अंधारांतच फडताळ उघडलं. माईंनीं वरखर्चासाठीं काढून ठेवले होते त्या पैशांतल्या दोन नोटा त्यानं खिशांत कोंबल्या आणि अंधारांतच त्यानं घराबाहेर धूम ठोकली. तो स्टेशनावर आला तों साडेपांचच्या गाडीची घंटा झाली. कुठलं तिकिट काढायचं याचा त्याला विचार पडला, पण क्षणभरच. त्याला एका काळीं नादाला लावणारा रामागडी तिकिटाच्या खिडकीपाशीं उभा होता. आयती सोबत मिळाली असं राजावाळला वाटलं.

राजावाळनं आपली कर्मकथा रामाला सांगितली. "आपण पैका मिळवायला म्हमईला चाललों असल्याचं रामानं सांगितलं व आपल्या संग आल्यास आपण त्याला काम मिळवून देऊं; वाइच शिकल्यालीं पोरं बी म्हमईला म्हैना शेपन्नास रुपय कमावतात, मग राजावाळसारख्या विंग्रजीवाल्याला ढिगानं पैसे मिळवून मजेंत ऱ्हातां येईल" असं मुंबईवैभव रामाच्या तोंडून ऐकतांच राजावाळ भाळला व तोहि मुंबईचं तिकिट काढून रामाबरोबर गाडींत चढला.

रामाला एक चांगलं सावज सांपडल्याचा आनंद झाला आणि त्यानं राजावाळ पूर्णपणें आपल्या कबजांत घेण्याचे उद्योग चालवले. राजावाळनं दहाची एक नोट तिकिटासाठीं मोडली असली तरी शंभराची आणखी एक नोट त्याच्या खिशांत आहे हें रामाला कळलं होतं. त्यानं प्रत्येक मोठ्या स्टेशनवर चहा मागवून राजावाळला दिला व त्यानं पैसे देऊं केले तरी घेतले नाहींत. कोठें चहा तर कोठें केळीं, कोठें

पानपट्टी तर कोठें सिगारेट अशा माऱ्यानं त्यानं राजाबाळला भारून टाकलं. कल्याण स्टेशन सोडून गाडी पुढं निघाली तेव्हां रामा म्हणाला—

" आतां म्हमई लागलीच. आता लै जपून ऱ्हाया व्होतं. हितले भामटे हां हां म्हणतां खिसे कातरतात. पैका-अडका वर ठेवायची सोय नाहीं."

रामानं आपलं पाकिट खिशांतून काढून ट्रंकेंत ठेवलं आणि राजाबाळला म्हटलं, " तुमच्यापाशीं टरंक नाय. तुमच्याजवळचं पैसं बी द्या इकडं. तुमी माज्या संगट चला मंजे झालं."

राजाबाळनं शंभराची नोट आणि सुटे दोन रुपये रामाच्या हवालीं केले. त्यानं ते ट्रंकेंत ठेवून कुलूप लावलं.

ठाण्याहून गाडी पुढं निघाली. रामा म्हणाला—" मालक, आतां त्या खिडकीशीं बसून म्हमईची आरास बघा. आभाळांत चांदण्या नसतील इकतं दिवं बगून घ्या. या शेजारच्या डब्यांत माझा एक मैतर दिसतोय त्याला भेटून येतों. दादरवर उतरून, बोरीबंदरवर येतों परत. मग जाऊं आपण गिरगांवांत आमच्या खंडूच्या खोलीवर."

राजाबाळ मुंबईचा झगझगाट पाहूं लागला. दादरवर रामा उतरला. पसार झाला. बोरीबंदरवर गाडी थांबली. सगळा डबा रिकामा झाला. राजाबाळ रामाची वाट पाहात जागेवरच बसला होता. रामाचा पत्ता नाहीं. राजाबाळ भ्याला. खालीं उतरून त्यानं या कडेपासून त्या कडेपर्यंत सगळे डबे पाहिले. नव्हताच तर त्याला रामा कसा सांपडणार?

आचारी-विचारी होऊन राजाबाळ फलाटावरील उतारूंच्या समुद्रांत रामाला शोधीत होता, इतक्यांत त्याचा दंड कुणींतरी पकडला. त्यानं चमकून पाहिलं.

" हेमाताई ?"

" होय. ओळखलंस मला ? पण तूं इथं कसा ! आणि काय रे, हा तुझा अवतार ! "

आपण नाशिकला आत्याबाईकडं निघालों होतों, कल्याणवर गाडी बदलायला विसरलों, चुकून इथं आलों, आपली ट्रंक, वळकटी कुणींतरी लांबविली, अशा थापा देऊन तो रडूं लागला. हेमाताईनं त्याला

ग्रंथ संग्रहालय,
१४४ : १४५
२९५५८४ ... २७४४ ... १४५९.

आपल्या बिऱ्हाडीं नेके. माई काळजी करतील म्हणून त्यांना राजाबाळ सुखरूप असून त्याला सोबत पाहून पोंचता करतें, असं पत्र लिहून टाकलं, पण तें पत्र माईंना मिळणं अशक्य होतं. राजाबाळनं नाशिकचा खोटाच पत्ता हेमाताईला सांगितला होता !

हेमाताई आतां सौभाग्यवती झाली होती. तिचे कांचनराव राजाबाळला पाहून आनंदित झालेले दिसले नाहींत. त्या उभयतांचा इंग्रजी संवाद राजाबाळच्या कानांवर आला. तो त्याला पूर्णपणें कळला नाहीं, तरी त्या जोडप्याचा आपल्या बोलण्यावर विश्वास नाहीं व आपल्याबद्दल प्रेमहि वाटत नाहीं हें त्याच्या लक्षांत आलं. आपणास गोड बोलून पकडून ठेवायचं आणि माईंना बोलवून घेऊन आपणास तिच्या हवालीं करायचं असें कारस्थान तीं दोघं करीत आहेत हें राजाबाळला कळून चुकलं. म्हणजे 'ज्या मरणाला भिऊन आपण फरारी झालों तें मरण पुढं आलंच' या विचारानं तो घाबरला आणि तें चुकविण्याचा त्यानं नवा प्रयोग केला. कांचनरावांच्या खिशावर हात मारून तो पसार झाला !

कांचनरावांनीं त्याच्या खाणाखुणा सांगून पोलिसांत वर्दी दिली.

राजाबाळ फरारी झालेला पाहतांच माई-मावशी चमकल्या. त्यांनीं जवळपास शोध केला, पण पत्ता लागेना. एक नव्हे, दोन नव्हे, आठ दिवस त्यांनीं त्याच्या परत येण्याची वाट पाहिली. दिवसादिवसागणिक माईंची अवस्था शोचनीय होत होती. मनूताई सावरून धरण्याची शिकस्त करीत होत्या, तरी माईंच्या मनाचा तोल सुटत चालला. त्या रात्रीच्या वेळीं एकदां विहिरीकडेहि निघाल्या होत्या, पण मनूताईंच्या सावधपणामुळं तो प्रसंग टळला ! माईंच्या मेंदूवर पुत्रवियोगाचा आघात तीव्रतर होत चालला आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. माई वेड्या झाल्या.

त्यांना घेऊन मावशी आपल्या घरीं निघाल्या. माई क्षणांत हंसत, क्षणांत रडत. कोणत्याहि वेळीं 'माझा राजाबाळ' हाच त्यांच्या बडबडीचा विषय असे. मावशींनीं माईंना गाडींतून उतरवून घेतलं. सामान हमालाच्या स्वाधीन करून त्या बाहेर जायला निघाल्या. तोंच—

"अग मने, ती बघ माझ्या राजाबाळाची वरात निघालीय !" असे किंचाळून माई धांवत सुटल्या !



आणि खरोखरच राजाबाळची वरात निघाली होती ! दंडाला काढण्या, हातकड्या अशा अलंकारांनीं नटलेला राजाबाळ पोलिसांच्या पहाऱ्यांत गार्डीकडं निघाला होता !

माईंनीं जाऊन त्याला कवटाळलं ! त्यानंहि ‘ माई ! माई ग ऽ ’ ! असा हंबरडा फोडला !

“ शिपाईबुवा ! कुठं नेताय याला ? आणि कां ? ” मनूमावशींनीं विचारलं. “ चोरीसाठीं धरलंय. मुंबईला न्यायचंय. ” एवढं धांवतं उत्तर त्यांना मिळालं. कारण गाडी चालू झाली होती.

“ सावटांत रोप किडलं, धुळीला मिळालं ! ” असं मनांत म्हणून मावशींनीं डोळे टिपले !

“ माझा राजाबाळ लग्नाला निघाला, त्याची वरात निघाली ” असं बडबडत माई हंसत होत्या ! टाळ्या वाजवीत होत्या.

* * *

अनुक्रम २५४६६
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा.
IRBK-0105606
IRBK-0105606
म. प्रं. ठाणे. वाचनालय शाखा.
नों दि
क्र. ५६०६

# विद्यार्थ्यांसाठीं व पुरवणी वाचनासाठीं कांहीं पुस्तकें